म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
REFBK-0007389

# तुमचा वकील

[ सर्वसामान्य माणसासाठीं कायद्याचें पुस्तक ]

92099

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

ग्रं. क्र. 7320

राम केशव रानडे

एल्.एल्. एम्.

REFBK-0007389

रा... ...ा.

गिरगांव - मुंबई

प्रथमावृत्ति १९५०

प्रकाशकः — वि. र. बाम, रामकृष्ण बुक डेपो, गिरगांव मुंबई.

मुद्रकः—एम्. आर. कालेवार, प्रफुल्ल प्रिंटिंग प्रेस, गिरगांव रोड, मुंबई २.

92091

# प्रकाशकाचे चार शब्द

न्यायखात्यांत वरिष्ठ हुद्यावर काम करित असलेले श्री. **राम केशव रानडे** एल् एल्. एम्, यांचें "**तुमचा वकील**" हें स्तक प्रकाशित करतांना आम्हांला फार आनंद होत आहे. श्री. रानडे यांची आतांपर्यंत १८ पुस्तकें झालीं आहेत, व तीं सर्व लोकप्रिय झालीं आहेत. पूर्वीच्या पुस्तकापेक्षां देखील हें पुस्तक विशेष लोकप्रिय होईल, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

कायदा हा अत्यंत क्लिष्ट असतो. ह्या क्लिष्टपणाची खात्री पटविण्याकरितां असें एक उदाहरण सांगतात कीं, एका मनुष्यास निद्रानाशाचा विकार जडला होता; त्यानें पुष्कळ औषधें घेऊन पाहिलीं पण कांहींच गुण आला नाहीं. शेवटीं त्यानें रात्रीं निजतांना कायद्याची पुस्तकें वाचण्यास सुरवात केली. या उपायानें मात्र त्याला झोप येऊ लागली, व त्याचा निद्रानाशाचा विकार निघून गेला.

कायदा क्लिष्ट आहे याबद्दल वाद नाहीं. परंतु प्रस्तुत पुस्तक मात्र त्या नियमाला अपवाद आहे. सांगलीचे राजकवि कै. साधुदास हे एकदां श्री. रानडे यांना म्हणाले कीं—"तुम्ही कायद्याची खूपखूप पुस्तकें लिहितां, पण. माझ्यासारख्या माणस ला घरबसल्या कायद्याचें जरूर तें ज्ञान होईल असें जर तुम्ही पुस्तक लिहिलें, व किरकोळ गोष्टी करतां वकीलाच्या घरची पायरी चढण्यापेक्षां घरच्या घरीं कायद्याची माहिती मिळाली तर माझ्यासारखे लोक तुम्हाला शतशः धन्यवाद देतील."

साधुदासांच्या इच्छेचें फळ म्हणजेच प्रस्तुतचें पुस्तक. हें पुस्तक प्रकाशित झालेलें पाहण्यास साधुदास असते तर सोन्याहून पिवळें झालें असते. पण······ कालाय तस्मै नमः !

## श्री. राम केशव रानडे एल्.एल्. एम्.

### यांचीं पुस्तकें

(१) स्त्रीधनाचा कायदा.
(२) हिंदू विवाहाचा कायदा.
(३) मृत्युपत्राचा कायदा.
(४) कर्जाबाबत कायदा.
(५) देशमुख कायदा.
(६) पोटगीबाबत कायदा.
(७) दस्तऐवजाचा कायदा.
(८) खरेदीविक्रीचा कायदा.
(९) दत्तकाचा कायदा.
(१०) स्मृतिकालीन कायदा.
(११) प्रॉमिसरी नोटेचा कायदा.
(१२) स्त्रियांचा कायदा.
(१३) मुद्रणाबाबत कायदे
(१४) कोर्टकथा.
(१५) कायदा व लोकशाही.
(१६) पोलिसाबाबत कायदा.
(१७) Indian Legal Philosphy Series Part I "Marriage"
(१८) मुदतीचा कायदा.
(१९) तुमचा वकील.

## प्रकरण १ लें

# पोटगी

### १ पोटगीची जबाबदारी.

हिंदु कायद्याप्रमाणें पोटगीची जबाबदारी दोन प्रकारची आहे. पहिल्या प्रकारची जबाबदारी केवळ नात्यावर अवलंबून असून, मिळकत ताब्यांत असणें अगर नसणें या गोष्टीशीं तिचा संबंध येत नाहीं. दुसऱ्या प्रकारची जबाबदारी मिळकत ताब्यांत आहे अगर नाहीं या गोष्टीवरच अवलंबून असते. मिळकत ताब्यांत असो वा नसो, आपली पत्नी, अज्ञान मुलगे व लग्न न झालेल्या मुली ह्यांचें प्रत्येकाचें पोषण केलेंच पाहिजे असें हिंदु कायदा सांगतो. ही पोटगीची जबाबदारी विशिष्ट नात्यावर अवलंबून असून, मिळकत ताब्यांत असणें अगर नसणें ह्या गोष्टीशीं तिचा कांहीं संबंध नाहीं.

### २ आई, बाप, मुलगे व मुली

ह्यांच्या बाबतींत नियम आहेत ते असे—

(१) आपली वडिलार्जित कांहीं इस्टेट असो वा नसो, आपल्या वृद्ध आई-बापांचें पोषण करण्याची वैयक्तिक जबाबदारी मुलावर आहे.

( सावित्रीबाई वि. लक्ष्मीबाई, २ मुंबई, पान ५७३ )

(२) मुलगे अज्ञान असेपर्यंत त्यांचें पोषण करण्याची वैयक्तिक जबाबदारी बापावर आहे. ( रामचंद्र वि. सखाराम, ३ मुंबई, पान ३४६ )

(३) मुली अविवाहित असेपर्यंत त्यांचें पोषण करण्याची जबाबदारी बापावर आहे. बापाच्या पश्चात् अविवाहित मुलींना बापाचे इस्टेटींतून पोटगी मिळूं शकते. मुलीचें लग्न झाल्यानंतर तिचें पोषण करण्याची जबाबदारी बापावर अगर त्याचे इस्टेटीवर नाहीं. मुलीचें लग्न झाल्यानंतर तिला नवऱ्यापासून अथवा नवऱ्याच्या पश्चात् त्याच्या कुटुंबापासून पोटापुरतें अन्नवस्त्र मिळत नसेल तर अशा मुलीचें आपल्या स्वतःच्या इस्टेटींतून पोषण करण्याची नैतिक जबाबदारी बापावर आहे. बापाच्या पश्चात् या नैतिक जबाबदारीचें रूपांतर कायदेशीर जबाबदारींत होतें किंवा नाहीं याबद्दल वाद आहे.

## ३ अवरुद्ध स्त्री व पत्नी

एखाद्या हिंदुनें उप–स्त्री अथवा अवरुद्ध–स्त्री म्हणजे रखेली ठेवली असेल तर तिला पोटगी देण्यास तो हिंदु मनुष्य बांधलेला नाहीं. आपल्या इच्छेला येईल तेव्हां त्यानें अशा स्त्रीला सोडून देण्यास हरकत नाहीं. अशी रखेली एखाद्या हिंदुजवळ मरेपर्यंत रहात असेल तर मात्र त्याच्या पश्चात् त्याच्या वडिलार्जित अथवा स्वसंपादित इस्टेटींतून पोटगी मागण्याचा तिला अधिकार आहे. ही इस्टेट ज्याच्या ताब्यांत असेल त्याच्याकडून तिला पोटगी मागतां येईल, ( दयावती वि. केसरबाई, ऑ. इं. रि. १९३४ मुंबई, पान ६६; निंगा रड्डी वि. लक्ष्म्यवा, २६ मुंबई, पान १६३ ). अवरुद्ध स्त्रीची व्याख्या प्रिव्हि कौन्सिलनें खालीलप्रमाणें केली आहे. **"अवरुद्ध–स्त्री म्हणजे जी आपल्या मालकाच्या सेवेंत राहते व जी दुसऱ्या कोणाशीही संबंध ठेवीत नाहीं अशी स्त्री "** ( ५० मुंबई, पान ६०४ ). नवऱ्याजवळ मिळकत असो अथावा नसो, त्यानें आपल्या पत्नीचें पोषण केलें पाहिजे, अशी त्याच्यावर वैयक्तिक जबाबदारी आहे. ( जयंती वि. अलामेलू, २७ मद्रास, पान ४५ ; नर्मदाबाई वि. महादेव, ५ मुंबई, पान ९९ )

### वेगळे राहून पत्नी पतीपासून पोटगी मागूं शकेल काय ?

नवऱ्याची आज्ञा पाळणें हें हिंदु पत्नीचें आद्य कर्तव्य असल्यामुळें नवऱ्यापासून वेगळें राहून तिला पोटगी मागतां येणार नाहीं ; मात्र नवऱ्याचें वर्तन निंद्य

असलें अथावा आपल्या घरीं नवरा पत्नीला ठेवून घेत नसेल, अगर अशाच कांहीं सयुक्तिक कारणाकरितां पतीपासून वेगळें राहणें पत्नीला भाग असेल, तर मात्र वेगळें राहूनही तिला पोटगी मागतां येईल. किरकोळ घरगुती भांडणांमुळें बायको नवऱ्यापासून वेगळी राहील, अथवा नवऱ्यानें दुसरी बायको केली, एवढ्या कारणाकरितां ती वेगळी राहील, तर तिला पोटगी मागण्याचा अधिकार नाहीं. नवऱ्यानें आपल्या घरीं एखादी रखेली ठेवली असेल, अथवा तो आपल्या बायकोला अत्यंत दुष्टपणानें वागवीत असेल, तर मात्र वेगळें राहूनही पत्नीला पतीपासून पोटगी मागतां येईल. वेगळें राहून पत्नीला जी पोटगी मागतां येईल ती किती मिळेल, हें नवऱ्याच्या सांपत्तिक स्थितीवर, तिच्या गरजेवर व इतर अनुषंगिक गोष्टीवर अवलंबून आहे. ( सीताबाई वि. रामचंद्र, ११ मुंबई लॉ रिपोर्टर, पान ३७३ ; सिदलिंगप्पा वि. सिदव्वा, २ मुंबई, पान ६३४ ; अप्पीबाई वि. खिमजी, ३८ मुंबई लॉ रिपोर्टर, पान ७७; दुलर वि. द्वारकानाथ, ३२ कलकत्ता, पान २३४; मातंगिनी वि. जोगेंद्र, १९ कलकत्ता, पान ८४ )

**पत्नी पुन्हां आपल्या नवऱ्याच्या घरीं परत येईल तर—**

नवऱ्यापासून पत्नी वेगळी रहात असेल, व तिचें वेगळें राहाणें निंद्य कारणाकरितां नसेल, तर तिला केव्हांही आपल्या नवऱ्याच्या घरीं जाऊन राहातां येईल व नवऱ्याकडून पोटगी मागतां येईल. पत्नी वेगळी राहिली, एवढ्या एकाच कारणाकरितां तिचा पोटगीचा हक्क बुडणार नाहीं; तिला केव्हांही आपल्या नवऱ्याच्या घरीं जातां येईल व नवऱ्यापासून पोटगी मागतां येईल. आपली पत्नी पूर्वी आपल्यापासून वेगळी राहिली होती. त्यामुळें आपण तिला पोटगी देण्यास तयार नाहीं असें नवऱ्याला म्हणतां येणार नाहीं, ( सुरमपल्ली वि० सुरमपल्ली, ३१ मद्रास, पान ३३८; अप्पीबाई वि० खिमजी. ३८ मुंबई लॉ रिपोर्ट, पान ७७ )

## ४ विधवा

### देशमुख कायद्यानें विधवेचा पोटगीचा अधिकार नष्ट झाला काय ?

देशमुख कायद्यानें ( मिळकती संबंधीं हिंदु स्त्रियांचे हक्काबाबत कायदा—१९३७ चा १८ वा कायदा—१९३८ च्या ११० व्या कायद्यानें दुरुस्त केलेला )

हिंदु विधवांना कांहीं बाबतींत वारसा हक्क दिला आहे. वारसाहक्क दिला असला तरी देशमुख कायद्यांतील कलमें पाहतां त्या कायद्यानें विधवांचा पोटगीचा हक्क काढून घेतला असें म्हणतां येत नाहीं.

## विधवेचा पोटगीचा अधिकार

नवऱ्याच्या मिळकतींत ज्या विधवेला वारसा मिळत नाहीं, तिला पोटगी मागण्याचा अधिकार असतो. पोटगी मिळण्याची ती नवऱ्याच्या स्वसंपादित मिळकतींतून, व मरणसमयीं नवरा ज्या एकत्र कुटुंबाचा भागीदार असेल त्या एकत्र कुटुंबाच्या मिळकतींतून विधवेला पोटगी मिळूं शकते. नवरा हयात असतांना ती योग्य कारण नसतां वेगळी राहात होती, या सबबीवर विधवेची पोटगी नाकारतां येणार नाहीं. याचा अर्थ असा कीं, नवऱ्याच्या हयातींत योग्य कारण नसतांना वेगळें राहूनही विधवेचा पोटगीचा हक्क बुडणार नाहीं, ( नर्मदाबाई वि० महादेव, ५ मुंबई, पान ९९; अधीबाई वि० करसनदास, ११ मुंबई, पान १९९; सुरमपल्ली वि० सुरमपल्ली, ३१ मद्रास, पान ३३८ )

## विधवा वेगळी राहात असल्यास

आपल्या नवऱ्याच्या घरीं राहिलेंच पाहिजे असें विधवेवर बंधन नाहीं. नवऱ्याचें घर सोडून दुसरीकडे राहूनही तिला पोटगी मागण्याचा अधिकार आहे. विधवेवर जें बंधन घालण्यांत आलें आहे तें इतकेंच कीं, तिनें निंद्य कारणां-करितां अथवा व्यभिचाराचें कारणाकरितां वेगळें राहतां कामा नये. अशा कारणा-करितां ती वेगळी राहात असेल तर मात्र तिला पोटगी मागतां येणार नाहीं. नवऱ्यानें मृत्युपत्र करून त्यांत अशी अट घातली असेल कीं, आपल्या पश्चात् आपल्या बायकोनें आपल्या घरींच राहिलें पाहिजे तर मात्र वेगळें राहून विधवेला निराळी पोटगी मागण्याचा अधिकार नाहीं. ( नारायणराव वि. रमाबाई, ३ मुंबई, पान ४१५; कस्तुरबाई वि. शिवाजीराव, ३ मुंबई, पान ३७२; गोकीबाई वि. लक्ष्मीदास, १४ मुंबई, पान ४९०; मुरजी वि. बाई उजम, १३ मुंबई, पान २१८; गिरिअण्णा वि. होनामा, १५ मुंबई, पान २३६ ).

## विधवा व्यभिचारी असल्यास

विधवा व्यभिचारी असेल तर तिला पोटगी मिळणार नाहीं. व्यभिचारीपणांत कांहीं दिवस घालवून नंतर विधवा पुन्हां सन्मार्गास लागेल तर तिला अगदीं जेमतेम पुरेल इतकें अन्नवस्त्र मागण्याचा अधिकार आहे. ( बाळू वि. गंगा, ७ मुंबई, पान ८४; विष्णु वि. मंजम्पा, ९ मुंबई, पान १०८; ओनामा वि. तिम्मणभट्ट, १ मुंबई, पान ५५९, भिकुबाई वि. हरिबा, ४९ मुंबई पान ४५९; रामकुमार वि. भगवंत, ५६ अलाहाबाद, पान ३९२ ),

## विधवेनें पुनर्विवाह केल्यास

विधवेनें पुनर्विवाह केल्यास पहिल्या नवऱ्याच्या इस्टेटींतून पोटगी मागण्याचा तिचा हक्क नष्ट होतो, ( हिंदु विधवांचा पुनर्विवाहाचा कायदा १८५६ चा कलम २ ).

## ५ पोटगीची रक्कम.

### सर्वसाधारण नियम

(१) पोटगीची रक्कम ठरवितांना प्रथमतः पोटगी मागणाऱ्या मनुष्याच्या योग्य गरजा कोणकोणत्या आहेत तें पाहिलें पाहिजे.

(२) या गरजा पाहतांना त्या मनुष्याची समाजातांतील स्थिति व दर्जा विचारांत घेतला पाहिजे.

(३) ज्या कुटुंबांतून अथवा ज्या कुटुंबांतील इतर कर्त्या माणसांकडून पोटगी मिळावयाची त्याची सांपत्तिक स्थिति विचारांत घेणें जरूर आहे.

(४) पोटगी देतांना कुटुंबांतील इतर लोकांना अन्याय होणार नाहीं, या गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे.

(५) पोटगी मागणारा मनुष्य पूर्वी कसा राहत होता, पूर्वीच्या त्याच्या गरजा काय होत्या, व आतांच्या त्याच्या गरजा काय आहेत, ह्या गोष्टीही विचारांत घेणें जरूर आहेत.

## ६ पोटगी बाबत मुसलमानी कायदा

### मुलगे

मुलांच्या पोटगीबाबत मुसलमानी कायद्यांत नियम आहेत ते असे—

(१) मुलगे जोपर्यंत अज्ञान आहेत तोंपर्यंत बापानें त्यांचें पोषण केलें पाहिजे.

(२) मुलगे सज्ञान झाल्यानंतर त्यांचें पोषण करण्याची जबाबदारी बापावर नाहीं; मात्र, एकाद्या रोगानें अथवा व्यंगानें सज्ञान मुलगे पछाडलें असतील व त्यांना स्वतःचें पोषण करण्याचें सामर्थ्य नसेल, तर बापानें त्यांचें पोषण केलें पाहिजे.

(३) मुलगे अज्ञान असतांना ते आपल्या आईजवळ आहेत व आपल्याजवळ नाहींत, या सबबीवर आपण पोषण करण्यास जबाबदार नाहीं असें बापाला म्हणतां येणार नाहीं.

(४) मुलांची स्वतःची मिळकत असेल तर मात्र त्यांचें पोषण करण्याची जबाबदारी बापावर नाहीं.

(५) बाप गरीब असेल व कष्ट करण्यासारखी त्याची स्थिति नसेल व आई श्रीमंत असेल, तर मुलांचें पोषण करण्याची जबाबदारी आईवर आहे.

( ६ ) आई व बाप दोघेही गरीब असतील व आजा श्रीमंत असेल तर पोषण करण्याची जबाबदारी आजावर पडते.

## मुली

मुलीच्या पोटगीबाबत मुसलमानी कायद्यांत नियम आहेत ते असे—

( १ ) मुली अज्ञान असतांना व अविवाहित असतांना त्यांचें पोषण करण्याची जबाबदारी बापावर आहे.

( २ ) बाप गरीब असेल व श्रम करून पैसा मिळविण्याची त्याच्या अंगीं ताकद नसेल व आई श्रीमंत असेल तर मुलींचें पोषण करण्याची जबाबदारी आईवर आहे.

( ३ ) मुलींची स्वतःची मिळकत असेल तर मात्र त्यांचें पोषण करण्याची जबाबदारी बापावर नाहीं.

## आईबाप

( १ ) ज्यांना ऐपत आहे अशा मुलांनीं आपल्या गरीब आईबापांचें पोषण केलें पाहिजे असा मुसलमानी कायद्याचा नियम आहे.

( २ ) मुलाला वाईट दशा आली तरीसुद्धां मुलानें आपल्या गरीब आईचें पोषण केलें पाहिजे.

( ३ ) मुलगा गरीब असेल पण कांहीं तरी मिळवीत असेल तर त्यानें कांहीं न मिळविणाऱ्या आपल्या बापाचें पोषण केलें पाहिजे, (बेली ४६५–६६ हेदाया १४८)

## आजा–आजी

आजा–आजींचें पोषण करण्याबाबत मुसल्मानी कायद्यांत नियम आहे तो असा,

( १ ) आजा–आजी गरीब असतील तर ज्याप्रमाणें कोणताही मुसल्मानी गृहस्थ आपल्या गरीब बापाचें पोषण करण्यास बांधला गेला आहे. त्याचप्रमाणें आपल्या गरीब आजा–आजींचें पोषण करण्यास तो बांधला गेला आहे.

## इतर–नातलग

निषिद्ध तत्त्वांखालीं ( Within the prohibited degrees ) येणारे नातलग गरीब असतील तर त्यांचें पोषण करण्याची जबाबदारी मुसलमानांवर आहे. मात्र स्वतः गरीब असतांना आपल्या गरीब नातलगांच्या पोषणाची जबाबदारी कोणावरही नाहीं. याबाबतींत आणखी एक नियम लक्षांत ठेवण्यासारखा आहे तो असा कीं, निषिद्ध तत्त्वांखालीं येणारे नातलग मेल्यानंतर त्यांचा वारसा ज्याप्रमाणांत आपणाला येईल त्या प्रमाणांत आपण त्यांचें पोषण करणें जरूर असतें. (बेली ४६७ )

## पत्नी

पत्नी वयांत आल्यानंतर तिचें पोषण करण्याची जबाबदारी नवऱ्यावर आहे. मात्र पत्नीनें नवऱ्याच्या आज्ञा मानल्या पाहिजेत व नवऱ्याच्या अंकित राहिलें पाहिजे. पत्नी नवऱ्याशीं बेईमानी करील अथवा त्याच्या आज्ञा पाळणार नाहीं तर तिचें पोषण करण्याची जबाबदारी नवऱ्यावर नाहीं. (बेली ४४१–४४२ ) ( २१ मुंबई, पान ७७ )

## विधवा

हिंदु कायद्यामध्यें विधवेला पोटगीचा हक्क आहे व या बाबतींत कायद्यानें कितीतरी नियम घालून दिले आहेत. मुसलमानी कायद्यांत मात्र विधवेला पोटगीचा हक्क बिलकूल नाहीं, ( हेदाया १४५, बेली १–४५२–४५४ ); आगामहंमद जाफर वि. कुलसुम, २५ कलकत्ता, पान ९ )

# नमुने

## ७ आईस लिहून दिलेलें पोटगीपत्र

पोटगीपत्र दरसाल रक्कम रुपये ············ चें.

( १ ) ती॥ गंगाभागीरथी मातोश्री ·············· जात ············ धंदा ········ वय ········ राहणार ·········· तालुके ········· यांसी

( २ ) पोटगीपत्र लिहून देणार ·········· जात ·········· धंदा ········· वय ······ राहणार ········· तालुके ······ लिहून देतो पोटगीपत्र ऐसाजे,······

तूं माझी जनक मातोश्री असोन अन्नावस्त्राची योग्य व्यवस्था माझ्या योग्य शक्तीप्रमाणें करणें हें माझें कर्तव्य आहे हें जाणोन तुझें व माझें मतें तुला दरसाल ·············· धान्य ········· व वस्त्र ············ रुपये किंमतीचे अगर रोख रुपये वस्त्राबद्दल देणेचे असा ठराव करून हें पोटगीपत्र तुला मी लिहून देत आहे. ठरल्याप्रमाणें धान्य व कपडे अगर रुपये तुला शके ······ चें सालापासून देणेचे आहे ते मी दरसाल तुला ········· महिना अखेरचे आंत देऊन तुझी पावती घेत जाईन. पावतीशिवाय पोटगी दिल्याबद्दल तक्रार सांगणार नाहीं. सदरप्रमाणें पोटगी तुला देण्यास मी टाळाटाळी केल्यास अगर चुकविल्यास खालील मिळकत तूं या पोटगीपत्राधारें तुझें ताब्यांत घेऊन त्यांतील उत्पन्न तुझें हयातीपर्यंत पोटगीकरितां खात जावे व मिळकतीचा उपभोग घ्यावा. त्याजवरील सरकारी सारा तूं देत जाणें. जमीन माझे कबजांत असून तुला ज्यावेळपावेतों तुझे पोटगीची योग्य व्यवस्था मी करीत आहे तोंपर्यंत जमिनीचा सारा मी देत आहे. सदरहू जमीन तुझे पश्चात् मालकी नात्यानें माझेकडे येण्याची आहे. तुला सदर जमीन दुसऱ्या कोणास गहाण, दान, अगर खरेदी अथवा अन्य प्रकारें तिची विल्हेवाट लावण्यास या लेखावरून अधिकार नाहीं. कदाचित् तसा प्रकार घडल्यास त्यास मी बांधला जाणार नाहीं. फक्त तूं तुझे हयातींत सदर जमिनीचें उत्पन्न उपभोगून त्याचा फाळा वगैरे देत जाणें पलीकडे तुला अन्य प्रकारचा कोणताच अधिकार नाहीं. पोटगीकरिता दिलेल्या मिळकतीचें वर्णन.—

( ३ ) मिळकतीचें वर्णन

( ४ ) येणेंप्रमाणें वर्णनाची जमीन तुझ्या पोटगीस जबाबदार असून सदर पोटगीचा बोजा सदर जमिनीवर ठेवण्यांत आला आहे. यांतील सर्व करार मला व माझे इस्टेटीस व वारसास लागूं आहेत म्हणून लिहून दिलें पोटगीपत्र सही············ ·········ता. ·········माहे ········सन ······इ॥ दस्तुर·········

साक्ष सही अगर आंगठा

१··· ··· ··· ··· ··· ···

२··· ··· ··· ··· ··· ···

## ८ अज्ञान पालन करणारानें लिहून दिलेलें पोटगीपत्र

(१) पोटगीपत्र दरसाल पोटगी रक्कम रुपये ··············· चें ······

(२) मातोश्री ······ जात ······धंदा············वय (वर्षें) ·········

राहणार ··· ··· तालुके ··· ··· यांसी,

(३) पोटगीपत्र बेसमी ············ जात ········· धंदा ···········

वय (वर्षें)·········अज्ञान पालन करणारा जनक बाप········· जात·········

धंदा······वय (वर्षें)·········राहणार·········लिहून दिलें पोटगीपत्र ऐसाजे,

(४) तुम्ही अज्ञानाच्या दत्तक मातोश्री असून स्वतंत्र राहाण्यासाठीं अज्ञानाच्या इस्टेटींतून पोटगी मागितल्यावरून आपसांतील दरसाल ··· ··· ···रुपयेप्रमाणें तुम्हांस पोटगी देण्याचें ठरवून सदर रकमेची पोहोंच तुम्हांस होण्यासाठीं तुम्हांस जमीनी लावून दिल्या त्या खालीलप्रमाणें,—

(५) तालुके······पैकीं ······गांवचे रानांतील जमीन, जमीनीचें वर्णन,—

(६) येणेंप्रमाणें वर्णनाच्या जमिनी तुमचे कबजांत दिल्या आहेत. त्यांचा उपभोग पोटगी रकमेऐवजीं खंडीत करावा. सरकारी सारा वगैरे सर्व मीच देईन. सदर जमिनी तुमचे हयातीपर्यंत तुम्हांस पोटगीसाठीं म्हणून तुमच्या ताब्यांत दिल्या असून तुमचे पश्चात् अज्ञानास परत मालकी नात्यानें मिळावयाच्या आहेत. करितां सदर जमिनीवर बोजा वगैरे उत्पन्न करण्याचा अगर स्वत्वनिवृत्ति करण्यास

तुम्हांस अधिकार नाहीं. तसेंच तुमचे हयातीपर्यंत तुमच्या वहिवाटीस कोणत्याहि प्रकारें अंतर ( हरकत ) आम्ही येऊं देणार नाहीं. म्हणून लिहून दिलें पोटगीपत्र सही······ता. ······माहे ······ सन ······इ ॥ दस्तुर

साक्ष — सही अगर अंगठा

१······················

२ ··· ··············· ····

## ९ पत्नीला लिहून दिलेलें पोटगीपत्र

(१) पोटगीपत्र दरसाल रक्कम रुपये ··· ··· चें

(२) सौभाग्यवती······जात······धंदा······वय··· ···राहणार······ तालुके······इजला

(३) पोटगीपत्र लिहून देणार······जात······ धंदा······ वय (वर्षे ) ······राहाणार······तालुके······लिहून देतो पोटगीपत्र ऐसाजे—

(४) तूं माझी लग्नाची बायको असून तुझें व माझें आतां पटेनासें झालें. म्हणून तुझे पोटगीकरितां माझे व तुझेमध्यें ठरल्याप्रमाणें खालील जमीन पोटगी बद्दल आज देत आहे.

(५) मिळकतीचें वर्णन—

(६) येणेंप्रमाणें जमीन माझे मालकीची असून माझ्या ताब्यांत असलेली तुझे हयातीपर्यंत पोटगी रकमेचा मोबदला म्हणून ती पिकवून खाण्यास दिली आहे. तिचा उपभोग तूं तुझे हयातीपर्यंत घेण्याचा आहे. सदर जमिनीचा सरकारी फाळा ( कर ) वगैरे मी परभारे भागवीत आहे. सदर जमिनीची विल्हेवाट करण्याचा अधिकार तुला नाहीं. तुझे हयातीपर्यंत सदर जमिनीची विल्हेवाट करण्यास मलाही हक्क नाहीं. तुझे हयातीनंतर सदर जमीन मालकीनात्यानें मजकडे परत येण्याची आहे. सदरचे करार मला व माझे वारसास लागूं आहेत. सदरहू जमीन आजरोजीं मी तुझे ताब्यांत दिली आहे. मी राजीखुषीनें हें पोटगीपत्र लिहून दिलें आहे म्हणून लिहून दिलें पोटगीपत्र सही·········तारीख·········माहे·········सन·········इ॥

साक्ष — सही अगर आंगठा

१··· ··· ··· ··· ··· ··· — ··· ··· ··· ··· ··· ···

२··· ··· ··· ··· ··· ···

## प्रकरण २ रें

# दत्तक पुत्र व दत्तकपत्र

### १० दत्तक घेण्याचा उद्देश

दत्तक घेण्याचा उद्देश दोन प्रकारचा आहे (१) धार्मिक व (२) व्यवहारिक. धार्मिक उद्देश असा कीं, आपण मेल्यानंतर उत्तरक्रिया करण्याकरितां, आपल्या पिंड व पाणी देण्याकरितां व आपली धार्मिक उन्नति करण्याकरितां कोणीतरी हक्काचा माणूस असावा. व्यावहारिक उद्देश असा कीं, आपली इस्टेट दत्तक मुलाला मिळावी व त्यानें आपलें नांव चालवावें.

### ११ दत्तक कायदेशीर होण्याकरितां कोणकोणत्या गोष्टी आवश्यक आहेत ?

दत्तक कायदेशीर होण्याकरितां खालील गोष्टी आवश्यक आहेत:—

(१) दत्तक घेणारा मनुष्य दत्तक घेण्यास कायदेशीर तऱ्हेनें पात्र असला पाहिजे.

(२) दत्तक देणारा मनुष्य दत्तक देण्यास कायदेशीर रीतीनें पात्र असला पाहिजे.

(३) दत्तक मुलगा दत्तक घेण्यास कायदेशीर रीतीनें पात्र असला पाहिजे.

(४) दत्तक देण्याघेण्याचे वेळीं " दान व प्रतिग्रह " हे आवश्यमेव झाले पाहिजेत.

(५) " दत्तहोम " केला असला पाहिजे–प्रत्येक बाबतींतदत्तकहोमाची आवश्यकता आहे असें नाहीं.

### १२ दत्तक घेण्यास पात्र असलेले लोक

#### दत्तक घेणारा पुरुष

दत्तक घेणारा पुरुष चांगल्या मनःस्थितींत असेल व सारासार विचार करण्याइतपत त्याचें वय झालें असेल, तर त्यास दत्तक घेतां येतो; मात्र दत्तक घेण्याचे वेळीं त्याचा स्वतःचा मुलगा, मुलाचा मुलगा ( नातू ) अथवा मुलाच्या मुलाचा मुलगा ( पणतू ) जिवंत असतां कामा नये.

दत्तक घेणारा मनुष्य ब्रह्मचारी असेल अथवा विधूर असेल अगर त्याच्या बायकोची दत्तकास संमति नसेल, किंवा त्याची बायको गरोदर असेल तरी देखील अशा मनुष्यानें दत्तक घेतला तर कायद्यानें त्यास प्रतिबंध नाहीं.

## दत्तक घेणारी स्त्री

नवरा जिवंत असतांना नवऱ्याच्या संमतीशिवाय कोणत्याही स्त्रीस दत्तक घेण्याचा अधिकार नाहीं.

नवरा मेल्यानंतर विधवेला दत्तक घेण्याचा अधिकार आहे. आपल्या बायकोला आपल्या पश्चात् दत्तक घेण्याचा आधिकार नवऱ्याला देतां येतो. अशा तऱ्हेचा अधिकार फक्त बायकोलाच देतां येतो, इतर दुसऱ्या कोणाला देतां येत नाहीं. दोन अगर अधिक सवतीपैकीं जिला दत्तक घेण्याचा अधिकार दिला असेल तिनेंच हा अधिकार वापरणेचा असतो. दोन अगर अधिक सवतीपैकीं प्रत्येकीला दत्तक घेण्याचा अधिकार नवऱ्यानें वेगवेगळा दिला असेल, तर जी मोठी सवत असेल तिनें हा अधिकार प्रथम वापरणेचा असतो.

## १३ दत्तक देण्यास पात्र असलेले लोक

दत्तक देण्यास पात्र असलेले लोक दोनच आहेत, आणि ते म्हणजे बाप व आई हे होत. दत्तक देण्याचा अधिकार बापास आहे. बाप जिवंत असतांना त्याच्या परवानगीशिवाय आईस दत्तक देतां येत नाहीं.

दत्तक देण्याचा अधिकार बाप व आई या दोघांनाच आहे व हा अधिकार दुसऱ्या कोणास त्यांना देतां येत नाहीं.

दत्तक देणारा मनुष्य चांगल्या मनःस्थितींत असला पाहिजे व त्याचें वय सारासार विचार करण्याइतपत असलें पाहिजे.

## १४ दत्तक मुलगा

ज्या मुलाला दत्तक घ्यावयाचा आहे तो दत्तक घेण्यास कायदेशीर रीतीनें पात्र असला पाहिजे. याबाबतींत खालील गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत.:—

( १ ) ज्याला दत्तक घ्यावयाचा आहे तो पुरुष असला पाहिजे. कोणत्याही मुलीस अथवा स्त्रीस कायद्यानें दत्तक घेतां येत नाहीं.

( २ ) ज्या जातीचा दत्तक बाप असेल त्याच जातीचा मुलगा असला पाहिजे. ( जात पहातांना ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार जाती पहाण्याच्या असतात; या चार जातीमध्यें ज्या उपजाती आहेत त्या पहाण्याचें कारण नाहीं. उदाहरणार्थ-एकाद्या कोंकणस्थ बापानें देशस्थ मुलगा दत्तक घेतला तरी हरकत नाहीं.)

(३) जो मुलगा दत्तक घेण्याचा तो मुलीचा मुलगा, बहिणीचा मुलगा अथवा मावशीचा ( आईच्या बहिणीचा ) मुलगा असतां कामा नये. ( हा नियम शूद्रांना लागूं नाहीं. वरच्या तीन जातीमध्यें देखील मुलीचा मुलगा अथवा बहिणीचा मुलगा, अगर मावशीचा मुलगा दत्तक घेण्याची चाल असेल तर असा मुलगा देखील दत्तक घेण्यास हरकत नाहीं. )

(४) दत्तक मुलगा कितीही वयाचा असला तरी कायदा त्याबद्दल कांहीं म्हणत नाहीं; कारण इतकेंच काय पण दत्तक मुलगा दत्तक घेणाऱ्यापेक्षां देखील वयानें मोठा असला, अथवा दत्तक मुलगा विवाहित असला, अगर दत्तक मुलाला मुलें असलीं तरी देखील असा मुलगा दत्तक घेण्यास हरकत नाहीं. ( दत्तक मुलाचें वय किती असलें पाहिजे याबद्दल निरनिराळे प्रांतात निरनिराळे नियम आहेत, ते सर्व नियम पहाण्याचें आपणांस कारण नाहीं. मुंबई इलाख्यापुरतें अथवा मराठी बोलणाऱ्या प्रांतापुरता हा नियम आहे. )

(५) दत्तक मुलगा आपल्या जनक बापाचा एकुलता एक मुलगा असेल तरी देखील असा मुलगा दत्तक घेण्यास हरकत नाहीं.

(६) ज्या मुलास आईबाप नाहींत अशा मुलास दत्तक घेतां येत नाहीं. ( मात्र असा मुलगा दत्तक घेण्याची चाल असेल तर असा मुलगा दत्तक घेतां येईल.)

(७) जवळचे नातेवाईक असतांना लांबच्या नातेवाईकास अगर अजिबात तिऱ्हाईत मनुष्यास दत्तक घेतलें तरी कायद्याचा प्रतिबंध नाहीं.

## १५ दान व प्रतिग्रह

दत्तकाच्या बाबतींत अत्यंत आवश्यक असणारी गोष्ट म्हणजे दान व प्रतिग्रह हीं होय. दान व प्रतिग्रह याचा अर्थ दत्तक मुलास कोणीतरी प्रत्यक्ष दत्तक दिला पाहिजे व कोणीतरी प्रत्यक्ष दत्तक घेतला पाहिजे. ही देण्याची व घेण्याची

प्रत्यक्ष क्रिया झाली नसेल तर कोणतेंही दत्तविधान कायदेशीर नाहीं. हा नियम ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या सर्वत्रांना सारखाच लागू आहे. हा नियम इतका कडक आहे कीं, दत्तक देण्याची व घेण्याची प्रत्यक्ष क्रिया झाली नसतांना दत्तकपत्र होऊन तें नोंदलें असेल अगर दत्तक पत्राबद्दल जाहिराती काढल्या असतील तरी तें दत्तविधान कायदेशीर होत नाहीं.

## १६ दत्तहोम

दत्तविधान करतांना दत्तहोम करतात. शूद्र अगर जैनांचे बाबतींत दत्त-होमाची आवश्यकता नाहीं. वरच्या तीन जातीमध्यें दत्तक बापाचें व जो मुलगा दत्तक घ्यावयाचा त्या मुलाचें गोत्र एकच असेल तर दत्तहोमाची जरूरी नाहीं.

हे अपवाद सोडले तर मुंबई इलाख्यांत अथवा मराठी बोलणाऱ्या प्रांतांत दत्तहोमाची आवश्यकता आहे, दत्तक देण्याघेण्याची प्रत्यक्ष क्रिया झाल्यानंतर केव्हांही दत्तहोम करण्यास हरकत नाहीं.

## १७ दत्तक मुलाचे अधिकार

दत्तक मुलाला औरस मुलाइतकेच अधिकार मिळतात. दत्तक झाल्यानंतर जनक घरण्याच्या इस्टेटीवरचा त्याचा हक्क नाहींसा होतो व त्याला दत्तक घरा-ण्यांतील इस्टेटीवर अधिकार मिळतो.

मुलगा दत्तक घेतल्यानंतर दत्तक बापास औरस मुलगा झाला तर दत्तक मुलगा व औरस मुलगा यांचे अधिकार सारखे असत नाहींत. दत्तक मुलगा व औरस मुलगा यांच्यामध्यें दत्तक मुलाला कितवा हिस्सा मिळतो याबद्दल निर-निराळे नियम आहेत. आपल्या प्रांतापुरता नियम असा कीं, दत्तक मुलास इस्टे-टीचा पांचवा भाग मिळतो.

## १८ दत्तकपत्राबाबत लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी

(१) दत्तकपत्रांत जो मुलगा दत्तक घेण्याचा त्याचें पूर्ण वर्णन केलेलें असावें.

(२) दत्तविधानास दान व प्रतिग्रह या गोष्टी आवश्यक असल्यामुळें दान प्रतिग्रह योग्य तऱ्हेनें झाला आहे असें दत्तक पत्रांत लिहावें.

(३) दत्तविधानाचे वेळीं कांहीं धार्मिक समारंभ केले असतील तर त्यांचाहि उल्लेख दत्तकपत्रांत करावा.

(४) जो मनुष्य दत्तक घेतो त्यानें दत्तकपत्र करून देण्याचें असतें. जो मनुष्य दत्तक देतो त्यानें दत्तकपत्र करून देण्याची जरूरी नाहीं.

(५) कायद्यानें दत्तकविधानाकरितां दत्तकपत्र पाहिजेच असा नियम नसला तरी पुराव्याच्या दृष्टीनें दत्तकपत्राचें महत्त्व बरेंच असल्यामुळें दत्तकपत्रांतील मजकूर शक्य तितका काळजीपूर्वक लिहावा.

## १९ दत्तकपत्रास व अधिकारपत्रास लागणारा स्टँप

दत्तकपत्रास पूर्वी १० रुपयांचा स्टँप लागत असे, पण आतां फी वाढविण्यांत आली आहे. मद्रासमध्यें १५ रुपयांचा स्टँप लागतो व मुंबई, मध्यप्रांत आणि विहार यांत २० रुपयांचा स्टँप लागतो.

दत्तक घेण्यासंबंधींच्या अधिकारपत्रास पूर्वी १० रुपयांचा स्टँप लागत असे, पण आतां हा स्टँप वाढविण्यांत आला आहे. मद्रासमध्यें १५ रुपयांचा स्टँप लागतो व मुंबई, मध्यप्रांत आणि विहार यांत २० रुपयांचा स्टँप लागतो. मृत्युपत्रांत दत्तकाचा उल्लेख असेल अथवा मृत्युपत्रांत दत्तक घेण्यासंबंधींचा अधिकार देण्यांत आला असेल तर स्टँपाची आवश्यकता नाहीं. ( सरचार्जाबाा खरेदीच्या प्रकरणांत दिलेली माहिती पहा )

## नोंदणीची आवश्यकता आहे किंवा नाहीं

दत्तक पुत्रास नोंदणीची आवश्यकता नाहीं. जास्त बळकटी येण्याकरितां दत्तकपत्र नोंदण्यास हरकत नाहीं, परंतु दत्तकपत्र नोंदलेलेंच पाहिजे असा नियम नाहीं.

दत्तक घेण्यासंबंधीचें अधिकारपत्र मात्र नोंदलेलेंच पाहिजे. हा अधिकार मृत्युपत्रांत दिला असेल, तर मात्र नोंदणीची आवश्यकता नाहीं.

### नमुने

दत्तकपत्र व दत्तक घेण्यासंबंधींचें अधिकारपत्र, याबद्दलचे कांहीं नमुने याखालीं दिले आहेत. या नमुन्यांत प्रसंगोपात कमी अधिक मजकूर घालतां येईल. या नमुन्यावरून दत्तकपत्र अगर दत्तक घेण्यासंबंधींचे अधिकारपत्र कसें लिहावें याबद्दल सर्वसाधारण कल्पना येऊं शकेल.

## २० फारसा मजकूर नसलेलें दत्तकपत्र

दत्तकपत्र लिहून घेणार ··· ··· ··· ··· ··· ······( नांव, गांव वगैरे ) अज्ञान असेल तर अज्ञान पालन करणारा बाप अगर आई··· ··· ···( नांव, गांव वगैरे ) यासी दत्तकपत्रक लिहून देणार··· ··· ··· ··· ···( नांव, गांव वगैरे ) दत्तकपत्रक लिहून देतो ऐसाजे—

(१) मी तुला··················( दत्तक मुलाचें नांव वय वगैरे ) आज रोजीं माझा मुलगा म्हणून दत्तक घेतलें आहे, तुला व तुझ्या बापानें ( अगर आईनें ) मला दत्तक दिलें आहे.

(२) दान व प्रतिग्रह व हिंदु कायद्याप्रमाणें जरूर असणारे इतर धार्मिक समारंभ झालेले आहेत.

(३) तुला मी आजरोजीं दत्तक घेतला असल्यामुळें तुला आजपासून दत्तक मुलाचे सर्व कायदेशीर हक्क प्राप्त झाले आहेत.

(४) हें दत्तकपत्र मी आपल्या राजीखुषीनें व अक्कलहुषारीनें आणि चांगल्या मनःस्थितींत असतांना लिहून दिलें आहे. हें मला वांचून दाखविल्यावर त्याखालीं मी आपली सही अगर आंगठा केला आहे.

साक्ष तारीख······················

१ ························

सही ( अगर आंगठा दस्तूरसह )

२ ························

## २१ विशिष्ट मजकूर असलेलें दत्तकपत्र

दत्तकपत्र लिहून घेणार························( नांव, गांव वगैरे )— ( अज्ञान असेल तर अज्ञान पालन करणार बाप अगर आई )················ ( नांव, गांव वगैरे ) यांसी दत्तकपत्र लिहून देणार················( नांव, गांव वगैरे ) दत्तकपत्र लिहून देतो ऐसाजे——

(१) आज बरेंच दिवसांपासून माझी प्रकृति बिघडली असून या दुखण्यांतून मी उठेन असा मला भरंवसा नाहीं. मला पुत्रसंतान नसल्यानें माझा वंश पुढें चालविण्याकरितां मी दत्तक घ्यावा अशी माझी व माझ्या बायकोची फार इच्छा आहे.

(२) तूं दत्तक घेण्यास योग्य आहेस असें मला व माझ्या बायकोस वाटत आहे.

(३) करितां मी तुला आज............(तारीख) गांवची पंचमंडळी तुझे व माझे भाऊबंद, ब्राह्मण, भिक्षुक वगैरे लोकांदेखत तुला मी शास्त्रोक्त-विधि करून दत्तक घेतला आहे.

(४) तुझे वडील (अगर आई) यांनीं तुला माझ्या मांडीवर दत्तक म्हणून स्वीकारून तुझ्या तोंडांत साखर घातली.

(५) हिंदु कायद्याप्रमाणें दत्तविधानास जे जे धार्मिक समारंभ जरूर आहेत ते ते सर्व करण्यांत आले आहेत.

(६) तुझें नांव दत्तकानंतर............असें मी ठेविलें आहे. यापुढें तूं माझ्या औरस मुलांप्रमाणें माझ्या इस्टेटीचा उपभोग घ्यावयास व माझें क्रिया-कर्मांतर करून माझ्या वंशाचें नांव चालवावें. तुला आजरोजीं मी दत्तक घेतल्या-कारणानें दत्तक मुलाला कायद्यानें मिळणारे सर्व अधिकार तुला प्राप्त झाले आहेत.

(७) माझ्या मागें माझी आई......व माझी बायको......या आहेत. त्यांची तूं चांगली व्यवस्था ठेवावीस अशी माझी इच्छा आहे. माझ्यामागें तूं चांगल्या प्रकारें वर्तन ठेवून माझ्या कुळाचें नांव चालविशील या उमेदीनें तुला मी आजरोजीं दत्तक घेतला आहे

(८) हें दत्तकपत्र मी राजीखुषीनें व अक्कल हुषारीनें आणि समजण्याच्या मनःस्थितींत असतांना लिहून दिलें आहे तें वांचून दाखविल्यावर त्याखालीं मी आपली सही अगर आंगठा केला आहे.

**साक्ष** मुक्काम.........तारीख............

१...................

**सही** (अगर आंगठा दस्तुर सह)

२...................

---

**टीपः**—दत्तक घेणाऱ्याच्या स्थावर जंगम इस्टेटीचे वर्णन देणेंचें असल्यास दत्तकपत्रांत देण्यास हरकत नाहीं.

## २२ दत्तक घेण्यासंबंधी अधिकारपत्र

दत्तक घेण्यासबंधींचे अधिकारपत्र लिहून घेणार······( नांव, गांव वगैरे ) हिला लिहून देणार·······( नांव, गांव वगैरे ) अधिकारपत्र लिहून देतो ऐसाजे—

(१) तूं माझी धर्मपत्नी असून आतां आपणांस संतति होण्याची आशा नसल्यामुळें व माझ्या देहाचा भरंवसा नसल्यामुळें माझा वंशवेल चालावा आणि माझें क्रियाकर्मांतर वगैरे धर्माप्रमाणें व्हावें या उद्देशानें माझे पश्चात् तुझे इच्छे-प्रमाणें दत्तक घेण्याचा मी तुला अधिकार देत आहे.

(२) तूं याप्रमाणें दत्तक मुलगा घेतलास व दुर्दैवानें तो मयत झाल्यास आणि त्याचे पश्चात् त्याला मुलगा अगर बायको नसल्यास तुझ्या इच्छेप्रमाणें दुसरा मुलगा दत्तक घेण्याचा मी तुला अधिकार देत आहे.

(३) माझी दुसरी बायको +++ ( नांव, गांव वगैरे ) हिला मी हा अधिकार देत नाहीं. माझ्या पश्चात् कोणी दत्तक घेणेचा याबद्दल वाद राहूं नये म्हणून तुला मी हें अधिकार पत्र देत आहे ( अधिकारपत्र देणाऱ्यास दुसरी बायको असेल तरच हा मजकूर लिहिणेचा आहे. )

(४) हें अधिकारपत्र मी राजीखुषीनें अक्कल हुषारीनें व समजणेच्या मन:स्थितींत असतांना लिहून दिलें आहे तें वांचून दाखविल्यावर त्याखालीं मी आपली सही अगर आंगठा केला आहे.

साक्ष

१ ··· ··· ··· ··· ··· ···

२ ··· ··· ··· ··· ··· ···

मुक्काम·········तारीख·········

सही ( अगर आंगठा दस्तूरसह )

## २३ विधवेनें लिहून दिलेलें दत्तकपत्र

दत्तकपत्र लिहून घेणार············ ( नांव, गांव वगैरे )–मुलगा अज्ञान असेल तर अज्ञान पालन करणार बाप अगर आई········· ( नांव, गांव वगैरे ) यांसी दत्तकपत्र लिहून देते ऐसाजे—

(१) माझे यजमान·········( नांव ) ता.········· रोजीं मयत झाले. आम्हांला पुत्रसंतति नसल्यामुळें दत्तक घ्यावा अशी त्यांची फार इच्छा होती. त्यांच्या इच्छेला अनुसरून मी तुला दत्तक म्हणून घेतला आहे.

(२) तुला तुझ्या वडिलांनीं ( अगर आईनें ) मला दत्तक दिला व मी तुला दत्तक म्हणून घेतला. दान व प्रतिग्रह आणि हिंदु कायद्याप्रमाणें जरूर असणारे सर्व धार्मिक समारंभ झालेले आहेत.

(३) माझे यजमान............( नांव ) यांचा मुलगा म्हणून मी तुला आज दत्तक घेतला आहे व आजपासून दत्तक मुलाला मिळणारे सर्व अधिकार तुला प्राप्त झाले आहेत.

(४) इस्टेटबाबत अगर आणखी कांहीं खुलासा करण्याकरितां मजकूर लिहिणेचा असल्यास तो लिहावा.

(५) हें दत्तकपत्र मी राजीखुषीनें व अक्कलहुषारीनें आणि समजण्याच्या मनःस्थितींत असतांना लिहून दिलें आहे. तें वाचून दाखविल्यावर त्यावर मी आपली सही अगर आंगठा केला आहे.

साक्ष

१ ... ... ... ... ... ...

२ ... ... ... ... ... ...

मुक्काम ... ... ... तारीख ... ...

सही ( अगर आंगठा दस्तुरसह )

## प्रकरण ३ रें

# विवाह

## २४ विवाहसंस्था मानव जातीच्या जन्मापासून अस्तित्वांत आहे कां ?

पुष्कळ लोकांना असें वाटतें कीं, विवाह संस्थेचा जन्म मानव जातीच्या जन्माबरोबरच झाला असावा; पण त्यांचें हें मत चुकीचें आहे. ज्या विद्वानांनीं मानव जातीच्या उत्पत्तीपासून त्याच्या पुढील स्थित्यंतराचा अभ्यास करण्यांत आपलें आखिल आयुष्य खर्च केलें, अशा लोकांमध्यें सर जॉन् लबक, बॅको फेन, एम्. लेनन् व मॉर्गन् यांची गणना होते. हे सर्व विद्वान् एकमुखानें असें प्रतिपादतात कीं, मानव जातीच्या उत्पत्तीनंतर बरेंच दिवसपर्यंत ज्याला विवाह संस्था म्हणतां येईल अशी संस्था अस्तित्वांत नव्हती; तर त्यावेळीं ज्याला "सामाजिक लग्न पद्धति" म्हणतां येईल अशी पद्धति अमलांत होती.

## २५ सामाजिक लग्नपद्धति म्हणजे काय ?

"सामाजिक लग्न" म्हणजे एखाद्या विशिष्ट समाजामध्यें प्रत्येक पुरुष प्रत्येक स्त्रीचा नवरा व त्या समाजांतील प्रत्येक स्त्री प्रत्येक पुरुषाची बायको, या भावनेनें सुरूं झालेला व्यवहार. एखाद्या विशिष्ट समाजांतील सर्व स्त्रियांशीं विवाहबद्ध आहेत असें समजून चालणारा समाज फार पूर्वी होता; व त्यांच्यामध्यें "सामाजिक लग्न पद्धति" प्रचलित होती. प्रश्न असा कीं, अशा सामाजिक लग्नाला 'विवाह' ही संज्ञा देता येईल कां? अशा लग्नाला जर विवाह हें गोंडस व भारदस्त नांव द्यावयाचें झालें तर कुत्र्यामध्यें सुद्धां विवाह रुढ आहे असें म्हणण्याची आपणावर खास पाळी येईल! कोणचाही कुत्रा कोणच्याही कुत्रींशी विवाहबद्ध आहे असें समजून कुत्र्यांचे व्यवहार होत असतात, अशा परिस्थितींत 'कुत्रा विवाह' ह्यांत जो विवाहाचा अर्थ आहे तोच अर्थ 'सामाजिक लग्न' ह्यांत लग्नाचा अर्थ आहे. निरनिराळ्या पाश्चात्य तज्ज्ञांचीं मतें पाहिलीं म्हणजे असें दिसतें कीं पूर्वीच्या काळचा स्त्री पुरुष संबंध शारिरीक भुकेच्या दृष्टीनें होता; पण समाज जसजसा सुधारूं लागला, तसतसें सामाजिक, धार्मिक, व्यवहारिक नियम बनूं लागले; व ज्याला आपण विवाहसंस्था म्हणतों ती अमलांत आली.

## २६ या बाबतींत आपल्या पूर्वजांचें मत

आपल्या पूर्वजांच्या मतें देखील फार प्राचीन काळीं स्त्री-पुरुष संबंधाबद्दल फारसें नियंत्रण नसें; पण पुढें ह्याबद्दल नियंत्रण घालण्यांत येऊन 'विवाहसंस्था' निर्माण झाली. महाभारतांत आदि पर्वांतील १२२ व्या अध्यायांत श्वेतकेतूची गोष्ट दिली आहे, ती या दृष्टीनें बघण्यासारखी आहे. श्वेतकेतू मुनीच्या वेळीं नवरा-बायकोला वाटेल त्याचे बरोबर वाटेल तेव्हां 'गमन' करतां येत असे. एखाद्या परपुरुषाबरोबर क्रीडा करण्याकरितां बायको गेली तरी तो तिच्या मर्जीचा अथवा खुषीचा प्रश्न असे; नवऱ्याच्या नवरेपणाचा हक्क तिच्या आड येत नसे. एकदां श्वेतकेतू आपल्या झोंपडीत बसला असतांना एक "शिळ घालणारे शिष्ट" तेथें आले; लगेच श्वेतकेतूची आई त्या "शिष्टा" बरोबर मजा व मौज करण्यास

72077

निघून गेली ! आपल्या ह्या आईच्या वर्तनाचा श्वेतकेतूला संताप आला व त्यानें त्यासंबंधीं आपल्या बापास विचारलें पण पितृदेव शांतपणें उत्तरलें—“ अरे, त्यांत इतकें रागावण्यासारखें काय आहे ? हा तिच्या मर्जीचा प्रश्न आहे ” श्वेतकेतूला हा युक्तिवाद पटला नाहीं व त्यानें बराच विचार करून विवाहाची बंधनें घातलीं. तेव्हांपासून विवाहसंस्था आपल्याकडे सुरूं झाली.

## २७ हिंदु कायद्याप्रमाणें लग्नाचें निरनिराळे प्रकार

हिंदु कायदेपंडितांनीं लग्नाचें आठ प्रकार सांगितले आहेत ते प्रकार मनूनें खालील श्लोकांत दिले आहेत.

**ब्राह्मो दैवस्तथैवार्ष : प्राजापत्यस्तथासुर :**
**गान्धर्वो राक्षसश्चैव पैशाचश्चाष्टमोऽधम : ॥**

मनु : ३–२१

लग्नाचे आठ प्रकार असे :—

**(१) ब्राह्म विवाह (२) दैव विवाह (३) आर्ष विवाह (४) प्राजापत्य विवाह (५) आसुर विवाह (६) गांधर्व विवाह (७) राक्षस विवाह (८) पैशाच विवाह.**

## १ ब्राह्म विवाह

**आच्छाद्य चार्चयित्वा च श्रुतिशीलवते स्वयम् ।**
**आहूय दानं कन्याया ब्राह्मो धर्म : प्रकीर्तित: ॥**

मनु ३–२७

ब्राह्म विवाहांत वेदपारंगत अशा वराला आपणहून मुलीचा बाप बोलावतो व वस्त्रालंकारानें भूषित केलेली आपली कन्या त्याला अर्पण करतो.

## २ दैव विवाह

**यज्ञे तु वितते सम्यगृत्विजे कर्मकुर्वते ।**
**अलंकृत्य सुतादानं दैवं धर्म प्रचक्षते ॥**

मनु ३–२८

दैव विवाहांत यज्ञ सुरूं असतांना यज्ञ चालविणाऱ्या ऋत्विजाला उत्तम पोषाख केलेल्या कन्येचें दान दिलें जातें.

## ३ आर्ष विवाह

**एकं गोमिथुनं द्वे वा वरादादाय धर्मतः ।**
**कन्याप्रदानं विधिवदार्षो धर्मः सउच्यते ॥**

मनु ३-२९

जेव्हां वरापासून गाईची एक जोडी अगर दोन जोड्या घेऊन पिता आपली कन्या वराला देतो तेव्हां त्या विवाहाला आर्ष विवाह म्हणतात.

## ४ प्रजापत्य विवाह

**सह नौ चरतां धर्ममिति वाचाऽनुभाष्य ।**
**कन्या प्रदानमभ्यर्च्य प्राजापत्यो विधिः स्मृतः ॥**

मनु. ३-३०

जेव्हां "तुम्ही दोघांनीं मिळून धर्मकृत्यें करावींत" असें म्हणून पिता सन्मानपूर्वक कन्यादान करतो, तेव्हां त्या विवाहास प्राजापत्य विवाह असें म्हणतात.

## ५ आसुर विवाह

**ज्ञातिभ्यो द्रविणंदत्वा कन्यायै चैव शक्तितः ।**
**कन्याप्रदानं स्वाच्छन्द्यादासुरो धर्मोऽच्यते ॥**

मनु ३-३१

जेव्हां वधूचा बाप व इतर नातलग आणि वधू यांना आपल्या शक्तीप्रमाणें पैसे देऊन वरवधूचें पाणिग्रहण करतो तेव्हां अशा विवाहास आसुर विवाह असें म्हणतात.

## ६ गांधर्व विवाह

**इच्छया न्योन्यसंयोगकन्यायाश्च वरस्य च ।**
**गान्धर्वः स तु विज्ञेयोः मैथुन्यः कामसंभवः ॥**

मनु ३-३२

जेव्हां परस्परांच्या इच्छेनें वधुवरांचा विवाह होतो, तेव्हां त्या विवाहास गान्धर्व विवाह असें म्हणतात. कामपूर्तीकरतां मुख्यत्वेंकरून हा विवाह होत असतो.

## ७ राक्षस विवाह

**हत्वा छित्वा च भित्त्वा च क्रोशन्तीं रुदतीं गृहात् ।**
**प्रसह्य कन्याहरणं राक्षसो विधिरुच्यते ॥**

मनु ३-३३

जेव्हां वधू रडून मदतीची याचना करीत असतांना, तिचे नातलग आणि मित्र युद्धामध्यें मृत झाले असतांना अथवा जखमी झाले असतांना, आणि त्यांचीं घरें फोडलीं गेली असतांना बळजबरीनें वधूला नेण्यांत येऊन तिच्याशीं लग्न करण्यांत येतें, तेव्हां अशा विवाहास राक्षसविवाह असें म्हणतात.

## ८ पैशाच विवाह

**सुप्तां मत्तां प्रमत्तांच रहो यत्रोपगच्छति ।**
**स पापिष्ठो विवाहानां पैशाचश्चाष्टमोऽधमः ॥**

मनु ४-३३

जेव्हां वधू निजली असतांना अथवा दारू मद्य पेयामुळें धुंदींत असतांना अगर शुद्धीवर नसतांना गुप्तपणानें वर तिला आलिंगन देतो, तेव्हां अशा विवाहास पैशाच विवाह म्हणतात.

ह्या आठ प्रकारांपैकीं पहिलें चार प्रकार म्हणजे (१) ब्राह्म (२) दैव (३) आर्ष (४) प्राजापत्य हे 'शिष्टसंमत' होत व बाकीचे चार प्रकार म्हणजे (१) आसुर (२) गांधर्व (३) राक्षस (४) पैशाच, हे 'शिष्ट तिरस्कृत' होत.

## २८ विवाहाच्या प्रकाराबद्दल कायद्याचें अनुमान

हल्लीं ब्राह्म व आसुर असें दोनच हिंदु विवाहाचे प्रकार चालू आहेत; व त्याबाबतींत कायद्याचें अनुमान असें आहे कीं, जेंव्हा दुसरा कोणताही पुरावा नसेल तेव्हां हिंदु विवाह ब्राह्म प्रकारानें झाला आहे असें समजावें. याचा अर्थ असा कीं, विरुद्ध पुरावा नसेल तर वधूचा बाप अगर पालक यांनीं वरपक्षाकडून कांहीं पैसे घेतले नाहींत असें समजावें. असे कायद्याचे अनुमान असलें तरी वधूपक्षानें वरपक्षाकडून पैसे घेऊन लग्न समारंभ केला, याबद्दल कोर्टात पुरावा देतां येईल व हा पुरावा जर विश्वसनीय ठरला तर झालेलें लग्न आसुर प्रकारचें आहे असें मानण्यांत येईल.

एखादा विवाह ब्राह्म पद्धतीनें झाला अगर आसुर पद्धतीनें झाला, ह्या प्रश्नाचें महत्त्व असें कीं, ब्राह्म पद्धतीनें विवाह झालेली स्त्री मयत झाली तर तिच्या स्त्रीधनाचा वारसाक्रम वेगळ्या प्रकारचा आहे; व आसुर पद्धतीनें लग्न झालेली स्त्री मयत झाली तर तिच्या स्त्रीधनाचा वारसाक्रम निराळ्या प्रकारचा आहे.

## २९ विवाहांत जरूर असणारे समारंभ

कायद्याच्या दृष्टीनें पहाण्याचे झाल्यास हिंदु विवाह ब्राह्म पद्धतीनें झालेला असो अगर आसुर पद्धतीनें झालेला असो तो पुरा होण्यास इतक्या सर्व समारंभाची आवश्यकता नाहीं-तर दोनच समारंभांनीं हिंदु विवाह कायद्याच्या दृष्टीनें पूर्ण होतो.

**(१) विवाह अग्निपुढचा समारंभ अगर विधी.**

**(२) सप्तपदीचा विधि अगर समारंभ.**

सप्तपदीमधील सातवें पाऊल टाकल्यानंतर विवाह पूर्ण झाला असें समजण्यांत येतें-तोंपर्यंत म्हणजे सप्तपदींतील सातवें पाऊल टाकण्याच्यापूर्वी केव्हांही विवाह मोडतां येतो.

## ३० हिंदु विवाह हा एक संस्कार आहे करार नव्हे

**निषेकाद्याः स्मशानान्तास्तेषां वै मन्त्रतः क्रियाः।**
**एवमेनः शमं याति बीजगर्भसमुद्भवम् ॥**

आपल्या पूर्वजांनीं निरनिराळें दहा संस्कार सांगितले आहेत व त्या दहा संस्कारापैकींच लग्न हा एक संस्कार आहे. ह्या संस्कारामुळें बीज-गर्भा-पासून उत्पन्न होणारा दोष नाहींसा होतो अशी आपली समजूत आहे.

इतर देशांत लग्न हा संस्कार नसून एक करार आहे व वधूवरांची इच्छा हें त्या कराराचें मुख्य अंग आहे.

## ३१ कायद्याच्या दृष्टीनें लग्नानंतर उत्पन्न होणारे अधिकार व बंधनें कोणती ?

नवऱ्याच्या बाबतींत लग्नानंतर उत्पन्न होणारे अधिकार व बंधनें अशीं—

(१) बायको अज्ञान असेपर्यंत नवरा तिचा कायदेशीर अज्ञान पालक असतो.

(२) लग्नानंतर शरीरसुख घेण्याचा नवऱ्याला अधिकार आहे; मात्र बायकोस रजोदर्शन होण्याच्या आंत हा अधिकार नवऱ्यास मिळत नाहीं.

हल्लीं शारदा कायदा पास झाल्यामुळें चवदा वर्षांच्या आंत स्त्रीचें लग्न करतां येत नाहीं. चवदा वर्षपर्यंत रजोदर्शन होत असल्यामुळें हल्लीं असेंच म्हणतां येईल कीं, लग्नानंतर शरीरसुख घेण्याचा नवऱ्याला अधिकार आहे. लग्नानंतरही बायको नवऱ्याच्या घरीं जाणेस तयार नसेल तर त्याला त्या बाबतींत तिच्यावर कोर्टांत दावा लावतां येईल. पुराव्यांत जर असें आले कीं—

(अ) नवऱ्यास अत्यंत घाणेरडा रोग आहे.

(आ) अथवा त्यानें आपल्या घरांत रखाऊ ठेवली आहे.

(इ) अगर त्याची वागणूक अत्यंत दुष्ट आहे.

(ई) अगर त्यानें दुसरा धर्म स्वीकारला आहे.

तर मात्र कोर्ट नवऱ्याच्या वतीनें निकाल देणार नाहीं.

(३) लग्नानंतर बायकोला पोसलीच पाहिजे असें नवऱ्यावर कायदेशीर बंधन आहे.

(४) प्रघात असल्याशिवाय नवऱ्याला बायकोस सोडचिठ्ठी देतां येणार नाहीं.

(५) बायको जर नवऱ्याच्या आधी मयत झाली तर तिच्या मिळकतीस जे वारस सांगितले आहेत, त्यांत नवऱ्याचा समावेश आहे.

(६) पत्नीच्या स्त्रीधनावर नवऱ्याचा अधिकार नाहीं; मात्र आपत्कालांत त्याचा उपभोग घेण्याचा नवऱ्याला अधिकार आहे. लग्नानंतर बायकोच्या बाबतींत उत्पन्न होणारे अधिकार व बंधनें अशीं—

(१) नवरा दुष्ट नसेल, अगर त्याची वर्तणूक वाईट नसेल, अथवा त्याला एकादा किळसवाणा रोग झाला नसेल, तर नवऱ्याजवळ बायकोनें राहिले पाहिजे.

(२) स्वतःचे स्त्रीधन आपल्या मर्जीप्रमाणें उपभोगण्याचा अथवा तबदील करण्याचा अधिकार पत्नीला आहे.

(३) स्त्रीधनाच्या बाबतींत स्त्रीवर दावा करतां येईल अगर स्त्रीला दुसऱ्यावर दावा करतां येईल. असल्या दाव्यांत नवऱ्याला पक्षकार करण्याचें कारण नाहीं.

(४) प्रघात असल्याशिवाय पत्नीला नवऱ्यास सोडचिठ्ठी देतां येणार नाहीं.

(५) पत्नीच्या आधी नवरा मयत झाला तर त्याच्या मिळकतीचे जे वारस सांगितलें आहेत, त्यांत पत्नीचा समावेश होतो. वारस जरी पत्नीला मिळाला नाहीं तरी पोटगी मागण्याचा व कौटुंबिक घरांत राहण्याचा तिला अधिकार आहे.

## ३२ एखाद्या हिंदु स्त्रीचा नवरा बेपत्ता असेल तर तिला पुनर्विवाह करतां येतो काय ?

सन १८५६ च्या विधवा विवाह कायद्यामध्यें असें म्हटलें आहे कीं, एखाद्या हिंदु स्त्रीचा नवरा मयत असेल तर तिला पुनर्विवाह करतां येईल. एखाद्या हिंदु स्त्रीचा नवरा मयत नसेल पण बेपत्ता असेल तर तिला पुनर्विवाह करतां येईल कां ? हा प्रश्न मोठा मनोरंजक आहे. मनु आणि नारद ह्यांनीं असें म्हटलें कीं, नवऱ्याचा आठ वर्षें पत्ता नसेल तर पुनर्विवाह करण्यास हरकत नाहीं.

गौतम-स्मृतिमध्यें असें म्हटलें आहे कीं, नवरा बेपत्ता असतांना सहा वर्षांनंतर पुनर्विवाह करण्यास हरकत नाहीं. वशिष्ठानें हा काळ पांच वर्षांचा सांगितला आहे, तर सर्वसाधारण हिंदु-कायद्याप्रमाणें एखाद्या मनुष्याचा बारा वर्षें पत्ता नसेल तर तो मृत समजण्यास हरकत नाहीं.

पुराव्याच्या कायद्यामध्यें असें म्हटलें आहे कीं, एखाद्या मनुष्याचा सात वर्षें पत्ता नसेल तर तो मृत आहे असें समजण्यास हरकत नाहीं. (पुराव्याचा कायदा कलम १०८) मनु व इतर स्मृतिकार ह्यांनीं सांगितलेली विशिष्ट मुदत अथवा सर्वसाधारण हिंदु कायद्याची बारा वर्षांची मुदत, ही आतां पुराव्याच्या कायद्यांत सांगितलेल्या मुदतीनें रद्द झाली आहे. म्हणजे एखाद्या स्त्रीचा नवरा सात वर्षें पावेतो बेपत्ता असेल तर तो मृत आहे असें आतां समजण्यांत येईल. दुसऱ्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे असें म्हणतां येईल कीं, एखाद्या हिंदु स्त्रीचा नवरा सात वर्षेंपर्यंत बेपत्ता असेल तर तो मृत झाला अथवा ती विधवा झाली असें समजण्यास हरकत नाहीं. ह्या सात वर्षांच्या कालानंतर त्या हिंदु स्त्रीस पुनर्विवाह करतां येईल.

## प्रकरण ४ थें

# विशिष्ट विवाहाचा कायदा

## ( Special Marriage Act )

हा कायदा ता. १२ मार्च १८७२ रोजी पास झाला, असें असतांही ह्या कायद्याप्रमाणें नोंदणी पद्धतीनें विवाह करण्याची प्रथा पूर्वी आपल्याकडे विशेष नव्हती. अलीकडे मात्र सुशिक्षित वधु-वरांमध्यें नोंदणी पद्धतीच्या विवाहाची प्रथा झपाट्यानें वाढत आहे. ह्याचें कारण असें कीं, पूर्वी हा कायदा पास झाला त्यावेळीं असें ठरविण्यांत आलें होतें कीं, या कायद्याप्रमाणें विवाह करणाऱ्या लोकांनीं "आम्हांस कोणतीच जात अगर धर्म नाहीं." असें लिहून दिलें पाहिजे व मग रजिस्ट्रारपुढें जाऊन विवाह नोंदविला पाहिजे. ह्याचा परिणाम असा झाला कीं, ह्या कायद्याप्रमाणें लग्न करणारे लोक धर्मभ्रष्ट झाले असें मानण्यांत येऊं लागलें. ह्यामुळें धर्माबद्दल अगर जातीबद्दल आदर बाळगणारा कोणताही मनुष्य ह्या कायद्याप्रमाणें लग्न करण्यास तयार होईना. पुढें ही परिस्थिति पालटली व सर हरिसिंग गौर ह्यांच्या खटपटीमुळें ता. ३० जुलै १९२३ रोजी ह्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आली. ह्या दुरुस्तीनंतर "आम्हांस कोणतीच जात नाहीं, अगर धर्म नाहीं" असा लेख लिहून देण्याचें प्रयोजन राहिलें नाहीं व हिंदुत्व कायम राखूनही ह्या कायद्याप्रमाणें विवाह करतां येऊं लागला. ह्या कायद्याप्रमाणें विवाह करणाऱ्या वधुवरास कांहीं विशिष्ट फायदे मिळत असल्यामुळें व ह्या कायद्याप्रमाणें विवाह करूनही हिंदुत्व कायम असल्यामुळें आपल्याकडे हल्ली ह्या विवाहाची प्रथा वाढत आहे.

ह्या कायद्याची मुख्य कलमें अशीं---

### ३३ व्याप्ति

हा कायदा सर्व ब्रिटिश हिंदुस्थानास लागूं आहे.

### ३४ विशिष्ट विवाहाच्या अटी

ज्या इसमांना हिंदु, मुसलमानी, पारशी, बौद्ध, ख्रिती, जैन, शीख किंवा ज्यू या धर्मांपैकीं एकही धर्म संमत नाहीं, अशा वधुवरांना ह्या कायद्याप्रमाणें लग्न करतां

येतें. त्याचप्रमाणें ज्यांना हिंदु, बौद्ध शीख किंवा जैन ह्यापैकीं कोणताही धर्म संमत आहे, अशा वधुवरांना ह्या कायद्याप्रमाणें विवाह करतां येतो. अशा विवाहाच्या बाबतींत खालील गोष्टी लक्षांत ठेवणे जरूर आहे:—

(१) ज्या वधुवरांचा विवाह होणेचा असेल, त्या वराची बायको अगर त्या वधूचा नवरा हयात असतां कामा नये. एक बायको जिवंत असतांना ह्या कायद्याप्रमाणें दुसरी बायको करतां येणार नाहीं.

(२) लग्नाच्या वेळीं पुरुषाचें १८ वर्षांपेक्षां जास्त व स्त्रीचें वय १४ वर्षांपेक्षां जास्त पाहिजे. १४ वर्षांपेक्षां लहान वयाची वधु व अठरापेक्षां लहान वयाचा वर ह्यांना ह्या कायद्याप्रमाणें लग्न करतां येणार नाहीं.

(३) वधु आणि वर हे २१ वर्षांपेक्षां जास्त अगर २१ वर्षे पूर्ण झालेले असतील तर त्यांच्या पालकांची संमति घेण्याचें कारण नाहीं; पण वधु आणि वर ह्यापैकीं जो कोणी २१ वर्षांपेक्षां कमी वयाचा असेल त्याला आपल्या पालकाची संमति घेतल्याशिवाय लग्न करतां येणार नाहीं.

(४) निकटच्या नात्यामुळें ज्यांचें लग्न बेकायदा होत असेल, अशा वधुवरांना ह्या कायद्याप्रमाणें लग्न करतां येणार नाहीं. दुसऱ्या भाषेंत आपणांस असें म्हणतां येईल कीं, वधु व वर ह्यांचें नातें पांच पिढ्यांपेक्षां दूरचें असलें तर सगोत्र अगर सप्रवर असतांही त्यांना ह्या कायद्याप्रमाणें लग्न करतां येईल. भिन्न जातीच्या लोकांना या कायद्याप्रमाणें लग्न करण्यांस पूर्ण परवानगी आहे.

## ३५ विवाहाची नोटीस व हरकत

ह्या कायद्यानें होणारे विवाह नोंदविण्यासाठीं निरनिराळया भागाकरितां सरकार निरनिराळे " रजिस्ट्रार " नेमील. विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें ज्यांना लग्न करणेंचें असेल, त्यापैकीं कोणीतरी एकानें, म्हणजे वधुनें अगर वरानें, आपल्या भागाच्या रजिस्ट्रारला नोटीस दिली पाहिजे. ज्या रजिस्ट्रारला नोटीस द्यावयाची, त्याच्या अधिकाराच्या स्थळसीमेत वधुवरांपैकीं एकानें नोटीस देण्यापूर्वी चौदा दिवस राहिले पाहिजे.

अशा प्रकारची नोटीस रजिस्ट्रार नोंदून ठेवील व त्याची खरी नक्कल " विवाह नोटीस पुस्तकांत " उतरून ठेवण्याची व्यवस्था करील. हें पुस्तक कोणाही मनुष्यास फीशिवाय बघण्याचा अधिकार आहे. कोणाची हरकत न आल्यास नोटीस दिल्यापासून चौदा दिवसानंतर वधुवरांना ह्या कायद्याप्रमाणें विवाह करण्यास हरकत नाहीं.

ज्या कोणास हरकत आणावयाची असेल, त्यांनीं चौदा दिवसांचे आंत त्याबद्दल रजिस्ट्रारकडे हरकत केली पाहिजे. अशी कोणी हरकत आणल्यास हरकतदारास दिवाणी कोर्टांत दाद मागण्यासाठीं रजिस्ट्रार चौदा दिवसांची मुदत देईल. दिवाणी कोर्ट उघडें नसल्यास कोर्ट सुरूं झाल्यापासून चौदा दिवस होईतोंपर्यंत मुदत दिली जाईल. ह्या मुदतींत जर हरकतदारानें दावा लावला तर त्या दाव्याचा निकाल होईपर्यंत लग्न नोंद करण्याचें रजिस्ट्रार तहकूब करील; पण ह्या मुदतींत जर दावा लावला नाहीं तर चौदा दिवसानंतर विवाह नोंद करण्याचा रजिस्ट्रारला अधिकार आहे. दिवाणी कोर्टाच्या नजरेस जर असें आलें कीं हरकतदाराची हरकत सदवुद्धिपूर्वक व सयुक्तिक नव्हती तर दिवाणी कोर्ट हरकतदारांस एक हजार रुपयांपर्यंत दंड करील व तो दंड अगर त्यांतील कांहीं भाग वधुवरांस देईल.

विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें लग्न करण्यापूर्वीं रजिस्ट्रार यांस नोटीस द्यावी लागते तिचा नमुना असा;

## ३६ नमूना

" विशिष्ट विवाहाचे रजिस्ट्रार यांस नोटीस देण्यांत येते कीं, आजपासून तीन महिन्यांचे आंत खालीं दिलेल्या वधुशीं अगर वराशीं, विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें माझा विवाह होणेचा आहे

| नांव | स्थिति | धंदा | वय | राहण्याचे ठिकाण | रजिस्ट्रारच्या स्थळ मर्यादेत किती दिवस मुक्काम केला |
|---|---|---|---|---|---|
| गोवाजी गोपाळ गोपीवाले | अविवाहित | डॉक्टर | २८ | मुंबई | २१ दिवस |
| सरला सरनोबत | कुमारी | नर्स | २३ | नागपूर | ० |

तारीख...........

सही
गोमाजी गोपाळ गोपीवाले
अथवा
सरला सरनोबत

साक्ष........

## ३७ प्रतिज्ञापत्रक

या कायद्याप्रमाणें विवाह होण्यापूर्वीं वधुवर आणि तीन साक्षीदार यांनीं रजिस्ट्रारच्या देखत खालीं दिलेल्या प्रतिज्ञापत्रकावर सही करणेस पाहिजे.

वधुवरापैकीं एखाद्याचें वय २१ वर्षांच्या आंत असेल तर प्रतिज्ञापत्रकावर त्याच्या पालकाची सही असली पाहिजे. या नियमाला एक अपवाद आहे तो असा–

वधु २१ वर्षांपेक्षां कमी वयाची असेल परंतु ती जर विधवा असेल तर तिच्या पालकाच्या सहीची अवश्यकता नाहीं.

### वरानें करून देण्याचें प्रतिज्ञापत्रक

मी–गोमाजी गोपाळ गोपीवाले–प्रतिज्ञापूर्वक असें लिहून देतों कीं,—

(१) मी हल्लीं अविवाहित आहे.

(२) ख्रीश्चन, ज्यू, हिंदु, मुसलमान, पार्शी, बौद्ध, शीख अथवा जैन यापैकीं कोणताही धर्म मला संमत नाहीं; अगर मी हिंदु, बौद्ध, शीख अगर जैन या धर्मांचा अनुयायी आहे.

(३) माझ्या वयाला १८ वर्षे पूर्ण होऊन गेली आहेत.

(४) ज्या निकटच्या नात्यामुळें आमचा विवाह निषिद्ध होईल अशा प्रकारचें नातें मी व सरला सरनोबत यांच्यामध्यें नाहीं.

( वराचे वय २१ वर्षांचें आंत असेल तर– )

(५) माझे वडील अगर पालक यांची या विवाहास संमति आहे.

(६) मी हें जाणून आहे कीं, या प्रतिज्ञापत्रकांतील एखादी गोष्ट खोटी ठरेल आणि ती खोटी आहे अथवा खरी नाहीं, हें मला माहीत आहे, असें ठरेल, तर शिक्षेस व दंडास मी पात्र होईल.

सही

गोमाजी गोपाळ गोपीवाले

............ }
............ } तीन साक्षिदारांच्या सह्या
............ }

रजिस्ट्रारची सही

## वधूनें करून देण्याचें प्रतिज्ञापत्रक

मी-सरला सरनोबत-असें प्रतिज्ञापूर्वक लिहून देतें कीं,—

(१) मी हल्ली अविवाहित आहे.

(२) मी ख्रिश्चन, ज्यू, हिंदु, मुसलमान, पार्शी, बौद्ध, शीख अथवा जैन यापैकीं कोणत्याही धर्माची अनुयायी नाहीं. अथवा माझा धर्म, हिंदु, बौद्ध, शीख अगर जैन आहे.

(३) माझ्या वयाला १४ वर्षे पूर्ण होऊन गेलीं आहेत.

(४) ज्या निकटच्या नात्यामुळें आमचें लग्न निषिद्ध होईल अशा प्रकारचें नातें मी व गोमाजी गोपाळ गोपीवाले यांच्यामध्यें नाहीं.

(वधु जर विधवा नसेल आणि वधूचें वय २१ वर्षांच्या आंत असेल तर-)

(५) माझ्या पालकाची या विवाहास संमति आहे.

(६) मी हें जाणून आहे कीं, या प्रतिज्ञापत्रकांतील एखादी गोष्ट खोटी ठरल्यास, आणि ती खोटी आहे अथवा खरी नाही हें मला माहीत आहे असें ठरल्यास, मला शिक्षा व दंड होईल.

**सही**

सरला सरनोबत

गोमाजी गोपाळ गोपीवाले आणि सरला सरनोबत यांनीं आमच्या देखत सह्या केल्या आहेत.

१.............. }
२.............. } **तीन साक्षिदारांच्या सह्या**
३.............. }

(वधू अथवा वर यापैकीं कोणीही २१ वर्षांचें आंत असतील तर—)

माझ्या समक्ष व माझ्या संमतीनें वधु अगर वर यांनीं सही केली आहे.

तारीख.........                    सही ______________

वराचा अथवा वधूचा पालक

राजिस्ट्रारची सही

## ३८ लग्न-विधि कसा व कोठें करणेचा

वर सांगिल्याप्रमाणें प्रतिज्ञापत्रक लिहून दिल्यानंतर विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें छोटासा लग्न-विधि करणेचा असतो तो विधि असा:—

रजिस्ट्रार आणि तीन साक्षीदार यांच्या देखत व त्यांना ऐकूं जाईल इतक्या मोठ्यानें वधु-वरांनीं असें म्हणणेचें असतें.

" मी गोमाजी गोपाळ गोपीवाले-तूं-सरला सरनोवत-हिचा पत्नी म्हणून स्वीकार करतो. "

" मी सरला सरनोबत-तुम्ही-गोमाजी गोपाळ गोपीवाले-ह्यांचा पति म्हणून स्वीकार करते."

हा लग्न-विधि रजिस्ट्रारच्या कचेरींत अथवा रजिस्ट्रारला बोलावून दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं करतां येतो. रजिस्ट्रारच्या कचेरींत लग्न-विधि न करतां इतर ठिकाणीं लग्न-विधि केला तर जादा फी द्यावी लागते.

## ३९ विवाहाचे प्रमाणपत्र

वर सांगितल्याप्रमाणें विवाह-विधि झाल्यानंतर " विवाह प्रमाणपत्र पुस्तकांत रजिस्ट्रार विवाहाची नोंद करून ठेवीत असतो, व या नोंदीखालीं वधु-वरांनीं आणि तीन साक्षिदारांनीं सह्या करणेच्या असतात. नोंदीचा नमुना असा:—

## ४० रजिस्ट्रारचे सर्टिफिकेट

मी प्रमाणपूर्वक असें लिहून ठेवतों कीं,...अमुक तारखेस गोमाजी गोपाळ गोपीवाले आणि सरला सरनोबत हें माझ्यापुढें उपस्थित झाले व त्यांनीं माझ्यासमोर व खालीं सह्या करणारे तीन साक्षीदार यांच्यासमोर विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें आवश्यक असलेली प्रतिज्ञा केली, आणि या कायद्याप्रमाणें त्यांचा लग्न-विधि माझ्या देखत झाला आहे.

| | | |
|---|---|---|
| ________ | तीन साक्षिदारांच्या सह्या | ................ |
| ________ | | |
| ________ | | रजिस्ट्रारची सही |

तारीख............

हें प्रमाणपत्र पुस्तक रजिस्ट्रारच्या कचेरींत कोणाही मनुष्यास केव्हांही पहाण्यास मिळेल, आणि त्यामध्यें केलेल्या नोंदीबद्दल तें पुराव्यांत ग्राह्य होऊं शकेल. जरूर ती फी दिल्यावर प्रमाणपत्राची सही शिक्याची नक्कल अर्जदारांस मिळूं शकेल. प्रमाणपत्र पुस्तकांत एखाद्या विवाहाची नोंद केल्यावर त्या नोंदीची नक्कल रजिस्ट्रारनें जन्म–मृत्यु आणि विवाह यांच्या रजिस्ट्रार-जनरलकडे पाठविणेची असते.

## ४१ कायदेभंगाची शिक्षा

नवरा अगर बायको जिवंत असतांना जो कोणी विशिष्ट विवाहाच्या कायद्या-प्रमाणें लग्न करील त्याला इंडियन पीनल कोड कलम ४९४ अगर ४९५ याप्रमाणें गुन्हेगार समजून शिक्षा करण्यांत येईल.

(१) इंडियन पीनल कोड कलम ४९४ असें—नवरा अगर बायको जिवंत असतांना जो कोणी विवाह करील व असा विवाह बेकायदेशीर असेल तर त्यांस सात वर्षेपर्यंत कैद आणि दंड अशी शिक्षा होईल.

(२) इंडियन पीनल कोड कलम ४९५ असें—आपल्या पूर्व विवाहाची दुसऱ्यांस माहिती न देतां जो मनुष्य वर सांगितलेला गुन्हा (कलम ४९४ मधील) करेल, त्यांस १० वर्षेपर्यंत कैद व दंड अशी शिक्षा होईल.

विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें प्रतिज्ञापत्रक करून देणेचें असतें व त्यांवर वधुवरांनीं आणि साक्षिदारांनीं सह्या करणेच्या असतात. ह्या प्रतिज्ञा पत्रकांतील एखादी गोष्ट खोटी आहे, अगर खरी नाहीं असें माहीत असून जो कोणी सही करील त्यांत इंडियन पीनल कोड कलम १९९ प्रमाणें गुन्हेगार समजून शिक्षा करण्यांत येईल. ह्याचा अर्थ असा कीं, अशा गुन्हेगारास तीन वर्षेपर्यंत अगर सात वर्षेपर्यंत कैद आणि दंड अशी शिक्षा होईल.

## ४२ घटस्फोटाचा हक्क

विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें लग्न करणाऱ्या वधु-वरांत घटस्फोटाचा हक्क आहे. ह्याचा अर्थ असा नव्हे, कीं, नवराबायकोचें पटत नाहीं अथवा त्यांची लहर फिरली म्हणजे रजिस्टर विवाह करणाऱ्या वधु-वरांना घटस्फोटाचा हक्क मिळेल:—

रजिस्टर विवाह करणाऱ्या वधु-वरांना घटस्फोटाचा हक्क मिळतो हें खरें, पण त्याचबरोबर हेंही खरें कीं, हा हक्क अत्यंत मर्यादित आहे, घटस्फोटाच्या कायद्यांत कलम १० मध्यें घटस्फोट केव्हां मिळूं शकतो याचीं कारणें दिलीं आहेत तीं अशीं:—

(१) पत्नि जर व्यभिचारी असेल तर तिच्यापासून घटस्फोट मिळण्याबद्दल नवऱ्याला अर्ज करतां येतो.

(२) पती जर व्यभिचारी असेल तर त्याच्यापासून घटस्फोट करण्याबद्दल पत्नीला अर्ज करतां येतो.

यावरून असें समजण्यास हरकत नाहीं कीं, रजिस्टर विवाह करणाऱ्या वधु-वरांना घटस्फोटाचा अधिकार मिळाला असला तरी तो अत्यंत मर्यादित आहे.

## ४३ विशिष्ट विवाह कायद्याचे विशिष्ट परिणाम

पूर्वी हिंदुत्व कायम राखून विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें लग्न करतां येत नसे. पण १९२३ च्या दुरूस्तीनंतर हिंदुत्व कायम राखूनही विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें लग्न करतां येऊं लागलें. हिंदुत्व कायम राहात असलें तरी विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें लग्न करणाऱ्या वधु-वरांच्या बाबतींत हिंदु-कायद्याला विसंगत अशा कांहीं गोष्टी उपस्थित होतात—

(१) हिंदु लोकांचा वारसाक्रम हिंदु कायद्याप्रमाणें ठरविण्यांत येतो, परंतु विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें लग्न करणाऱ्या हिंदु वधु-वरांचा वारसाक्रम हिंदु कायद्याप्रमाणें न ठरतां इंडियन सक्सेशन ॲक्टप्रमाणें ठरतो,

इंडियन सक्सेशन ॲक्टप्रमाणें ठरणारा वारसाक्रम हिंदु लोकांना अत्यंत अपरिचित आहे, कारण या वारसाक्रमाप्रमाणें पुरुष व स्त्री यामध्यें फरक केलेला नाहीं. मुलगा व मुलगी, अथवा भाऊ आणि बहीण या सर्वांना सारखाच हिस्सा मिळतो.

(२) विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें लग्न करणारे वधु-वर एकत्र कुटुंबाचें घटक असतील तर विवाहाचे तारखेपासून ते एकत्र कुटुंबापासून विभक्त झाले असें कायदा मानेल.

( ३ ) हिंदु, बौद्ध, शीख अगर जैन, ह्या धर्मापैकीं जर कोणी विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें लग्न करेल तर त्यास दत्तकाचा अधिकार मिळणार नाहीं.

( ४ ) हिंदु, बौद्ध, शीख अगर जैन यांपैकीं जर कोणी विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें लग्न करेल, आणि जर आपल्या बापाचा एकुलता एक मुलगा असेल तर त्याच्या बापास दुसरा मुलगा दत्तक घेतां येईल.

मुलगा असणाऱ्या बापास हिंदु कायद्याप्रमाणें दत्तक घेतां येत नाहीं; परंतु आपल्या एकुलत्या एक मुलानें विशिष्ट विवाहाच्या कायद्याप्रमाणें लग्न केलें, तर तो मुलगा कुटुंबांतून गेला-मृत झाला-असें समजून बापानें दुसरा मुलगा दत्तक घेण्यास हरकत नाहीं.

—०×०—

# प्रकरण ५ वें

## बालविवाह-प्रतिबंधक कायदा उर्फ शारदा कायदा

हा कायदा ता. १ एप्रील १९३० पासून अमलांत आलेला आहे. (बालविवाह प्रतिबंधक कायदा, कलम १)

सन १९३८ च्या पुर्वी एकाद्या ब्रिटिश प्रजाजनानें ज्या संस्थानांच्या हद्दींत बालविवाह-प्रतिबंधक कायदा लागूं नाहीं अशा संस्थानांमध्यें जाऊन, अथवा ब्रिटिश हद्दीबाहेर गोवें प्रांतांत जाऊन आपल्या अपत्याचा बालविवाह केला तर तो ब्रिटीश प्रजानन या कायद्याप्रमाणें शिक्षेस पात्र होईल कीं नाहीं याबद्दल वाद होता. मुंबई हायकोर्टाच्या मताप्रमाणें असा मनुष्य निर्दोषी आहे, तर मद्रास हायकोर्टाच्या मताप्रमाणें असा मनुष्य दोषी आहे.

ही चमत्कारिक परिस्थिति टाळावी म्हणून सन १९३८ मध्यें ह्या कायद्यांत अशी दुरुस्ती केली गेली कीं, हिंदुस्थानांतील कोणत्याही भागांत असलेल्या सर्व हिंदी प्रजाजनांना हा कायदा लागूं आहे. या दुरूस्तीमुळें एखादा हिंदी हद्दीबाहेर गोंवे प्रांतांत अगर संस्थानांत जाऊन बालविवाह घडवून आणेल तर तो या कायद्याप्रमाणें अपराधी होय.

## ४४ बालविवाह म्हणजे काय ?

बालविवाह याचा अर्थ १८ वर्षे पूर्ण न झालेला वर, अथवा १४ वर्षे पूर्ण न झालेली वधु यांच्यामध्यें झालेला विवाह ( बालविवाह-प्रतिबंधक कायदा कलम २ )

या व्याख्येप्रमाणें बालविवाहाचे आपणांस तीन भाग पाडता येतील:—

(१) वर १८ वर्षांच्या आंत, परंतु वधु १४ वर्षांच्या पुढें, अशांचा झालेला विवाह. उदाहरणार्थ:—

१५ वर्षांची इंदूमती व १७ वर्षांचा प्रभाकर यांचा विवाह हा बालविवाह होय.

(२) वर १८ वर्षांच्या पुढें, परंतु वधु १४ वर्षांच्या आंत, अशांचा झालेला विवाह. उदाहरणार्थ:–

२० वर्षांचा नारायण व १३ वर्षांची विमल यांचा विवाह बालविवाह होय.

(३) वर १८ वर्षांच्या आंत व वधु १४ वर्षांच्या आंत अशांचा झालेला विवाह. उदहरणार्थ:–

१७ वर्षांचा विनायक व १३ वर्षांची कमल यांचा विवाह हा बालविवाह होय.

## ४५ शिक्षा

बालविवाह झाला तर तो कायद्यानें रद्द ठरत नाहीं, परंतु त्याबद्दल शिक्षा होते. या बाबतींत बालविवाह प्रतिबंधक कायद्यामध्यें कलमें सांगितली आहेत ती अशी:—

(१) १८ वर्षांच्या पुढें व २१ वर्षांचे आंत वय असलेला वर बालविवाह करेल तर त्यास १००० रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

(२) २१ वर्षांपेक्षां अधिक वय असलेला वर जर बालविवाह करेल तर त्यास खालीलप्रमाणें शिक्षा होईल—

(१) एक महिन्यापर्यंत साधी कैद, अगर

(२) १००० रुपयेपर्यंत दंड, अथवा.

(३) एक महिन्यापर्यंत कैद व १००० रु. पर्यंत दंड.

(४) जो कोणी बालविवाहाचा विधी करील, चालवील अथवा करावयास सांगेल, अशा भिक्षुकास अगर उपाध्यायास खालीलप्रमाणें शिक्षा होईल.

(१) १००० रु. पर्यंत दंड, अगर

(२) एक महिन्यापर्यंत साधी कैद, अथवा

(३) एक महिन्यापर्यंत कैद व १००० रु. पर्यंत दंड.

मात्र आपण चालविलेला, केलेला अथवा करावयास सांगितलेला विवाह बालविवाह नाहीं असें समजण्यास आपणांस सबळ कारण होतें, असें भिक्षुकानें अथवा उपाध्यायानें शाबीत केल्यास तो शिक्षेस पात्र होणार नाहीं.

(४) १८ वर्षांच्या आंत असणारा वर व १४ वर्षांच्या आंत असणारी वधु ह्यांचे आई, बाप अथवा पालक यांना बालविवाहाबद्दल खालीलप्रमाणें शिक्षा होईल:—

(१) एक महिन्यापर्यंत साधी कैद, अथवा

(२) १००० रु. पर्यंत दंड अथवा

(३) एक महिन्यापर्यंत साधी कैद, व १००० रु. पर्यंत दंड.

मात्र बालविवाहाबद्दल गुन्हेगार असणाऱ्या कोणत्याही स्त्रीस कैदेची शिक्षा देतां येणार नाहीं.

ह्या शिक्षेच्या कलमावरून आपणांस असें दिसेल कीं, बालविवाह रद्द होत नसला तरी बालविवाहाबद्दल १८ वर्षांच्या पुढील वर वधुवरांचे आईबाप अथवा पालक, आणि भिक्षुक अथवा उपाध्याय, ह्यांना कायद्यानें शिक्षा सांगितली आहे.

एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, वधूला बालविवाहाबद्दल शिक्षा नाहीं, आणि वधुवरांची आई अथवा पालक स्त्री हिला कैदेची शिक्षा नाहीं.

---

# प्रकरण ६ वें

## सवतबंदी व घटःस्फोट

### ४६ सवतबंदी

हिंदु कायद्याप्रमाणें पुरुषाला एकाचवेळीं वाटेल तितक्या बायका करता येतात. एक पत्नी हयात असतांना दुसरी पत्नी करण्यास हिंदु कायद्याची आडकाठी

नाहीं. हल्लींचा काळ लक्षांत घेता असें म्हणावें लागेल कीं एक बायको हयात असतांना पुरुषानें दुसरी बायको केली तर स्त्रियांच्या दृष्टीनें ती गोष्ट वाजवी नाहीं.

हल्लीचा समान हक्काचा काळ लक्षांत घेऊन मुंबई सरकारनें नुकताच सवत-बंदीचा कायदा केला आहे. ह्या कायद्याप्रमाणें मुंबई इलाख्यांत राहणाऱ्या कोणाही हिंदु पुरुषांस एक पत्नी हयात असतांना दुसरी बायको करतां येणार नाहीं. हिंदु या शब्दांत शीख, जैन, बौद्ध, आर्य समाजाचा किंवा ब्रम्ह समाजाचा अनुयायी अगर धर्मांतर करून हिंदु झालेला इसम यांचा समावेश होतो, असें या कायद्यांत म्हटलें आहे.

## ४७ घटःस्फोट

हिंदु कायद्याप्रमाणें कोणालाही घटःस्फोटाचा अधिकार नाहीं. लग्न म्हणजे पति व पत्नी यांच्यामधील अविभाज्य अशी निरगांठ आहे अशी हिंदु कायद्याची समजूत असल्यामुळें त्या कायद्यामध्यें घटःस्फोटाला मान्यता दिलेली नाहीं.

हल्लीचा काळ लक्षांत घेऊन घटःस्फोटाच्या हक्काबद्दल कायद्यामध्यें कांहीं-तरी तरतूद करणें इष्ट आहे असें वाटल्यावरून मुंबई सरकारनें घटःस्फोटाचा कायदा (१९४७ चा २२ वा कायदा) नुकताच केला आहे. या कायद्यामध्यें कोणच्या कारणासाठीं घटस्फोट मागता येईल ते तिसऱ्या कलमांत नमुद केले आहे व कोणच्या कारणांसाठीं विभक्त राहतां येईल ते चौथ्या कलमांत नमुद केले आहे. संबंध कायद्यांत एकंदर १७ कलमें आहेत त्यापैकीं कलम ३ व कलम ४ हीच कलमें सर्वांत महत्वाची आहेत. ती कलमें अशीः—

## कलम ३

## घटःस्फोटाबाबतचे मुद्दे

(१) पतीस किंवा पत्नीस पुढील मुद्यांपैकीं कोणत्याही मुद्यावर घटःस्फोट मिळविण्यासाठीं कोर्टांत दावा आणण्याचा अधिकार आहे; ते मुद्देः—

( अ ) प्रतिवादी हा विवाहाचे वेळीं नपुंसक होता. आणि कोर्टांत दावा आणण्याचे वेळीं तो तशाच स्थितींत आहे.

( ब ) प्रतिवादी हा कोर्टांत दावा आणण्याचे पूर्वी सात वर्षांपेक्षां कमी नाहीं अशा मुदतीपर्यंत वेडा झालेला आहे किंवा तो खुळा आहे;

( क ) प्रतिवादीला, कोर्टात दावा आणण्याचे पूर्वी सात वर्षांपेक्षां कमी नाहीं अशा मुदतीपर्यंत, परंतु वादीच्या स्पर्शानें मात्र न झालेला, असा महारोग झालेला आहे.

( ड ) प्रतिवादीनें वादीस सतत चार वर्षांच्या मुदतीपर्यंत टाकून दिलें आहे;

( ई ) प्रतिवादी जर जिवंत असता तर ज्या इसमांना त्या संबंधीं स्वाभाविकच कळलें असतें अशा इसमांना सात वर्षांच्या काळांत प्रतिवादी जिवंत आहे असें त्याच्याविषयीं कळलें नाहीं.

( फ ) प्रतिवादी पती असेल तर, त्यानें रखेली म्हणून इतर स्त्री ठेवलेली आहे, आणि प्रतिवादी पत्नी असेल तर, ती इतर कोणत्याही मनुष्याची रखेली आहे अथवा वेश्याव्यवसाय करीत आहे;

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, जर पती व पत्नी यांनीं सज्ञान झाल्यानंतर २० वर्षेपर्यंत वैवाहिक जीवन घालविलें असेल तर, कलम ( ड ) किंवा ( फ ) अन्वयें असेल तो प्रसंग खेरीज करून, असा दावा लावतां येणार नाहीं.

## कलम ४

## विभक्तपणाबद्दलचे दावे

कलम ३ मध्यें कोणताहि मजकूर असला तरी—

( १ ) पतीस किंवा पत्नीस वादीपासून न जडलेला असा महारोग झालेला आहे या मुद्यावर कायदेशीर विभक्तपणाबद्दल दावा आणण्याचा सदरहू पतीस अगर पत्नीस अधिकार आहे;

( २ ) पत्नी दुसऱ्या कोणत्याहि मनुष्याची रखेली आहे अथवा ती वेश्या व्यवसाय करते या मुद्यावर कायदेशीर विभक्तपणा मिळण्याबद्दल दावा लावण्याचा पतीस हक्क असेल.

( ३ ) पत्नीस पुढील कारणांवरून कायदेशीर विभक्तपणा मिळण्याबद्दल दावा लावण्याचा हक्क असेल:—

( अ ) आपल्या पतीनें सन १९४६ चा मुंबईचा हिंदु समाजांत विवाहबद्ध इसमांच्या नवीन विवाहास प्रतिबंध करण्याबाबत कायदा अमलांत येण्याच्या अगोदर पुन्हां विवाह केला असून अशी ( द्वितीय ) पत्नी दावा लावण्याच्या वेळीं हयात आहे; किंवा

( ब ) तिच्या पतीनें दुसरी एकादी स्त्री रखेली म्हणून ठेवलेली आहे; अथवा

( क ) कायद्याच्या दृष्टीनें ठरणारा क्रूरपणा.

— × —

# प्रकरण ७ वें

## बक्षीसपत्र

### ४८ सामान्य नियम

बक्षीसपत्रांत मोबदला घेण्याचा प्रश्न असत नाहीं, प्रेमाकरितां अथवा दुसऱ्या कांहीं कारणाकरितां एखादा मनुष्य आपली मिळकत दुसऱ्यास देत असतो.

### ४९ बक्षीसपत्र कसें करावयाचें ?

स्थावर मिळकतीबाबत केलेलें बक्षीसपत्र मग तें कितीही का किंमतीचें असेना,—नोंदलें पाहिजे. बक्षीस पत्रावर बक्षीस देणाऱ्याची सही अगर निशाणी आंगठा पाहिजे व त्यावर कमींतकमी दोन साक्षिदारांच्या सह्या पाहिजेत. (ट्रून्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, कलम १२३ )

हा नियम मुसलमानांना लागूं नाहीं. मुसलमानांनीं केलेलें बक्षीसपत्र तोंडीं असलें तरी चालेल अथवा लेखी असलें तर त्यावर साक्षिदारांच्या सह्या नसल्या तरी चालेल.

## ५० स्टँप

बक्षीसपत्रास जो स्टँप लागतो त्याचें कोष्टक असें:—

| | | |
|---|---|---|
| १ | मिळकतीची किंमत ५० रुपयांपेक्षां जास्त नसेल तेव्हां | ०-८-० |
| २ | ,, ,, ५० रु. वर पण १०० रु. च्या आंत | १-०-० |
| ३ | ,, ,, १०० ,, पण २०० रु. च्या आंत | २-०-० |
| ४ | ,, ,, २०० ,, ३०० ,, | ३-०-० |
| ५ | ,, ,, ३०० ,, ४०० ,, | ४-०-० |
| ६ | ,, ,, ४०० ,, ५०० ,, | ५-०-० |
| ७ | ,, ,, ५०० ,, ६०० ,, | ६-०-० |
| ८ | ,, ,, ६०० ,, ७०० ,, | ७-०-० |
| ९ | ,, ,, ७०० ,, ८०० ,, | ८-०-० |
| १० | ,, ,, ८०० ,, ९०० ,, | ९-०-० |
| ११ | ,, ,, ९०० ,, १००० ,, | १०-०-० |
| १२ | जेव्हां मिळकतीची किंमत १००० रुपयापेक्षां वर असेल तेव्हां प्रत्येक ५०० रुपयांस अगर त्याच्या भागास | ५-०-० |

( मुंबई प्रांतात जो स्टँप लागतो त्याबद्दलची माहिती खाली दिली आहे. खालीं दिलेल्या स्टँपाखेरीज सरचार्ज म्हणून जादा स्टँप भरावा लागतो त्यामुळें स्टँपाचे प्रमाण दीडपट वाढले आहे. )

### बदल.

मुंबई प्रांतांत स्टँपाच्या बाबतींत वाढ करण्यांत आलेली आहे. वर सांगितलेल्या पहिल्या तीन कलमापुरती कांहीं वाढ नाहीं पण त्याच्या नंतर म्हणजे ज्या वेळीं स्टँप तीन रुपयाचा लागतो त्या वेळीं स्टँपामध्यें दीडपट वाढ करण्यांत आलेली आहे. याचा अर्थ असा कीं वर दिलेल्या कोष्टकांत ज्या ठिकाणीं तीन रुपयाचा स्टँप म्हटला असेल त्या ठिकाणीं साडे चार रुपयाचा स्टँप समजावा. ज्या ठिकाणीं चार रुपयाचा स्टँप म्हटला असेल त्या ठिकाणीं सहा रुपयाचा स्टँप समजावा. ( सरचार्जांवा। खरेदीच्या प्रकरणांत दिलेली माहिती पहा. )

## नमुने.

## ५१ घरजागेचें बक्षीसपत्र

(१) चि०..........................(नांव, धंदा व वय वगैरे)
...............राहणार लिहून देतों बक्षीसपत्र ऐसाजे,

(२) बक्षीसपत्र बेसमी मी...............(नांव, धंदा व वय वगैरे) राहणार...............लिहून देतों बक्षीसपत्र ऐसाजे.

(३) तूं माझी मुलगी असून तुजवर माझी फार प्रीति आहे. तुजला रहाण्यास घर नाहीं करितां खालीं वर्णन केलेलें घर तुजला बक्षीस देऊन तुझे ताब्यांत दिलें आहे. सदर घरावर आतां माझा अगर माझे वारस, अगर मृत्युपत्र चालविणार यांचा कशाही प्रकारें संबंध नाहीं. संपूर्ण मालकी तुझीच जाहली आहे. तुझे मर्जीस येईल तशी वहिवाट करावी.

(४) मिळकतीचें वर्णन.........

(५) येणेंप्रमाणें घर तुजला बक्षीस देऊन तुझें कबजांत दिलें आहे. म्हणून लिहून दिलें बक्षीसपत्र.

तारीख............

साक्ष

१....................

सही (अगर आंगठा दस्तूरसह)

२....................

## ५२ जमिनीचें बक्षीसपत्र

(१) मि. रा. रा.........(नांव, धंदा व वय वगैरे) राहणार.........
यांस............

(२) बक्षीसपत्र बेसमी मी...............(नांव, धंदा, वय वगैरे) राहणार.........लिहून देतो बक्षीसपत्र ऐसाजे—

(३) तूं माझा जनक भाऊ आहेस व तुला............गांवी दत्तक दिला आहे परंतु दत्तक घराण्याची मिळकत कमी असल्यानें तुझा संसार नीट चालावा

म्हणून व तसेंच तुजवर माझी फार प्रीती असल्यानें ( अगर निराळें कांहीं कारण असल्यास लिहावें. ) खालीं नमूद असलेली मिळकत तुजला बक्षीस देऊन तुझे कबजांत दिली आहे.

(४) मिळकतीचें वर्णन..................................

(५) येणेंप्रमाणें जमीन तुला बक्षीस देऊन तुझें कबजांत दिली आहे. सदर जमिनीवर आजपासून माझा अगर माझें वारस अगर मृत्युपत्र चालविणार यांचा कोणाचाही कोणताही हक्कसंबंध राहिला नाहीं. संपूर्ण मालकी तुझीच झाली आहे. तुझें मर्जीप्रमाणें वहिवाट करीत जावें, म्हणून लिहून दिले बक्षीसपत्र ता.......

साक्षी

१........................ सही ( अगर आंगठा दस्तूरसह )

१........................

## ५२ बायकोचें नांवें केलेलें जमीन व घर जागेचें बक्षीसपत्र

(१) मि. सौ.................( नांव, धंदा, वय वगैरे ) रा.........इजला

(२) बक्षिसपत्र बेसमी मी....................( नांव, धंदा, वय वगैरे ) रा.......................लिहून देतो बक्षीसपत्र ऐसाजे—

(३) तूं माझी बायको आहेस यामुळें तुजवर माझी अत्यंत प्रीती जडलेली आहे. त्या प्रीतीप्रित्यर्थ माझी खाली लिहिलेली मिळकत तुला बक्षीस देऊन तुझें कबजांत दिली आहे.

(४) मिळकतीचें वर्णन............

(५) येणेंप्रमाणें वरील सर्व मिळकती आज रोजीं तुजला बक्षीस देऊन तुझें कबजांत दिल्या आहेत. सदर मिळकतींवर यापुढें माझा अगर माझें वारसदार अगर मृत्युपत्र चालविणारांचा कोणाचाही कशाही प्रकारें हक्क संबंध राहिलेला नाहीं. संपूर्ण मालकी तुझीच झाली. तूं तुझे मर्जीप्रमाणें वहिवाट व उपभोग घ्यावा म्हणून लिहून दिलें बक्षीसपत्र ता.............

साक्ष

१ .................. सही अगर निशाणी आंगठा

१ ........ ........ दस्तूरसह.

# ५४ एकाद्या संस्थेस दिलेलें बक्षीसपत्र

(१) रा. रा. ············ ( संस्थेच्या व्यवस्थापकाचें नांव, धंदा, वय वगैरे ) राहाणार यांसीः-

(२) बक्षीसपत्र लिहून देणार············ ( नांव, गांव वगैरे ) लिहून देतो बक्षीसपत्र ऐसाजे—

(३) तुमच्या शाळेस इमारतीची अत्यंत जरूरी आहे. मला मूलबाळ वगैरे कांहीं नाहीं. अशा परिस्थितींत माझें तीन मजली घर शाळेस दिल्यास इमारतीचें बाबतींत शाळेची अडचण दूर होणार आहे.

(४) या शाळेंत माझा मुलगा शिकत होता; व तो शिकत असतांनाच एकाएकी मयत झाला त्या मुलाच्या ( ······नांव ) स्मरणार्थ मी खालीं वर्णन केलेलें माझें घर तुमच्या शाळेस बक्षीस देत आहे,

(५) घराचें वर्णन··················

(६) हें घर तुमच्या शाळेस बक्षीस देऊन आज रोजीं तुमच्या ताब्यांत दिलें आहे. सदर घरावर आतां माझा अगर माझें वारस अगर मृत्युपत्र चालविणारांचा कोणाचाही कशाहीप्रकारचा हक्कसंबंध राहिलेला नाहीं, संपूर्ण मालकी तुमचीच झाली आहे.

(७) येणेंप्रमाणें लिहून दिलें बक्षीसपत्र ता.·········

साक्ष

१··················

··················

१··················

सही अगर आंगठा दस्तूरसह

—x—

# प्रकरण ८ व

## खरेदीपत्र

### ५५ खरेदीपत्र व तें कसें करावयाचें ?

ट्रॅन्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्टमध्यें स्थावर मिळकतीच्या खरेदीची व्याख्या दिली आहे ती अशीः—

दिलेल्या अथवा देतो म्हणून म्हटलेल्या अगर कांहीं भाग दिलेल्या व कांहीं भाग देतो म्हणून म्हटलेल्या किंमतीच्या मोबदल्यांत केलेली मिळकतीची जी तबदिली असते त्याला 'खरेदी' अशी संज्ञा दिलेली आहे, (ट्रॅन्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, कलम १५४).

स्थावर मिळकतीची व्याख्या जनरल क्लॉजेस ॲक्ट कलम ३ मध्यें अशी केलेली आहे—

स्थावर मिळकत म्हणजे—

(अ) जमीन, (ब) जमिनीपासून मिळणारें उत्पन्न, (क) भूमीशीं सलग्न असणारे पदार्थ अथवा भूमीशीं सलग्न असलेल्या कोणच्याही वस्तूस कायमपणें जोडलेले पदार्थ.

जनरल क्लाजेस ॲक्टमध्यें स्थावर मिळकतीची जी व्याख्या दिली आहे त्यांत ट्रन्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्टनें खालीलप्रमाणें फरक केलेला आहे.

उभे असलेले लांकूड, उगविलेलीं पिकें, अथवा गवत, यांचा समावेश स्थावर मिळकतीमध्यें होत नाहीं.

स्थावर मिळकतीचें खरेदीपत्र कसें करावयाचें याबाबतीत ट्रॅन्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्टमध्यें नियम सांगितला आहे तो असा—

शंभर (१००) रुपयांपेक्षां कमी किंमतीच्या स्थावर मिळकतींचें खरेदीपत्र नोंद केलें पाहिजे अथवा खरेदीपत्रांतील मिळकत खरेदी करणाराच्या ताब्यांत दिली पाहिजे. १०० रुपये अगर त्यापेक्षां जास्त किंमतीच्या स्थावर मिळकतींचें खरेदीपत्र नोंद केलेंच पाहिजे. ( ट्रॅन्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, कलम १५४ )

## ५६ खरेदी घेणारा व खरेदी देणारा

(१) खरेदी देणारा मनुष्य सज्ञान असला पाहिजे व कायद्याप्रमाणें करार करण्यास नालायक नसला पाहिजे.

(२) त्याचप्रमाणें खरेदी देणाऱ्या मनुष्याला ( जी मिळकत खरेदी देण्याची त्या बाबतींत ) मालकी असली पाहिजे, अथवा मिळकत खरेदी देण्याबद्दल अधिकार असला पाहिजे.

(३) खरेदी घेणारा मनुष्य मिळकत धारण करण्यास कायद्यानें पात्र असला पाहिजे.

**टीप**—(१) खरेदी देणारा मनुष्य सज्ञान पाहिजे असा नियम आहे, पण खरेदी घेणारा मनुष्य सज्ञान पाहिजे असा नियम नाहीं.

(२) कराराच्या कायद्याप्रमाणें करार करण्यास अपात्र असलेले लोक खालील प्रमाणें आहेत.

( अ ) कराराच्या वेळीं जो अज्ञान आहे.

( ब ) वेडेपणा, मद्य वगैरेंच्या योगानें करार समजून घेण्याइतपत ज्याची मनास्थिती नाहीं; अथवा

( क ) कॉमन लॉ प्रमाणें ज्याला करार करतां येत नाहीं.

वर सांगितलेल्या लोकांव्यतिरिक्त बाकीचे लोक करार करण्यांस पात्र आहेत.

## ५७ खरेदी घेतांना लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी

खरेदीपत्र करून घेण्यापूर्वीं खरेदी घेणाऱ्यानें खालील गोष्टीबद्दल चौकशी करावी—

(१) जी मिळकत खरेदी घेण्याची त्याची कायद्यानें तबदिली होण्यासारखी आहे किंवा नाहीं ?

(२) जी मिळकत खरेदी घेण्याची ती वर्णन केल्याप्रमाणें बरोबर आहे कीं नाहीं ?

(३) खरेदी देणारा मनुष्य करार करण्यास पात्र आहे किंवा नाहीं ?

(४) जी मिळकत खरेदी घेण्याची ती खरेदी देण्यास खरेदी देणारा मनुष्य पात्र आहे किंवा नाहीं ?

(५) खरेदी देणारा पूर्ण मालक आहे अथवा त्याची मालकी मर्यादित आहे ?

(६) मर्यादित मालकी असल्यास बाकीच्या मालकांची संमति आहे किंवा नाहीं ?

(७) खरेदी देणाऱ्या मनुष्यास खरेदी देण्याबाबत कांहीं प्रतिबंध असल्यास तो प्रतिबंध दूर झाला आहे किंवा नाहीं ?

(८) भरणा कसा व केव्हां करण्याचा ?

(९) भरण्याबद्दल ठरलेल्या गोष्टी योग्य तऱ्हेनें अंमलात येत आहेत किंवा नाहीं ?

(१०) मिळकतीवर कांहीं बोजे आहेत किंवा कसें ?

(११) बोजे असल्यास त्याबद्दल काय व्यवस्था करावयाची ?

(१२) खरेदीबाबत ज्या अटी ठरल्या आहेत त्या कायदेशीर आहेत किंवा नाहींत ?

(१३) खरेदीपत्र लिहिण्याचा खर्च कोणी करावयाचा ?

(१४) खरेदीच्या स्टँपाचा खर्च कोणी करावयाचा ?

(१५) खरेदीपत्र नोंदण्याचें असल्यास नोंदणीचा खर्च कोणी करावा ?

## ५८ खरेदीपत्राचा स्टँप

खरेदीपत्राच्या स्टँपाबाबत स्थावर मिळकतीचें कोष्टक आहे तें असें—

### कोष्टक

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| जेव्हां खरेदी पत्रांतील भरण्याची किंमत अमुक रुपयांपेक्षां जास्त व अमुक रुपयांपेक्षां कमी नाहीं. | मुंबई इलाखा | मध्यप्रांत व वऱ्हाड. | मुंबई शहर | अहमदाबाद, पुणें व कोणचेंही शहर. |
| | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. |
| ०——५० | ० ८—० | ०—८—० | ०—८—० | ०—८—० |
| ५०——१०० | १—०—० | १—०—० | १—०—० | १—०—० |
| १००——२०० | २—०—० | २—०—० | २—०—० | २—०—० |
| २००——३०० | ४—८—० | ३—८—० | १०—०—० | ७—८—० |
| ३००——४०० | ६—०—० | ५—८—० | १४—०—० | १०—८—० |
| ४००——५०० | ७—८—० | ७—८—० | १८—०—० | १३—८—० |
| ५००——६०० | ९—०—० | ९—०—० | २२—०—० | १६—८—० |
| ६००——७०० | १०—८—० | १०—८—० | २६—०—० | १९—८—० |
| ७००——८०० | १२—०—० | १२—०—० | ३०—०—० | २२—८—० |
| ८००——९०० | १३—८—० | १३—८—० | ३४—०—० | २५—८—० |
| ९००—१००० | १५—०—० | १५—०—० | ३८—०—० | २८—८—० |
| हजाराच्या पुढें ५०० रुपयांच्या कोणत्याही भागास. | १०—०—० | ७—८—० | २०—०—० | १३—०—० |

**टीपः**—निरनिराळ्या प्रांतांत स्टँपाचें प्रमाण वाढविण्यांत आलेलें असून इंडियन स्टँप ॲक्टमध्यें सांगितलेल्या आकाराशिवाय सरचार्ज घेण्यांत येतो. या सरचार्जमुळें मुंबई प्रांतांत स्टँपाचें प्रमाण दीडपट झालें आहे. कोणताही दस्तऐवज करण्यापूर्वी स्टँप व सरजार्ज याबद्दल माहिती घ्यावी.

निबंध ५१७८३



## नमुने.

# ५९ जमिनीचें खरेदीपत्र

मौजे............येथील रयतावा जमिनीचें खरेदीपत्र रु. १५५१ चे.

(१) रा. रा.................... (धनकोचें नांव, गांव, वगैरे) यांसी, खरेदीपत्र लिहून देणार रा. रा.............(ऋणकोचें नांव. गांव वगैरे) लिहून देतो खरेदीपत्र ऐसाजे—

(२) आम्हीं आमचे गरजेकरतां आपलेकडून रुपये १५५१ सालीं भरणेंत तपशील दाखविल्याप्रमाणें घेतले आहेत व त्याबद्दल आम्हांस मृत्युपत्राधारें आलेलीं व हल्लीं आमचे मालकी वहिवाटीची जमीन......तो... ... ... ...मौजे...... गांवचें रानांतील जमीन......रि. स......एकर गुंठे......आकार... ...वर्णन.

(३) येणेंप्रमाणें चतुःसीमेंतील जल, तरुकाष्ट, पाषाण, निधिनिक्षेप आदीकरून तदंगभूत वस्तूसहीत जमीन आपल्यास रक्कम रु. १५५१ (पंधराशें एकावन्न) आम्हीं निखालस खूष खरेदी देऊन आजरोजीं आपलें ताब्यांत दिली आहे. तरी आतां या खरेदीपत्राचें आधारें हल्लीं आहे तो व पुढें बसेल तो सरकारी सारा गांवाकडे देऊन निरंतर सुखरूप पाहिजे तशी वहिवाट व विल्हेवाट करण्यास आपण पूर्ण मालक झालां आहांत. तुमचे वहिवाटीस जर कोणाची हरकत वगैरे आल्यास ती आम्हीं आमचे खर्चानें दूर करून देऊं; शिवाय हरकतीमुळें आपली नुकसानी झाल्यास ती आम्हीं आमचे खर्चानें दूर करून देऊं; व नुकसानी भरून देऊं. सदर्हू मिळकतीवर आम्हीं कोणाचा बोजा केलेला नाहीं. कदाचित् बोजा निघाल्यास तो आमचा आम्हीं भागवूं. त्याची जबाबदारी आपल्यावर येऊं देणार नाहीं. सदर्हू मिळकतीबद्दल आमचे मालकीचे म्हणजे आमच्या नंबरचें असलेलें मृत्युपत्र भोगण्यासाठीं आपलेकडे दिलें आहे.

(४) खरेदीपत्राप्रमाणें रु. १५५१ चा भरणा आम्हांस झाला त्याचा तपशील-

१०० रु. ता.........रोजीं इमारतीकरतां आम्हांस पोंचले आहेत ते.

१४५१ } रक्कम रुपये..............मे. रावसाहेब सब रजिस्ट्रार... ...........तो यांचे समक्ष घ्यावेत ते.

१५५१

(५) येणेंप्रमाणें रुपये १५५१ पंधराशें एकावनचा भरणा झाला म्हणजे भरण्याची तक्रार राहणार नाहीं; व निराळे भरणा पावतीची जरूर राहिली नाहीं. सदरहू खरेदीपत्रांतील सर्व करार आम्हांस व आमचे वारसास व मृत्युपत्र चालविणारांस लागू आहेत म्हणून लिहून दिले खरेदीपत्र सही ता.·········दस्तूर.

साक्ष

१······················ खरेदी देणाऱ्याची सही

२······················ अथवा आंगठा.

## ६० घरजागेचें खरेदीपत्र

मौजे········ येथील घराचें खरेदीपत्र रु. ४०० चें.

(१) रा. रा.·············(धनकोचें नांव, गांव वगैरे) यांसी, खरेदीपत्र लिहून देणार रा. रा.················(ऋणकोचें नांव, गांव वगैरे) लिहून देतों खरेदीपत्र ऐसाजे—

(२) मी तुमचेपासून लोकांचें देणें भागविण्याकरितां व घरखर्चाकरितां खालीं भरण्यांत तपशील दाखविल्याप्रमाणें रुपये ४०० (चारशें) घेतले आहेत; व सदरहू रुपयांस मोबदला म्हणून माझें वडिलार्जित मालकी वहिवाटीची घर जागा··········खुष खरेदी देतों ती—

(३) ई··········तो··········पैकीं मौजे··········येथील गांवठाणांतील घरजागा पूर्वाभिमुखी कमेटी नं.·············ची यांतील इमला वट्खण·······व खुली जागा ०×० हातमापाची मिळून चतुःसिमा वर्णन—

येणेंप्रमाणें चतुःसिमेंतील जमीन, घर व जागा तुम्हांस खुष खरेदी देऊन आज रोजीं तुमचे ताब्यांत दिली आहे. तरी आतां सदरहू जागेची सरकारीबाब तुम्ही परभारें भागवून पुत्रपौत्रादि, वंशपरंपरा, वहिवाट अगर विनियोग पाहिजे तसा करावा. आतां सदरहू घरजागेवर माझा अगर माझे वारसांचा कोणत्याहि प्रकारें मालकीहक्क संबंध राहिला नाहीं. जागेचे वहिवाटीस जर कोणाची तुम्हांस हरकत आली तर ती मी माझे खर्चानें दूर करून देईन; वक्तशीर हरकत दूर न झाल्यामुळें त्या कामीं तुमचें नुकसान झाल्यास भरून देईन; सदरहू जागेवर कोणाचा बोजा नाहीं. निघाल्यास जबाबदारी मजवर आहे.

(stamp) दा. क्र. 63.L.9

(४) सदरहू रकमेचा भरणा— 

१६७ रु रा. रा. नांव ..................यांचा देणें, तारणगहाणाचे याच जागेवर असलेले भागवून तारणदस्त भरपाई करून त्यास तुम्ही रक्कम दिली ती १६७ रुपये. ३३ रुपये मी तुमचे रोख इमारतीकरितां घेतले ते ३३ रुपये २०० रुपये मेहेरबान सब रजिस्ट्रार............यांचे समोर द्यावेत ते.

(५) एकूण रुपये ४०० (चारशें) चा भरणा झाला आहे. सबब भरणेंसंबंधीं तक्रार राहिली नाहीं.......यांतील करार मला व माझे वारस व स्थावर जंगम इस्टेटीस लागूं आहेत म्हणून लिहून दिलें खरेदीपत्र ता.......किंवा दस्तुर......

साक्ष

१............... खरेदी देणाऱ्याची सही

२............... अथवा आंगठा

## ६१ विशिष्ट मजकूर असलेलें जमिनीचें खरेदीपत्र

मौजे...............येथील रयतावा (रयतवारी) जमिनीचें खरेदीपत्र रुपये ३,००० (तीन हजार) चें

(१) रा. रा.........(धनकोचें नांव, गांव वगैरे) यांसीं खरेदीपत्र लिहून देणार रा. रा.......(ऋणकोचें नांव, गांव वगैरे) लिहून देतों खरेदीपत्र ऐसाजे,—

(२) मी तुम्हां उभयतांपासून निमे निमे रुपये अनुक्रमें १५००+१५०० एकूण रु. ३००० (तीन हजार) घेऊन त्यांस मोबदला माझे वाटणीस आलेल्या वडिलार्जित वहिवाटीच्या जमिनी निखालस खुष खरेदी त्यांतील माझे असलेले सर्व हक्क संबंधासह देतो; त्यांचें वर्णन खालीलप्रमाणें,—

(३) ई.........ता.............पैकीं मौजे.........गांवचें रानांतील जमीन रि. स. नं..........ए.......... गुठे...... आकार वर्णनाची प्रत जमीन मौजे......येथील......वर्णनाची, प्रत जमीन मौजे...... येथील......वर्णनाची येणेंप्रमाणें चतु:सिमेंतील जिराईत, बागाईत जमिनी, जल, तरु, काष्ट, पाषाण, निधी-निक्षेप झाडझुड तदंगभूत वस्तूंसह सदरील रुपयांस आजरोजीं खुष खरेदी देऊन

सदरील जमिनीवर माझा वडिलार्जित असलेला सर्व हक्क व खरेदीपत्रानें आलेले हक्क या खरेदीपत्रानें दिला असून आजरोजीं सदरच्या जमिनी तुमचे कबजांत दिल्या आहेत. तरी यापुढें सदरहू जमिनींचा सरकारी आकार व लोकल फंड तुम्ही परभारें भागवून पुत्रपौत्रादि वंशपरंपरा निरंतर वहिवाट करावी. आतां सदरच्या जमिनी ज्या कोणास पाहिजे त्यांस, पाहिजे त्या शर्तीनें गहाण, दान, बक्षीस, खरेदी वगैरे देणेस या खरेदीपत्राधारें संपूर्ण मालक झाला आहांत. जमिनीचे वहिवाटीस कोणाची हरकत आली तर ती माझे जातीवर दूर करून देईन; तुम्हांस खर्चाची तोशीस लागूं देणार नाहीं. सदरहू जमिनींचे वहिवाटीस भाऊबंदी, हरकत वगैरे आल्यास जबाबदारी मजवर आहे. जमिनीवर कोणाचा बोजा केलेला नाहीं, निघाल्यास जबाबदारी मजवर आहे. सदरहू रकमेचा भरणा—

(४) रु. १५० ता.······रोजीं आम्हांस दिले ते. रु. २८५० आजरोजीं आम्हांस मे. सब-रजिस्ट्रसाहेब यांचे समोर द्यावेत.

(५) एकूण रुपये ३००० (तीन हजार) चा भरणा झाला असल्यानें भरणेंसंबंधीं तक्रार राहिलेली नाहीं; व निराळे भरणा पावतीची जरूर नाहीं. यांतील करार मला व माझे वारसांस व माझे स्थावर जंगम इस्टेटीस लागूं आहेत. म्हणून लिहून दिलेलें खरेदीपत्र राजीखुषीनें, स्वसंतोषानें व अक्कल हुशारीनें सही

ता.······मा.······सन······ दस्तुर················

साक्ष

१·········· खरेदी देणाऱ्याची सही अथवा

२············· आंगठा

## ६२ विशिष्ट मजकूर असलेलें घरजागेचें खरेदीपत्र

शहर······येथील······नंबरचें घराचें खरेदीपत्र रुपये ६०० (सहाशें) चें

(१) रा. रा.·········(धनकोचें नांव, गांव वगैरे) यांसी खरेदीपत्र लिहून देणार रा. रा.······(ऋणकोचें नांव, गांव वगैरे) लिहून देतों खरेदीपत्र ऐसाजे-

(२) मी तुमचेपासून रक्कम रुपये ६०० (सहाशें) घेऊन त्यांस मोबदला खुष खरेदी देऊन आजरोजीं तुमचे कबजांत देतो ती मिळकत माझे स्वसंपादित खरेदीमालकींची वहिवाटींची येणेंप्रमाणें:—

(३) ( शहर )······येथील ब्लॉक नं.······याचा सिटी सर्वे नं.······ची घरजागा दक्षिण–उत्तर लांबी······फूट व रुंदी पूर्व–पश्चिम·········फूट याची चतु:सीमा ( वर्णन )······

येणेंप्रमाणें वर्णनाची मिळकत सदरील रुपयांस तुम्हांस खुष खरेदी देऊन आज रोजीं तुमचें कबजांत दिली आहे; तरी तीजबद्दल यापुढें द्यावा लागणारा सरकारी सर्व आकार दरसाल तुमचा तुम्ही परभारें भागवून तुम्ही व तुमचें पुत्रपौत्रादि वंशपरंपरा निरंतर पूर्ण मालकीनें, पाहिजे तशी वहिवाट व विल्हेवाट करावी. तुमचे वहिवाटीस कोणाची कोणत्याहि प्रकारची हरकत वगैरे आल्यास ती मी माझे खर्चानें दूर करून देईन व हरकतीमुळें होणारें नुकसान भरून देईन. आतां तिजवर माझा अगर माझे वारसांचा कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध बिलकूल राहिला नाहीं. सर्व प्रकारचे हक्कसंबंध तुम्हांस या खरेदीपत्रानें खरेदी दिले आहेत. तिजवर मी यापुढें कोणाचा बोजा वगैरे केलेला नाहीं. निघाल्यास तो माझा मी परभारा भागवून त्याची तुम्हांस तोसीस लागूं देणार नाहीं.

सदरहू मिळकतीचें माझें नांवचें असलेलें नोंद नं.······चें खरेदीपत्र व इतर सर्व कागदपत्र तुम्हांकडे भोगवट्याकरितां राहण्यास दिलें आहेत. या खरेदीपत्राचा भरणा मजला झाला तो खालीलप्रमाणें.

(४) ३०० रु. मी आज रोजीं तुम्हांकडून चेक नं.······नें घेतले आहेत.

३०० { रु. तुम्ही मला मे. सब–रजिस्ट्रारसाहेब (गांव)······यांचे समोर रोख द्यावेत.

६०० रुपये

(५) येणेप्रमाणें रुपये ६०० (सहाशें) चा भरणा मजला झाला आहे. सबब भरण्याबद्दल तक्रार नाहीं; व निराळें भरणापावतीची जरूर नाहीं. सदरचे सर्व करार मला व माझें स्थावरजंगम इस्टेटीस लागूं आहेत. म्हणून लिहून दिलें खरेदीपत्र अक्कलहुशारीनें व राजीखुषीनें. सही तारीख······ दस्तुर············

साक्ष

१··············

२··············

खरेदी देणाऱ्याची सही अथवा आंगठा.

# प्रकरण ९ वें

## मृत्युपत्र

### ६३ मृत्युपत्र म्हणजे काय ?

मरणानंतर आपल्या मिळकतीची विल्हेवाट कशा तऱ्हेनें केली जावी याबद्दल मृत्युपत्र करणाऱ्याची जी इच्छा असते, त्या इच्छेबद्दलचा कायदेशीर उद्गार म्हणजे मृत्युपत्र ( Will ) होय. मृत्युपत्राचा खुलासा करण्याकरितां अगर त्यांत बदल करण्याकरितां अथवा कांहीं जादा मजकूर घालण्याकरितां केलेल्या कागदास " उपमृत्युपत्र " ( condicil ) असें म्हणतात. उपमृत्युपत्र हा मृत्युपत्राचा भाग आहे असें समजण्याचें असतें, ( हिंदुस्थानचा वारसाबाबत कायदा, कलम २ )

मृत्युपत्राच्या बाबतींत खालील गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत--

(१) मृत्युपत्र हा मृत्युपत्र करणाऱ्याच्या इच्छेचा उद्गार आहे; हा उद्गार कायदेशीर पाहिजे.

(२) हा उद्गार केवळ कायदेशीर असून चालणार नाहीं, तर मिळकतीची विल्हेवाट करण्यासंबंधानें तो असला पाहिजे.

(३) जी मिळकत विल्हेवाट करावयाची ती मृत्युपत्र करणाऱ्याच्या मालकीची पाहिजे अथवा ती मिळकत विल्हेवाट करण्यासाठीं मृत्युपत्र करणाऱ्यास अधिकार पाहिजे.

(४) मृत्युपत्रांत ज्या विल्हेवाटीचा उल्लेख केलेला असतो, ती विल्हेवाट मृत्युपत्र करणाऱ्याच्या मरणानंतर अमलांत येण्याची असते.

(५) मृत्युपत्र करणारा हयात असेपर्यंत त्याला आपल्या इच्छेप्रमाणें केव्हांही मृत्युपत्र रद्द करतां येतें.

### ६४ मृत्युपत्र व बक्षीसपत्र यांतील साम्यभेद

बक्षिसपत्रानें दिलेली देणगी व मृत्युपत्रानें दिलेली देणगी त्यांच्या बाबतींत कांहीं अपवाद खेरीज करून सारखेच नियम आहेत. या दोन्ही देणग्या एकाच तत्त्वावर अधिष्ठित झालेल्या आहेत. सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल कीं, मृत्युपत्रानें,

दिलेली देणगी बक्षिसपत्रानें दिलेल्या देणगी सारखींच आहे, मात्र बक्षिसपत्रानें दिलेली देणगी ताबडतोब अमलांत आणण्याची असते व मृत्युपत्रानें दिलेली देणगी मृत्युपत्र करणाऱ्याच्या मरणानंतर अमलांत येण्याची असते, एखाद्या मनुष्यास जी मिळकत दुसऱ्यास बक्षिस देण्याचा अधिकार आहे, त्यास ती मिळकत मृत्युपत्रानें दुसऱ्याला देण्याचा अधिकार आहे, ( टागोर वि. टागोर, बेंगाल लॉ रिपोर्टर पान, ३७७; मोतीबाहू वि. यमूबाई, २१ मुंबई. ७०९ )

मृत्युपत्र व बक्षीसपत्र यांतील फरक खालीलप्रमाणें:—

(१) बक्षीसपत्राचा अम्मल ताबडतोब होण्याचा असतो; पण मृत्युपत्राचा अम्मल मृत्युपत्र करणाऱ्याच्या मरणानंतर होण्याचा असतो.

(२) बक्षीसपत्र एकदां पूर्ण केल्यानंतर तें रद्द करतां येत नाहीं, परंतु मृत्युपत्र आपल्या हयातींत केव्हांही रद्द करतां येतें.

## ६५ मृत्युपत्र करण्याची पात्रता.

मृत्युपत्र करणाऱ्यास काय पात्रता असावी लागते. याबावतींत नियम आहे तो असा—

जो समजण्याच्या स्थितींत आहे व जो अज्ञान नाहीं, अशा कोणाही मनुष्यास आपली मिळकत मृत्युपत्रानें देतां येतें, ( हिंदुस्तानचा वारसांबाबत कायदा, कलम ५९ ).

या नियमावरून पात्रतेच्या बाबतींत दोन गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत—

मृत्युपत्र करणारा मनुष्य समजण्याच्या स्थितींत पाहिजे. बेशुद्ध असलेल्या इसमानें अगर आजारामुळें आपण काय करतों हें न समजणाऱ्या एकाद्या मनुष्यानें मृत्युपत्रावर सही केली तर तें मृत्युपत्र कायदेशीर नव्हें.

(२) मृत्युपत्र करणारा मनुष्य सज्ञान पाहिजे. एखाद्या अज्ञान मनुष्यानें मृत्युपत्र केलें तर तें कायदेशीर नाहीं व कोणावर बंधनकारकहि नाहीं.

वर आपण सज्ञान व अज्ञान असे जे दोन शब्द वापरले आहेत, त्यांचा विविक्षित अर्थ आहे. सज्ञान याचा अर्थ ज्याचें वय १८ वर्षे पूर्ण झालेलें आहे असा मनुष्य. गार्डीयन व वॉर्डस् ॲक्टप्रमाणें एखाद्या मनुष्याचा कोणी पालक नेमला

असेल तर असा मनुष्य १८ वर्षें पूर्ण झाल्यानंतर सज्ञान न होतां २१ वर्षें पूर्ण झाल्यानंतर सज्ञान होतो. अज्ञान याचा अर्थ जो सज्ञान नव्हे तो अथवा ज्याचें वय १८ वर्षांच्या आंत आहे तो. जर गार्डीयन व वॉर्डस् अॅक्टप्रमाणें एखाद्या मनुष्याचा पालक नेमला असेल तर तो २१ वर्षें पूर्ण होईपर्यंत अज्ञान असतो. ( इंडियन मेनॉरिटी अॅक्ट अथवा सज्ञानपणाचा कायदा. )

## ६६ मृत्यु पत्रांतील मिळकत घेण्याची पात्रता .

आपण पूर्वी असा नियम पाहिला आहे कीं, मृत्युपत्र करणारा मनुष्य समजाण्याच्या मनःस्थितींत पाहिजे व तो सज्ञान पाहिजे. ज्याला मृत्युपत्रांतील मिळकत दिलेली असते त्याच्या बाबतींत हा नियम नाहीं. अज्ञान अगर वेडा अथवा कोणत्याही कारणामुळें वारसा हक्कास अपात्र असणारा, अशा मनुष्यास मृत्युपत्रा मिळकत देण्यास कांहीं हरकत नाहीं.

## ६७ मृत्युपत्र कसें करण्याचें ?

मृत्युपत्र लेखी पाहिजे कीं तोंडी पाहिजे व त्यावर साक्षिदारांच्या साक्षी पाहिजे कां नकोत या बाबतींत नियम आहेत ते असें—

(१) सन १८७० चा हिंदु मृत्युपत्राचा कायदा पास होण्यापूर्वी म्हणज १ सप्टेंबर १७७० च्या पूर्वी हिंदु, बौद्ध, शीख व जैन यांनीं केलेलें मृत्युपत्र लेखी पाहिजेत असा नियम नव्हता. त्यांनीं तोंडी मृत्युपत्र केल्यास अथवा मृत्युपत्र करणाऱ्याची सही अगर साक्षिदारांच्या साक्षी न घेतां लेखी मृत्युपत्र केल्यास तें कायदेशीर होत होते.

(२) १ सप्टेंबर १८७९ नंतर मद्रास व मुंबई शहर आणि बंगालच्या गव्हर्नरच्या ताब्यांत असलेला प्रदेश यामध्यें राहणारे हिंदु, बौद्ध शीख व जैन यांनीं केलेलें मृत्युपत्र लेखी पाहिजे आणि त्यावर निदान दोन साक्षिदारांच्या सह्या पाहिजेत, असा नियम झाला.

(३) वर सांगितलेले प्रदेश सोडून बाकीच्या ठिकाणीं राहणाऱ्या हिंदु, बौद्ध वगैरे लोकांनीं तोंडी मृत्युपत्र केल्यास तें चालत होते; मात्र बाहेर राहणाऱ्या हिंदु, बौद्ध वगैरे लोकांनीं मद्रास व मुंबई शहर आणि बंगालच्या गव्हर्नरच्या ताब्यांतील प्रदेश यामधील स्थावर मिळकतीबाबत मृत्युपत्र केलें तर तें लेखी पाहिजे असा नियम होता.

(४) १ जानेवारी १९२७ नंतर ब्रिटिश हिंदुस्थानांत राहणाऱ्या हिंदु, शीख व जैन या लोकांनीं केलेलें कोणतेही मृत्युपत्र लेखी पाहिजे व त्यावर निदान दोन साक्षिदारांच्या साक्षी पाहिजेत असा नियम आहे.

(५) कायद्याची अशी परिस्थिती असल्यामुळें व हल्लीं १९४४ साल सुरुं असल्यामुळें आपणांस असें म्हणतां येईल कीं, हिंदु, बौद्ध, शीख व जैन ह्यांनीं जें मृत्युपत्र करण्याचें तें लेखी पाहिजे व त्यावर निदान दोन साक्षिदारांच्या साक्षी पाहिजेत.

## ६८ कोणती मिळकत मृत्युपत्रानें देतां येईल ?

या बाबतींत सर्वधारण नियम असा आहे कीं जी मिळकत बक्षिसपत्रानें दुसऱ्यास देतां येणार नाहीं, ती मिळकत मृत्युपत्रानें दुसऱ्यास देतां येणार नाहीं. या बाबतींत आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आपली पत्नी अगर दुसरा कोणताही नातलग यांच्या पोटगीच्या कायदेशीर हक्कास बाध येईल अशा तऱ्हेनें कोणाही मनुष्यास आपली मिळकत मृत्युपत्रानें दुसऱ्यास देतां येणार नाहीं.

कोणती मिळकत मृत्युपत्रानें देतां येईल याबाबत विशिष्ट नियम आहेत—

(१) कोणाही हिंदु मनुष्यास ( हिंदु या शब्दांत हिंदु, शीख व जैन यांचा अंतर्भाव होतो. ). आपली स्वतःची अगर स्वसंपादित मिळकत मृत्युपत्रानें देतां येतें.

(२) दायभाग कायद्याप्रमाणें बापाला आपली मिळकत–मग ती स्वसंपादित असो अथवा वडिलार्जित असो–मृत्युपत्रानें देतां येतें. त्याचप्रमाणें कोणत्याही सह-भागिदाराला एकत्र कुटुंबांतील आपला हिस्सा मृत्युपत्रानें देतां येतो.

(३) मिताक्षरा कायद्याप्रमाणें कोणत्याही सहभागिदाराला एकत्र कुटुंबांतील आपला हिस्सा मृत्युपत्रानें देतां येत नाहीं. मिताक्षरा कायद्याप्रमाणें बापाला देखील एकत्र कुटुंबांतील आपला हिस्सा मृत्युपत्रानें देतां येत नाहीं.

(४) एकच सहभागिदार जिवंत असेल व बाकीचे सर्व सहभागीदार मयत असतील तर त्याला एकत्र कुटुंबांतील मिळकत स्वतःच्या मिळकतीप्रमाणें मृत्युपत्रानें दुसऱ्यास देतां येतें. मृत्युपत्र हें करणाऱ्याच्या मरणाच्या तारखेपासून अमलांत येतें त्यामुळें एकमेव असणाऱ्या सहभागिदारानें मृत्युपत्र केलें व व पुढें दुसरा

सहभागिदार जन्माला आला, ( उदाहरणार्थ—त्या एकमेव सहभागिदाराला एखादा मुलगा झाला ) तर एकत्र कुटुंबांतील मिळकतीबाबत सहभागिदारानें केलेलें मृत्युपत्र रद्द होतें व ती मिळकत दुसरा जो सहभागीदार जन्माला आला असेल त्याला वारसाहक्कानें मिळते.

(५) मिताक्षरा कायद्याप्रमाणें वडिलार्जित जंगम मिळकतीपैकीं थोडासा भाग बक्षिसपत्रानें दुसऱ्यास देण्याचा बापाला अधिकार आहे, परंतु अशी मिळकत दुसऱ्यास देण्याचा त्याला अधिकार नाहीं.

(६) हिंदु स्त्रीला आपलें स्त्रीधन दुसऱ्यास मृत्युपत्रानें देण्याचा अधिकार आहे. या बाबतींत नियम आहेत ते असें—

सौदायिक स्त्रीधनावर नवऱ्याचा अधिकार नसल्यामुळें नवऱ्याच्या संमतीशिवाय असें स्त्रीधन दुसऱ्यास मृत्युपत्रानें देण्याचा हिंदु स्त्रीला अधिकार आहे, असौदायिक स्त्रीधनावर नवऱ्याचा ताबा असल्यामुळें नवऱ्याच्या संमतीशिवाय असें स्त्रीधन दुसऱ्यास मृत्युपत्रानें देण्याचा हिंदु स्त्रीला अधिकार नाहीं. नवऱ्याच्या मरणानंतर असौदायिक स्त्रीधन देखील दुसऱ्यास मृत्युपत्रानें देण्याचा हिंदु स्त्रीला अधिकार आहे.

(७) देशमुख कायद्याप्रमाणें ( हिंदु वुइमेन्स राईटस् टू पॉपर्टी ॲक्ट १९३७ ) मिळालेल्या मिळकतीवर हिंदु स्त्रीची पूर्ण मालकी नसते, तर अशा मिळकतीवर तिची मर्यादित मालकी असते. अशी मिळकत मृत्युपत्रानें दुसऱ्यास देण्याचा तिला अधिकार नाहीं.

## ६९ मृत्युपत्र रद्द अगर दुरुस्त कसें करण्याचें ?

(१) मृत्युपत्रांत अगर उपमृत्युपत्रांत ज्या ज्या दुरुस्त्या केल्या असतील त्याच्याखालीं मृत्युपत्र करणाऱ्याची सही पाहिजे व साक्षिदारांच्या साक्षी पाहिजेत.

(२) मृत्युपत्रांत अथवा उपमृत्युपत्रांत जो बदल अगर जी दुरुस्ती करण्याची तो बदल अगर ती दुरुस्ती करतांना— मृत्युपत्र करतांना—जे नियम सांगितलें आहेत तेच पाळण्याचे आहे.

(३) मृत्युपत्र अगर उपमृत्युपत्र रद्द करण्याचें असेल तर ते नाश करावें अथवा मृत्युपत्र करतांना जे नियम सांगितलें आहेत ते नियम अमलांत आणून मृत्युपत्र रद्द करण्यासाठीं दुसरा एखादा कागद करावा.

## ७० रद्दबातल मृत्युपत्र ( void will )

रद्दबातल मृत्युपत्राबाबत खालील नियम लक्षांत ठेवण्यासारखे आहेत—

(१) मृत्युपत्र जाणूनबुजून केले नसेल तर ते रद्दबातल होय.

(२) जुलूम जबरदस्ती, कपट, अप्रशस्त दाब, गैरसमज, अशा योगानें अगर त्यासारख्या प्रकारानें एखाद्याकडून मृत्युपत्र करून घेतलें असेल तर तें रद्दबातल होय.

(३) वार्धक्य, आजारीपण अथवा कोणते ही व्यंग ह्या योगानें समजण्याची पात्रता कमी झाली असेल व आपण काय करतों हें पुरते समजत नसेल, तर अशा इसमानें केलेलें मृत्युपत्र रद्दबातल होय.

(४) अपघात अगर चूक यामुळें झालेलें मृत्युपत्र रद्दबातल होय.

## ७१ मुसलमानांनीं मृत्युपत्राबाबत लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी

वरील नियम हिंदु, बौद्ध; शीख व जैन या लोकांना लागूं आहे. मुसलमानांनीं जें मृत्युपत्र करण्याचे त्याबाबतींत मुसलमानी कायद्यांतील नियम थोडक्यांत असे-

### १ मृत्युपत्र म्हणजे काय ?

मुसलमानी कायद्याप्रमाणें मरणानंतर आपल्या मिळकतीची विल्हेवाट कशा-तऱ्हेनें केली जावी याबद्दल एखाद्या मुसलमानाची जी इच्छा असते त्या इच्छेबद्दलचा कायदेशीर उद्गार म्हणजे मृत्युपत्र होय.

### २ मृत्युपत्र करण्याची पात्रता

जो समजण्याच्या मनःस्थितींत आहे व जो अज्ञान नाहीं, अशा कोणाहीं मुसल्मान मनुष्यास आपली मिळकत मृत्युपत्रानें देतां येतें.

### ३ मृत्युपत्र करण्याच्या पात्रतेबद्दल विशिष्ट नियम

(अ) एखाद्या अज्ञान मुसलमानानें मृत्युपत्रानें एखाद्याला देणगी दिली व अज्ञानपणीं त्या देणगीला अनुमोदन दिलें तर अशी देणगी कायदेशीर होय.

(ब) एखाद्या मुसलमानानें समजण्याच्या मनःस्थितींत नसतांना मृत्युपत्र केलें व त्यानंतर तो समजण्याच्या मनःस्थितींत आला तर असें मृत्युपत्र कायदेशीर नव्हें.

(क) शिया कायद्याप्रमाणें एखाद्या मुसलमानानें विष घेतल्यानंतर अथवा आत्महत्या करण्याकरितां कांहींतरी कृत्य केल्यानंतर मृत्युपत्र केलें तर तें कायदेशीर नव्हें.

## ४ मृत्युपत्रांतील मिळकत घेण्याची पात्रत

मृत्युपत्रांतील मिळकत घेण्याच्या पात्रतेबद्दल असा नियम आहे कीं, मुसलमानानें देणगी देण्याची ती ज्याला मिळकत धारण करण्याची पात्रता आहे अशा मनुष्यास द्यावी, अगर एखाद्या संस्थेस द्यावी, अगर दानधर्माकरितां द्यावी.

## ५ वारसांस देणगी

एखाद्या मुसलमानानें मृत्युपत्रानें आपल्या वारसांना देणगी दिल्यास ती कायदेशीर नाहीं, मात्र बाकीच्या वारसांनीं मृत्युपत्र करणाऱ्याच्या मरणानंतर त्या देणगीबद्दल आपली संमति दर्शविली तर अशी देणगी कायदेशीर होते. वारसांपैकीं एखाद्या वारसानें संमति दिली तर त्याच्या हिश्शापुरती देणगी कायदेशीर होते.

## ६ मृत्युपत्र कसें करण्याचें ?

एखाद्या मुसलमानानें केलेलें मृत्युपत्र लेखी पाहिजे असा नियम नाहीं. मृत्युपत्र तोंडी असलें तरीसुद्धां तें कायदेशीर होय. मृत्युपत्र लेखी असेल तर त्यावर मृत्युपत्र करणाऱ्याची सही पाहिजे अगर साक्ष पाहिजे असाही नियम नाहीं. मृत्युपत्र तोंडी असलें तर अमुकच साक्षीदार पाहिजेत अथवा किमानपक्षीं इतके साक्षीदार पाहिजेत असाही नियम नाहीं.

ब्रिटिश हिंदुस्थानांत राहाणाऱ्या हिंदु, बौद्ध, शीख, व जैन या लोकांनीं १ जानेवारी १९२७ नंतर केलेले कोणतेंही मृत्युपत्र लेखी पाहिजे व त्यावर निदान दोन साक्षिदारांच्या साक्षी पाहिजेत असा नियम आहे; पण मुसलमानाच्या मृत्युपत्राच्या बाबतींत हा नियम लागूं नाहीं. मुसलमानानें केलेलें मृत्युपत्र लेखी चालेल किंवा तोंडी चालेल व लेखी असलें तर त्यावर सही अगर साक्षी पाहिजे असाही नियम नाहीं.

## कोणती मिळकत मृत्युपत्रानें देतां येईल ?

कोणती मिळकत मृत्युपत्रानें देतां येईल या बाबतींत थोडक्यांत नियम असा कीं, जी दुसऱ्यास देतां येण्यासारखी आहे अशी कोणतीही मिळकत मृत्युपत्रानें

दुसऱ्यास देतां येईल, मात्र ती मिळकत मृत्युपत्र करणाऱ्याच्या मरणसमयीं अस्तित्वांत असली पाहिजे. मृत्युपत्र करण्याचे वेळीं ती मिळकत अस्तित्वांत नसली तरी चालेल.

### ८ मिळकतीचा कितवा हिस्सा मृत्युपत्रानें देतां येईल ?

और्ध्वदेहिक ( उत्तरक्रिया ) खर्च व कर्ज भागून जी मिळकत शिल्लक राहील त्या मिळकतीच्या एक तृतियांश हिश्यापेक्षां जास्त मिळकत कोणीही मुसलमानास मृत्युपत्रानें दुसऱ्यास देतां येणार नाहीं.

### ९ एक तृतीयांश मिळकतीपेक्षां जास्त मिळकत मृत्युपत्रानें दिल्यास

एक तृतियांश मिळकतीपेक्षां जास्त मिळकत मृत्युपत्रानें दिल्यास तें कायदेशीर होणार नाहीं, मात्र वारसानीं मृत्युपत्र करणाऱ्याच्या मरणानंतर आपली संमति दिली तर मृत्युपत्रानें दिलेल्या देणग्या कायदेशीर होतात. एक तितृयांश मिळकतीपेक्षां जास्त मिळकत मृत्युपत्रानें दिल्यास व वारसानीं आपली संमति न दिल्यास मृत्युपत्रानें दिलेल्या देणग्या त्या प्रमाणांत कमी करण्यांत येतील.

## ७२ स्टँप व नोंदणी

मृत्युपत्र हिंदु, बौद्ध, शीख, जैन अथवा मुसलमान यापैकीं कोणीहि केलें असलें तरी मृत्युपत्रास स्टँपाची आवश्यकता असत नाहीं.

त्याचप्रमाणें मृत्युपत्र नोंदणें अगर न नोंदणें हें मृत्युपत्र करणाऱ्याच्या मर्जीवर अवलंबून आहे. मृत्युपत्र नोंदलेंच पाहिजे असा नियम नाहीं.

## नमुने.

## ७३ मृत्युपत्राचा सर्वसाधारण नमुना मृत्युपत्र

(१) मी ········ ( नांव ) ······ जात ········· धंदा ······ वय ······ राहाणार ······ या लेखाआधारें मृत्युपत्र करतों ऐसाजे—

(२) मी हल्लीं अंथरुणावर निजून आहे. वार्धक्यामुळें माझा केव्हां अंत होईल याचा नेम नाहीं. म्हणून माझ्या पश्चात् माझ्या इस्टेटीची विल्हेवाट कशा तऱ्हेनें केली जावी याबद्दल मी हें मृत्युपत्र करून ठेवीत आहे.

(३) माझी स्थावर, जंगम इस्टेट खालीलप्रमाणें—

(४) मला तीन मुली आहेत. मुलगा नाहीं, ( अगर जें काय लिहावयाचें असेल तें लिहावें ) माझी मोठी मुलगी·········(नांव) हिला माझ्या पश्चात् जी इस्टेट मिळण्याची ती खालीलप्रमाणें:—

माझी मधली मुलगी·········( नांव ) हिला माझ्या पश्चात् जी इस्टेट मिळण्याची ती खालीलप्रमाणें:—

माझी धाकटी मुलगी·········( नांव ) हिला जी इस्टेट मिळण्याची ती खालीलप्रमाणें:—

(५) या मृत्युपत्राबद्दल मी माझे तीन जांवई·········( नांवें ) यांना एक्झिक्यूटर्स नेमले आहे, ( अथवा ज्या कोणांस एक्झिक्यूटर नेमलें असेल त्यांचीं नांवें द्यावी )

(६) माझ्या तीन मुलींना वर जी इस्टेट दिली आहे त्याशिवाय बाकी राहिलेली माझी सर्व स्थावर, जंगम इस्टेट एक्झिक्यूटर्सनीं ताब्यांत घेऊन माझ्या नांवानें त्या इस्टेटीचा दानधर्माकडे उपयोग करावा·········( आणखी कांहीं लिहायचें असेल तें लिहावें )

(७) एक्झिक्यूटर्सनीं या मृत्युपत्रांत सांगितल्याप्रमाणें व्यवस्था करण्याची आहे, म्हणून लिहून ठेविलें मृत्युपत्र. तारीख···

**साक्ष**

१···············

**सही**

२···············

साधारणतः मृत्युपत्राखालीं एका डॉक्टरची साक्ष घेण्याची पद्धत आहे. साक्षीच्यावर डॉक्टर साधारणतः असा मजकूर लिहितो, 'आज मी यांना तपासलें. ते समजण्याच्या मनः स्थितींत आहेत व त्यांनीं हें मृत्युपत्र समजून उमजून केलें आहे.'

**टीप**—मृत्युपत्राचा नमुना अमुकच असावा असा नियम नाहीं. मृत्युपत्र करणाऱ्याच्या इच्छा जाणतां येतील अशा तऱ्हेचे शब्द वापरले म्हणजे काम झालें. मरणानंतर आपली मिळकत अशा तऱ्हेनें वाटली जावी याबद्दलचा मजकूर कायदे-

शीररीत्या कुठेंही आला तरी सुद्धां तें मृत्युपत्र होऊं शकेल. ' मृत्युपत्र ' असें नांव लिहूनच मृत्युपत्र करावयास पाहिजे असा नियम नाहीं.

## ७४ आपल्या पश्चात् बायको व तिचे पश्चात् दुसरा मनुष्य

(१) मृत्युपत्र करणार······(नांव)······जात······धंदा······वय··· राहणार······तारीख······

(२) माझा वृद्धापकाळ झाला आहे. माझे देहाचा आतां दिवसेंदिवस भरंवसा नाहीं. माझे पोटीं पुत्रसंतान नाहीं. मी व माझे कुटुंब यांनीं माझे मामेभावाचा मुलगा चि.············(नांव) याला आम्ही पुत्राप्रमाणें आजवर बाळगला आहे. त्यास माझे व माझ्या बायकोच्या पश्चात् माझे स्थावर, जंगम इस्टेटीस मालक केलें आहे. त्याबद्दल खालीलप्रमाणें मृत्युपत्र करीत आहे.—

(३) माझे पश्चात् माझी बायको············(नांव) इजला माझे सर्व स्थावर जंगम इस्टेटीस तात्पुरते तिचे हयाती अखेर मालक केलें आहे. तिनें माझे पश्चात् तिचे हयातीअखेर सर्व स्थावर, जंगम इस्टेटीचा उपभोग घ्यावा व येणारे उत्पन्नांतून आपला उदरनिर्वाह करावा. इस्टेटीवर कर्जपाणी वगैरे करून ठेवूं नये. तथापि सदरची व्यवस्था बायकोचे हयाती अखेरची म्हणून जाणून बुजून केलेली आहे. तिचे पश्चात् माझे सर्व इस्टेटीस माझे मागें माझे मामेभावाचा मुलगा······ ·········(नांव) यास मालक केलें आहे. यदाकदाचित् माझी बायको माझे आधीं वारल्यास वर नमूद केलेंप्रमाणें·········(नांव) हा माझे सर्व स्थावर, जंगम इस्टेटीस माझे पश्चात् एकदम मालक होण्याचा आहे.

(४) यदाकदाचित् माझे पश्चात् बायकोचे हयातींत सदर············ (मुलाचें नांव) हयात न राहिलेस माझे इस्टेटीस मी त्याच्या पाठचा भाऊ······ ······(नांव) यास मालक केलें आहे. तरी वर नमूद केलेप्रमाणें माझे हयाती नंतर माझी बायको जिवंत राहिलेस तिनें तिचे हयातीअखेर व तिचे नंतर सदर ·········(नांव) जिवंत असल्यास त्यानें व तो जिवंत नसल्यास त्याचा पाठचा भाऊ·········(नांव) याप्रमाणें वंशपरंपरेनें माझे पश्चात् माझे इस्टेटीची मालकी उपभोग करावी.

(५) माझी स्थावर जंगम इस्टेट खालील प्रमाणें—

(६) येणेंप्रमाणें इस्टेटीची व्यवस्था माझे पश्चात् होणेची आहे. मी जिवंत असें तोपर्यंत माझे इस्टेटीची वाटेल ती व्यवस्था करण्यास मी पूर्ण मालक आहे.

(७) सदरचें मृत्युपत्र मी स्वखुशीनें व पूर्णपणें शुद्धीवर असतांना करून ठेविलें आहे, म्हणून केलें मृत्युपत्र. ता.…………

साक्ष

१……………… सही

२………………

## रखाऊच्या मुलाच्या नांवचें मृत्युपत्र

(१) मी मृत्युपत्र लिहून ठेवणार………(नांव)………जात…… धंदा……वय……राहणार……लिहून ठेवितो. मृत्युपत्र ऐसाजे—

(२) माझा वृद्धापकाळ झाला आहे. हल्लीं २।३ महिने फीट वगैरे येतात व तापानें आजारी आहे. मला माझ्या देहाचा भरवंसा नाहीं. करितां मी आज रोजीं स्थावर, जंगम इस्टेटीबद्दलची व्यवस्था खालीलप्रमाणें करून ठेवीत आहे—

(३) माझी स्थावर, जंगम इस्टेट खालीलप्रमाणें आहे—

… … … …

(४) सदरहू इस्टेटीची व्यवस्था वहिवाट अगर विल्हेवाट माझे हयातीनंतर माझे रखाऊचा माझेपासून झालेला मुलगा…………(नांव) यानें वंशपरंपरा निरंतर मालकी-हक्कानें करण्याची आहे त्यावर दुसरे कोणाची मालकी अगर हक्कसंबंध नाहीं.

(५) याशिवाय मजला रखाऊपासून झालेली………………(नांव) मुलगी आहे. तिचें अजून लग्न होण्याचें आहे. तिजला रक्कम रुपये……देण्याचे आहेत ते तिचे लग्नाचेवेळीं खर्च करण्याचे आहेत.

(६) हल्लीं मी रखाऊ म्हणून ठेवलेली………(नांव) इनें……(नांव) याचें पालन पोषण केल्यास व त्याचेपाशीं राहिल्यास तिजला………रु. पोटगी-दाखल मिळण्याचें आहेत. न राहिल्यास पोटगी वगैरे कांहीं मिळण्याची नाहीं.

(७) धर्मदाय म्हणून·······रु. सदर······ ( नांव ) यानें खर्च करावे.

(८) येणेंप्रमाणें स्थावर, जंगम इस्टेटीची व्यवस्था करून ठेविली आहे. सदर व्यवस्था माझे हयातीनंतर होण्याची आहे. माझे हयातीनंतर सदर इस्टेटीची व्यवस्था माझी मी पहात आहे.

(९) हें मृत्युपत्र मी पूर्ण शुद्धीवर असतांना ता. ··· ··· रोजीं लिहून दिलें आहे.

साक्ष

१····················

सही

२····················

I............ certify that I have examined Mr... ... ... ... to-day. He is quite conscious and aware of the facts in the document. He says he has done the deed with his own sweet will.

Witnesses

1 ... ... ... .. ... ... (Sd.) Dr.

2 ... ... ... ... ... ... D/..

# प्रकरण १० वें

## भाडें—विक्रीचा करार

## (Hire-Purchase Agreement)

### ७६ सामान्य माहिती

भाडें–विक्रीचा करार हा एक विशिष्ट प्रकारचा करार आहे. ठरावीक हप्ते दिल्यानंतर जी मिळकत भाड्यानें घेतली असेल ती मिळकत विकत घेण्याची सवलत भाडेकरूला ह्या करारांत दिलेली असते. अशा तऱ्हेच्या करारांत वर सांगितलेल्या सवलतीचा स्पष्ट नामनिर्देष करणें अत्यंत आवश्यक असतें. ह्या बाबतींत खालील गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत,—

(५) माझी स्थावर जंगम इस्टेट खालील प्रमाणें—

(६) येणेंप्रमाणें इस्टेटीची व्यवस्था माझे पश्चात् होणेंची आहे. मी जिवंत असें तोपर्यंत माझे इस्टेटीची वाटेल ती व्यवस्था करण्यास मी पूर्ण मालक आहे.

(७) सदरचें मृत्युपत्र मी स्वखुशीनें व पूर्णपणें शुद्धीवर असतांना करून ठेविलें आहे, म्हणून केलें मृत्युपत्र. ता.…………

साक्ष

१……………… सही

२………………

## रखाऊच्या मुलाच्या नांवचें मृत्युपत्र

(१) मी मृत्युपत्र लिहून ठेवणार………(नांव)………जात……धंदा……वय……राहणार……लिहून ठेवितो. मृत्युपत्र ऐसाजे—

(२) माझा वृद्धापकाळ झाला आहे. हल्लीं २।३ महिने फीट वगैरे येतात व तापानें आजारी आहे. मला माझ्या देहाचा भरवंसा नाहीं. करितां मी आज रोजीं स्थावर, जंगम इस्टेटीबद्दलची व्यवस्था खालीलप्रमाणें करून ठेवीत आहे—

(३) माझी स्थावर, जंगम इस्टेट खालीलप्रमाणें आहे—

… … … …

(४) सदरहू इस्टेटीची व्यवस्था वहिवाट अगर विल्हेवाट माझे हयातीनंतर माझे रखाऊचा माझेपासून झालेला मुलगा…………( नांव ) यानें वंशपरंपरा निरंतर मालकी–हक्कानें करण्याची आहे त्यावर दुसरे कोणाची मालकी अगर हक्कसंबंध नाहीं.

(५) याशिवाय मजला रखाऊपासून झालेली………………( नांव ) मुलगी आहे. तिचें अजून लग्न होण्याचें आहे. तिजला रक्कम रुपये……देण्याचे आहेत ते तिचे लग्नाचेवेळीं खर्च करण्याचे आहेत.

(६) हल्लीं मी रखाऊ म्हणून ठेवलेली………( नांव ) इनें……(नांव) याचें पालन पोषण केल्यास व त्याचेपाशीं राहिल्यास तिजला………रु. पोटगी-दाखल मिळण्याचें आहेत. न राहिल्यास पोटगी वगैरे कांहीं मिळण्याची नाहीं.

(७) धर्मदाय म्हणून·······रु. सदर······ ( नांव ) यानें खर्च करावे.

(८) येणेंप्रमाणें स्थावर, जंगम इस्टेटीची व्यवस्था करून ठेविली आहे. सदर व्यवस्था माझे हयातीनंतर होण्याची आहे. माझे हयातीनंतर सदर इस्टेटीची व्यवस्था माझी मी पहात आहे.

(९) हें मृत्युपत्र मी पूर्ण शुद्धीवर असतांना ता. ··· ··· रोजीं लिहून दिलें आहे.

साक्ष

१·····················

सही

२·····················

I............ certify that I have examined Mr... ... ... ... to-day. He is quite conscious and aware of the facts in the document. He says he has done the deed with his own sweet will.

Witnesses

1 ... ... ... .. ... ...                (Sd.) Dr.

2 ... ... ... ... ... ...                D/..

# प्रकरण १० वें

## भाडें—विक्रीचा करार

( Hire-Purchase Agreement )

### ७६ सामान्य माहिती

भाडें-विक्रीचा करार हा एक विशिष्ट प्रकारचा करार आहे. ठरावीक हप्ते दिल्यानंतर जी मिळकत भाड्यानें घेतली असेल ती मिळकत विकत घेण्याची सवलत भाडेकरूला ह्या करारांत दिलेली असते. अशा तऱ्हेच्या करारांत वर सांगितलेल्या सवलतीचा स्पष्ट नामनिर्देष करणें अत्यंत आवश्यक असतें. ह्या बाबतींत खालील गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत,—

(१) भाडें विक्रीच्या करारांत सर्व हप्ते देईपर्यंत भाडेकरूला मिळकतींवर मालकी प्राप्त होणार नाहीं, अशा तऱ्हेचा स्पष्ट खुलासा असावा.

(२) अशा तऱ्हेचा खुलासा नसल्यास भाडें–विक्रीच्या कराराला कदाचित् विक्रीच्या करारांचें स्वरूप येण्याचा संभव असतो.

(३) विक्रीचा करार असेल तर भाडेकरूला दुसऱ्याला मिळकत खरेदी देतां येईल. असें झाल्यास मूळ मालकाचें नुकसान होण्याचा संभव असतो. ठरलेल्या कराराप्रमाणें सर्व हप्ते दिल्याखेरीज भाडेकरूला मालकी प्राप्त होणार नाहीं व सर्व हप्ते दिल्यानंतर भाडेकरूला मिळकत विकत घेण्याची सवलत मिळेल अशा तऱ्हेचा स्पष्ट खुलासा भाडेकरूच्या करारांत असेल तर मिळकतीवर मालकी प्राप्त होईपर्यंत भाडेकरूला ती मिळकत दुसऱ्याला देतां येणार नाहीं.

## ७७ स्टँप

(१) भाडें–विक्रीच्या करारास मुंबई इलाख्यांत एक रुपयाचा स्टँप लागतो.

(२) मध्यप्रांतांत भाडें–विक्रीच्या करारास १२ आणेचा स्टँप लागतो.

## सरचार्ज

खरेदीपत्राच्या प्रकरणांत जी माहिती दिली आहे ती पहा.

## ७८ नोंदणी

भाडे–विक्रीचा करार नोंदलाच पाहिजे असा नियम नाहीं.

### नमुना.

## ७९ भाडें–विक्रीचा करार

(१) रा. रा. ( नांव, गांव वगैरे ) ... ... ... ... ... मालक व
रा. रा. ( नांव, गांव वगैरे ) ... ... ... ... ... भाडेकरी
ह्यांच्यामध्यें भाडेंविक्रीचा करार झाला तो खालीलप्रमाणें—

(२) खालीं दिलेली मिळकत ( मोटार, मशीन अथवा जी मिळकत असेल ती ) रा. रा. ......... ( मालकाचें नांव ) ह्यांच्या मालकीची असून ती त्यांनीं रा. रा. ... ... ... ... ( भाडेकरूचें नांव ) यांना या करारान्वयें ठरल्याप्रमाणें भाडें–विक्रीच्या अटीवर दिलेली आहे.

(३) मिळकतीचें वर्णन,—

(४) भाडेकरूनें भाड्याबद्दल म्हणून ... ... रुपये ... ... तारखेस देणेचे आहेत.

(५) भाडे–विक्रीचा करार अमलांत असेंपर्यंत वर लिहिलेली मिळकत ... रुपयांस विकत घेण्यास भाडेकरूला सवलत दिलेली आहे. अशा तऱ्हेनें मिळकत विकत घेण्याची भाडेकरूची इच्छा असल्यास त्यानें पूर्वी हप्त्याबद्दल म्हणून दिलेले रुपये हिशेबांत धरले जातील. पुरी रक्कम देईपर्यंत व मिळकत विकत घेईपर्यंत भाडे-करूला मिळकतीवर मालकी प्राप्त होणार नाहीं. तोंपर्यंत मिळकतींची मालकी मालकाची राहील.

(६) भाडेकरूनें ठरलेले हप्ते वेळच्या वेळेस दिले पाहिजेत. वक्तशीर हप्ते देण्यात चूक झाल्यास अथवा ठरलेल्या कराराप्रमाणें वागण्यास भाडेकरू चुकल्यास हा भाड्याचा करार रद्द समजण्यांत येईल.

(७) हा करार रद्द झाल्यानंतर नोटीस न देतां अथवा मागणी न करतां वरील मिळकत स्वतः अगर आपल्या नोकरामार्फत अगर एजंटामार्फत ताब्यांत घेण्याचा अधिकार मालकाला आहे.

(८) भाडें-विक्रीचा हा करार अमलांत असेंपर्यंत भाडेकरूनें मिळकतीची कोणत्याही प्रकारें तबदिली करूं नये. त्याचप्रमाणें भाडें–विक्रीचा करार अंमलांत असेपर्यंत मिळकतीची योग्य वेळीं तपासणी घेण्याचा अधिकार मालकाला अथवा त्याच्या आधिकृत मुखत्याराला आहे.

(९) ह्याशिवाय आणखी ज्या कांहीं अटी ठरल्या असतील त्या लिहाव्यांत.

येणेंप्रमाणें भाडें–विक्रीचा करार आमच्यामध्यें ठरला आहे. हा करार आम्हीं स्वसंतोषानें व अक्कलहुशारीनें लिहून दिलेला आहे. म्हणून लिहून दिलें भाडें–विक्रीचें करारपत्र तारीख.........

**साक्ष**

१.................. सह्या (अथवा आंगठे निशाणीसह

२..................

# प्रकरण ११ वें

## पावती

### ८० पावती व ती कशी लिहिणेची ?

पावती म्हणजे असा एक कागद कीं ज्यामध्यें पैसे अगर इतर मिळकत पोंहचल्याबद्दलचा मजकूर असतो.

पावतीचा मजकूर लिहिणें ही सोपी गोष्ट आहे. या बाबतींत इतकें मात्र लक्षांत ठेवावें कीं, ज्या योगानें पावतीचें रूपांतर दुसऱ्या एखाद्या दस्तऐवजांत होईल, अशा तऱ्हेचा मजकूर पावतींत लिहूं नये. नाहींतर जादा स्टँप द्यावा लागेल व कदाचित् नोंदणीचा प्रसंगहि येईल.

उदाहरणार्थ—आपण असें समजूं कीं, एखादी मिळकत विकणेचा करार केल्यानंतर इसारत पावती लिहिण्यांत आली, व या पावतींत मिळकत खरेदीचा करारहि नमूद करण्यात आला. अशा तऱ्हेचा मजकूर असलेल्या पावतीला जादा स्टँप लागेल, व नोंदणीचीहि आवश्यकता भासेल. हा जादा स्टँप व नोंदणी चुकविणेची एक युक्ति आहे. ती अशी कीं, पावतीमध्यें पूर्वीच झालेला करार फक्त नमूद करणेचा, पण पावतीचें रूपांतर प्रत्यक्ष करारांत न करणेचें.

उदाहरणार्थः—अनें बला आपलें घर चार हजार रुपयेस विकणेचा करार केला. इसारत म्हणून अनें बकडून चारशें रुपये घेतले. इसारत पावती लिहितांना अनें असें लिहिलें,—"मी तुम्हांला माझें घर चार हजार रुपयेस विकणेचें ठरविलें आहे. त्यापैकीं इसारत म्हणून तुम्ही मला आजरोजीं चारशें रुपये दिले ते पोंहचले." इसारत पावतींमध्यें अशा तऱ्हेचा मजकूर असण्यास हरकत नाहीं. इसारत पावतीमध्यें खालील तऱ्हेचा मजकूर असला तर मात्र त्या पावतीचें रूपांतर करारांत होईल व त्याला जादा स्टँप लागेल—"मी तुम्हांला माझें घर चार हजार रुपयांस विकणेचें ठरविलें आहे. त्यापैकीं चारशें रुपये तुम्हीं मला आज दिले. बाकीचे रुपये तुम्ही मला पंधरा दिवसांत द्यावेत म्हणजे मी तुम्हांला मिळकतीचें खरेदीपत्र करून देईन. मुदतींत पैसे न आल्यास इसारतीदाखल

घेतलेले तुमचे पैसे तुम्हांस परत मिळणार नाहींत, व मिळकत खरेदी देणेची जबाबदारी माझेवर राहणार नाहीं, वगैरे."

## ८१ सही व स्टँप

ज्यानें पावती देणेची त्यानें पावतीखालीं आपली सही अगर निशाणी आंगठा करावा. सही अथवा आंगठा नसतांना देखील अमुक अमुक माणसानें अशा तऱ्हेची पावती दिली ही गोष्ट अन्य पुराव्यानें शाबीत करतां येईल. परंतु अशा तऱ्हेचा पुरावा मिळणें अत्यंत कठिण असलेमुळें पावतीखालीं पावती देणाराची सही अगर आंगठा घेणे ही गोष्ट केव्हांहि श्रेयस्कर आहे. त्याचप्रमाणें पावतीखालीं साक्षिदारांच्या सह्या घेतल्याच पाहिजेत असा नियम नसला तरी पावतीखालीं साक्षिदारांच्या साक्षी घेणें केव्हांहि श्रेयस्कर आहे.

### स्टँप

पावतींत नमूद असलेल्या पैशाची अगर मिळकतीची किंमत वीस रुपयेपेक्षां जास्त असेल तर पावतीला स्टँप लागत नाहीं. ही किंमत वीस रुपयेपेक्षां जास्त असेल तर पावतीला एक आण्याचा स्टँप लागतो.

### स्टँप कसा लावणेचा व कोणी देणेचा

एक आण्याचा सुटा रेव्हिन्यु स्टँप मिळतो. तो पावतीखालीं डकविणेचा असतो. या स्टँपावर सही करून अथवा इतर कांहीं लिहून स्टँप रद्द करणेचा असतो. पुन्हां उपयोगांत आणतां न येईल अशा तऱ्हेनें स्टँप रद्द करणेचा असतो. अशा तऱ्हेनें स्टँप रद्द केला नसेल तर पावतीस स्टँप लावला नाहीं असें मानणेंत येईल. एक रुपया दंड देऊन स्टँप नसलेली पावती पुराव्यांत घेतां येतें.

पावतीचा स्टँप कोणी देणेचा याबावतींत नियम असा—ज्यानें पावती दिली असेल त्यानें स्टँप देणेचा.

## ८२ नोंदणी

पावती केव्हां नोंदणेस पाहिजे या बाबतींत सर्वसाधारण नियम असा कीं स्थावर मिळकतीबाबत शंभर रुपये अगर त्यापेक्षां जास्त किंमतीचा हक्क निर्माण केला असेल, ठरविला गेला असेल, बेचन दिला असेल, मर्यादित केला असेल

अथवा नाहींसा केला असेल, तर अशा वेळीं पावती नोंदणेस पाहिजे; इतर वेळीं पावती नोंदणेची आवश्यकता नाहीं.

गहाण रकमेबाबत दिलेली पावती नोंदणेस पाहिजे किंवा नाहीं याबद्दल मतभेद आहे. इतकी गोष्ट मात्र निश्चित आहे कीं, गहाणाची पुरी फेड झाली नसेल व कांहीं रकमेपुरती पावती असेल तर मात्र अशी पावती नोंदणेची आवश्यकता नाहीं. गहाणाची पुरी फेड होऊनहि फक्त पैसे पोंहचले अशाबद्दल कांहीं मजकूर लिहिला व गहाणाचा हक्क संपला अगर नाहींसा झाला अशाबद्दल कांहीं मजकूर लिहिला नाहीं तर अशा तऱ्हेची पावती नोंदणेची आवश्यकता नाहीं.

## नमुने

## ८३ प्रॉमिसरी नोट फेडल्याची पावती

रा. रा. ( नांव, गांव वगैरे )...............यांसी पावती लिहून देणार ( नांव, गांव वगैरे )............पावती लिहून देतों ऐसाजे—

तुम्ही मला तारीख.........रोजीं.........रुपयेची प्रॉमिसरी नोट लिहून दिली होती त्याचें व्याजासह आज रोजीं रुपये,.........होत आहेत, हे रुपये तुम्ही मला आजरोजीं रोख दिलेत. म्हणून लिहून दिली पावती सही ता.......

**साक्ष**

१...................

सही ( अथवा निशाणी आंगठा द. सह )

२...................

## ८४ हप्त्याची पावती

रा. रा. ( नांव, गांव वगैरे )............यांसी पावती लिहून देणार ( नांव, गांव वगैरे ).........पावती लिहून देतों ऐसाजे,—

तुम्ही मला ता..........रोजीं.........रुपयेचा दस्त लिहून दिला होता त्या दस्ताप्रमाणें पहिला हप्ता.........रुपयेचा आज देणेचें ठरलें होतें.

त्याप्रमाणें तुम्ही मला आजरोजीं·········रुपये रोख दिल्रेत ते पोहचलें. म्हणून लिहून दिली पावती सही. ता.··········.

साक्ष

१·····················

सही ( अथवा नि. आंगठा द. सह )

२·····················

## ८५ सर्व देणें फेडलेबद्दलची पावती

रा. रा. ( नांव, गांव वगैरे )················यांसी पावती लिहून देणार ( नांव, गांव वगैरे )·············पावती लिहून देतों ऐसाजे—

तुम्ही माझे खातेबाकीवरून व कबुलायतीवरून देणें आहे त्याबद्दल सर्व हिशेब होऊन तुम्हीं मला··········रुपये देणेचें ठरलें. त्याप्रमाणें·········रुपये तुम्ही मला आज रोजीं रोख दिलेत. आतां तुमच्याकडे माझी कसलीहि बाकी येणें नाहीं. म्हणून लिहून दिली पावती सही. ता.·········

साक्ष

सही ( अथवा नि. आंगठा द. सह )

१·····················

२·····················

## ८६ कर्जाच्या कांहीं भागाबद्दल पावती

रा. रा. ( नांव, गांव वगैरे )···············यांसी पावती लिहून देणार ( नांव, गांव वगैरे )·············पावती लिहून देतों ऐसाजे—

तुम्ही मला ता.·············रोजीं·············रुपयेचा तारण गहाण-दस्त लिहून दिला होता, त्यापैकीं मुद्दलाबद्दल ( दोनशें ) रुपये व व्याजाबद्दल

( पन्नास ) रुपये असें एकूण ( अडीचशें ) रुपये तुम्ही मला आजरोजीं रोख दिले ते पोंहचलें. म्हणून लिहून दिली पावती ,सही ता.........

साक्ष

१....................

सही ( अथवा नि. आंगठा द. सह )

२....................

## ८७ कामाचा मेहनताना पोंहचलेबद्दल पावती.

रा. रा. ( नांव, गांव वगैरे )..............यांसी पावती लिहून देणार ( नांव, गांव वगैरे )............पावती लिहून देतों ऐसाजे,—

मी तुमचेकडून ता.......पासून ता..........पर्यंत सुतारकाम केले आहे. त्याची मजुरी..........रुपये झाली आहे. हे रुपये...तुम्ही मला आज रोजीं रोख दिले ते पोंहचले म्हणून लिहून दिली पावती सही ता.......

साक्ष

१....................

सही ( अथवा नि. आंगठा द. सह )

२....................

## ८८ प्रोनोट झाले वेळची भरणापावती.

रा. रा. ( नांव, गांव वगैरे ) ... ... ... ... यांसी पावती लिहून देणार ( नांव, गांव वगैरे ) ... ... ... पावती लिहून देतो ऐसाजे,—

मी तुम्हांला आजरोजीं......रुपयेची दरसाल दरशेंकडा.........व्याज देणेचा करार असलेली प्रॉमेसरी नोट लिहून दिली आहे. त्याप्रमाणें तुम्ही मला आजरोजीं रोख रुपये.......दिले ते पोंहचले. म्हणून लिहून दिली भरणापावती सही ता.........

साक्ष

१....................

सही ( अथवा नि. आंगठा द. सह )

२....................

# प्रकरण १२ वें

# लवाद्

## ८९ प्रास्ताविक

अर्बिट्रेशन ॲक्ट हा इलखा शहरांना व रंगून, कराची, दिल्ली, कानपूर, अमृतसर, तुतिकोरीन व लाहोर यांना लागूं आहे. ज्या ठिकाणीं अर्बिट्रेशन ॲक्ट लागूं नाहीं त्या ठिकाणीं पक्षकारांना आपला तंटा लवादाकडे सोंपवितां येईल व कोर्टाकडे अर्ज करून हुकूमनामा करून घेतां येईल. कोर्टांत कज्जा सुरूं असतांना पक्षकारांचे अर्जावरूनदेखील लवादाकडे कोर्टाला तंटा सोंपवितां येईल.

## ९० स्टँप

**टीप**—सरचार्जाबद्दल खरेदीच्या प्रकारणांत जी माहिती दिली आहे ती पहा.

लवादाकडे अथवा पंचाकडे आपला तंटा सोपविणेबद्दल पक्षकार जो करार अथवा ऐकटपत्र करतात त्याला एक रुपयाचा स्टँप लागतो.

कोर्टाच्या हुकुमाशिवाय खासगी तऱ्हेनें जेव्हां पक्षकार आपला तंटा लवादाकडे सोपवितात तेव्हां लवादानें केलेल्या लवादनाम्यास ( वांटणी व्यक्तिरिक्त लवादनाम्यास ) खालीलप्रमाणें स्टँप लागतो.

(१) लवादनाम्याची रक्कम अगर किंमत दहा रुपयांपेक्षां जास्त नसेल तर स्टँप ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... दोन आणे.

(२) लवादनाम्याची रक्कम अगर किंमत दहा रुपयांपेक्षां जास्त; पण पन्नास रुपयांपेक्षां जास्त नसेल, तर स्टँप ... ... ... ... ... ... चार आणे.

(३) लवादनाम्याची रक्कम अगर किंमत पन्नास रुपयांपेक्षां जास्त, पण शंभर रुपयांपेक्षां जास्त नसेल तर ... ... ... ... ... आठ आणे.

(४) लवादनाम्याची रक्कम अगर किंमत शंभर रुपयापेक्षां जास्त; पण दोनशें रुपयांपेक्षां जास्त नसेल तर स्टँप —

मुंबई, मध्यप्रांत, यांत ... ... ... ... ... ... ... ... एक रुपया.

(५) लवादनाम्याची रक्कम अगर किंमत दोनशें रुपयांपेक्षां जास्त असेल, पण तीनशें रुपयांपेक्षां जास्त नसेल तर स्टँप—

हिंदुस्थानांत ... ... ... ... दीड रुपया.

मुंबई ... ... ... ... ... दोन रुपये चार आणे.

मध्यप्रांत ... ... ... ... एक रुपया चौदा आणे.

(६) लवादनाम्याची रक्कम अगर किंमत तीनशें रुपयांपेक्षां जास्त; पण चारशें रुपयांपेक्षां जास्त नसेल तर स्टँप—

हिंदुस्थानांत ... ... ... ... दोन रुपये.

मुंबई ... ... ... ... तीन रुपये.

मध्यप्रांत ... ... ... ... दोन रुपये आठ आणे

(७) जेव्हां लवादनाम्याची रक्कम अगर किंमत चारशें रुपयांपेक्षां जास्त असेल; पण पांचशें रुपयांपेक्षां जास्त नसेल तेव्हां स्टँप—

हिंदुस्थानांत ... ... ... अडीच रुपये

मुंबई ... ... ... तीन रुपये बारा आणे

मध्यप्रांत ... ... ... अडीच रुपये

(८) जेव्हां लवादनाम्याची रक्कम अगर किंमत पांचशें रुपयांपेक्षां जास्त असेल; पण सातशें रुपयांपेक्षां जास्त नसेल तेव्हां स्टँप—

हिंदुस्थानांत ... ... ... तीन रुपये

मुंबई आणि मध्यप्रांत ... ... ... चार रुपये आठ आणे

(९) जेव्हां लवादनाम्याची रक्कम अगर किंमत सहाशें रुपयांपेक्षां जास्त असेल; पण सातशें रुपयांपेक्षां जास्त नसेल तेव्हां स्टँप—

हिंदुस्थानांत ... ... तीन रुपये आठ आणे

मुंबई आणि मध्यप्रांत ... ... पांच रुपये चार आणे

(१०) जेव्हां लवादनाम्याची रक्कम अगर किंमत सातशें रुपयांपेक्षां जास्त असेल; पण आठशें रुपयांपेक्षां जास्त नसेल तेव्हां स्टँप--

हिंदुस्थानांत ... ... ... ... चार रुपये.

मुंबई आणि मध्यप्रांत ... ... ... सहा रुपये.

(११) जेव्हां लवादनाम्याची रक्कम अगर किंमत आठशें रुपयांपेक्षां जास्त असेल; पण नऊशें रुपयांपेक्षां जास्त नसेल तेव्हां स्टँप—

हिंदुस्थानांत ··· ··· ··· ··· चार रुपये आठ आणे.

मुंबई आणि मध्यप्रांत ··· ··· ··· सहा रुपये बारा आणे.

(१२) जेव्हां लवादनाम्याची रक्कम अगर किंमत नऊशें रुपयांपेक्षां जास्त असेल; पण हजार रुपयांपेक्षां जास्त नसेल तेव्हां स्टँप—

हिंदुस्थानांत ··· ··· ··· ··· पांच रुपये.

मुंबई आणि मध्यप्रांत ··· ··· ··· सात रुपये आठ आणे.

(१३) जेव्हां लवादनाम्याची रक्कम अगर किंमत एक हजार रुपयांपेक्षां जास्त असेल तेव्हां;—मुंबई प्रांतांत,

पांचशें रुपये अगर तिचा कोणताही भाग याकरितां जादा स्टॉंप तीन रुपये बारा आणे.

लवादनाम्याला जास्तींत जास्त स्टँप मुंबई प्रांतांत वीस रुपयांपेक्षां जास्त असत नाहीं.

## ९१ नोंदणी

जेव्हां पक्षकार आपला तंटा लवादाकडे सोंपविणेबद्दल करार अथवा ऐकटपत्र करतात. तेव्हां अशा करारास अगर ऐकटपत्रास नोंदणीची आवश्यकता नसते.

कोर्ट मार्फत लवाद नेमून जेव्हां लवादनामा कला जातो तेव्हां अशा लवादनाम्यास नोंदणीची आवश्यकता नसते.

कोर्टाव्यतिरिक्त अथवा आर्बिट्रेशन ॲक्टप्रमाणें लवादनामा झाला असेल व रजिस्ट्रेशन ॲक्ट कलम १७ प्रमाणें लवादनाम्यांतील मजकुरावरून लवादनामा नोंदणी जरूर असेल तर असा लवादनामा नोंदविला पाहिजे.

### नमुने.

## ९२ लवादाकडे तंटा सोंपविल्याचें ऐकटपत्र

(१) रा. रा. ( नांव, गांव वगैरे )··· ··· ···यांसी

ऐकटपत्र लिहून देणार १ ( नांव, गांव वगैरे ) ··· ··· ··· ···

२ ( नांव, गांव वगैरे )··········ऐकटपत्र लिहून देतो ऐसाजे,—

(२) आम्हांपैकीं नंबर १ ह्यांचें नंबर २ ह्यांनीं खालीलप्रमाणें देणें आहे, ............ ( देणें असेल त्याचें वर्णन )

(३) नंबर २... ... ... यांना वरील देणें पूर्णतः मान्य नाहीं व त्याबद्दल त्यांची बरीच तक्रार आहे.

(४) ह्या देण्याबाबत आमच्यामध्यें तंटा आहे व हा तंटा लवादाकडे सोंपवून लवादामार्फत निकाल करून घ्यावा असें आम्हां उभयतांमध्यें ठरलें आहे.

(५) म्हणून आम्हीं उभयतांनीं........तुम्हांस आमचें म्हणणें ऐकून देण्याबाबत व आमच्यामध्यें जो तंटा आहे त्याचा निकाल करण्याकरितां पंच नेमलें आहे. तुम्ही जो निकाल कराल तो आम्हां उभयतांना मान्य आहे म्हणून लिहून दिलें ऐकटपत्र सही तारीख... ... ई.

साक्ष

१..............

२..............

सह्या ( अगर निशाणी आंगठे दस्तूरसह )

## ९३ लवादनामा

(१) कोर्ट विद्यमान... ... ... ह्यांचें लवाद कोर्टात

१ नांव, गांव वगैरे... .... ... ... वादी

विरुद्ध

१ नांव, गांव वगैरे... --- ... ...प्र. वादी

दावा रुपये ...... . ...

(२) यांतील वादी व प्र. वादी ह्यांचे मध्यें...............अमुक अमुक तऱ्हेचा तंटा आहे. त्याचा निकाल करणेसाठीं आम्हांला पंच नेमून त्यांनीं आमचें नांवे ऐकटपत्र लिहून दिलें आहे. ह्या ऐकटापत्राचें आधारें सदर तंट्याचा निकाल करणेचा अधिकार आम्हांस प्राप्त झाला आहे.

(३) वादी ह्याचें म्हणणें असें आहे कीं,............

(४) प्र. वादीचें म्हणणें असें आहे कीं, ............

(५) वादी व प्र. वादी ह्यांचें दोघांचें म्हणणें ऐकून व कागदपत्र पाहून आम्हांस असें वाटतें कीं,—

(६) सबब आम्ही असा निकाल करतों कीं,…… तारीख……

सही…………

## ९४ विशेष मजकूर असलेलें ऐकटपत्र

श्री. रा. रा. (नांव, गांव, वय, धंदा, वगैरे) … … … … … व श्री. रा. रा.………………(नांव, गांव वगैरे) यांसी,—

ऐकटपत्र बेशमी (नांव, गांव वगैरे) … … … … …उभयतांनीं लिहून दिलें ऐकटपत्र ऐसाजे,—

(१) आम्हांपैकीं नंबर १ (नांव)………याचें नांव नंबर २ (नांव) … … यांनीं … … सालांपासून तीन वेळां तारीख … …ई॥ रोजीं … … रुपयांचा व तारीख……रोजीं रुपयांचा व तारीख………ई॥ रोजीं…… … ……रुपयांचा असे तीन गहाणदस्त लिहून दिले आहेत व सदर तिन्ही दस्तांचे सदर रकमेचा बोजा खालीं वर्णन केलेल्या आम्हांपैकीं नंबर २ (नांव) ………याचे पूर्ण मालकी वहिवाटींतील जमिनीवर ठेवणेंत आला आहे. मिळकतीचें वर्णन,— ता.………पैकीं मौजे… ……(गांव) चे रानांतील जमीन रि. सर्वे नंबर……क्षेत्र………आकार ………रुपयेची यांस चकबंदी पूर्वेस … … पश्चिमेस … … दक्षिणेस … … उत्तरेस … … … … …

(२) आतां आम्हां उभयतांमध्यें सदर तिनही दस्तांचे ऐन रकमेबद्दल व पोंहचलेलें व्याजाबद्दल वाद उपस्थित झाला आहे. नंबर १ (नांव) … … याचें म्हणणें सदर दस्ताबद्दल एकूण … … रुपये नंबर २ (नांव) … … यांस रोख दिले आहेत व व्याजाबाबत नंबर २ यांजकडून तारीख… … …ई॥ रोजीं रुपये … … व तारीख … … ई॥ रोजीं रुपये असे फक्त … … रु. मात्र पोंहचले आहेत परंतु नंबर २ याचें म्हणणें असें आहे कीं, वादांतील तिन्ही दस्तांबाबत फक्त… … …रुपयेच मात्र पोंहचले आहेत व व्याजाबद्दल

आजपर्यंत..........रुपये नंबर १ ( नांव )..........यांस आपण दिले आहेत. अशा रीतीनें आम्हां उभयतांमध्यें वर नमूद केलेल्या तिन्ही दस्तांबद्दल मोबदल्याची रक्कम किती व व्याज किती पोहचणें याबद्दल वाद उपस्थित झाला आहे व सदर वादाचा फायदा घेऊन नंबर २ हा रक्कम देणेस टाळाटाळ करीत आहे.

(३) येणेप्रमाणें आम्हांमध्यें उपस्थित झालेल्या वादाचा निकाल आपण उभयतां निरक्षेप बुद्धीनें व न्याय्य दृष्टचा कराल असा तुमचेवर आमचा विश्वास आहे. सबब, या वादाचा निकाल करून घेणेंसाठीं तुम्हांस आम्ही पंच म्हणून नेमून घेतलें आहे, आपण आमचें म्हणणें ऐकून घेऊन व कागदपत्र वगैरे पाहून आमच्यामधील जो वादाचा निकाल द्याल तो आम्हांस कबूल आहे. आम्ही उभयतां त्या निकालाप्रमाणें वागूं. सदर वादाचा निकाल करणेसाठीं आम्ही तुम्हां दोघांस पंच नेमलें आहे. वादाचा निकाल आजपासून एक महिन्याचें आंत आपण देणेचा आहे. सदर लवाद चौकशीबद्दल आर्बिट्रेशन फी आपणांस देणेची नसुन आपण स्वखुषीनें विनामोबदला लवाद–निकाल देणेचा आहे म्हणून आत्मसंतोषानें अक्कलहुषारीनें लिहून दिलें ऐकटपत्र सही तारीख... माहे... सन... इ. दस्तुर.

सह्या

## ९५ विशेष मजकूर असलेला लवादहुकूम

॥ श्री ॥

### लवादहुकूम

कोर्ट विद्यमान ( नांव, गांव वगैरे ) ... ... ... ...व ... ... ...( नांव, गांव वगैरे ) यांचें लवाद कोर्टांत.

१ ( नांव, गांव वगैरे ) ... ... ... ... ... ... ... ... ...वादी

विरुद्ध

१ ( नांव, गांव वगैरे ) ... ... ... ... ... ... ... ...प्रतिवादी

दावा रुपये... ... ... ...

(१) यांतील वादी व प्रतिवादी यांचेमध्यें इ॥ सन............सालापासून देणें घेणेचा व्यवहार चालू आहे. वादीचें नांवें प्रतिवादीनें एकूण तीन तारणदस्त लिहून दिले आहेत. सदर देणेंघेणें व्यवहारासंबंधीं वादी प्रतिवादी यांचेमध्यें

तंटा उपस्थित झाला असून त्याचा निकाल करणेंसाठीं आम्हां उभयतांना पंच नेमून आमचा निकाल बंधनकारक आहे असें कबूल करून तारीख.........ई॥ रोजीं वादी प्रतिवादी यांनीं आमचें नांवें लिहून दिलेल्या ऐकटपत्राचे आधारें या तंट्याचा निकाल करणेचा अधिकार आम्हांस प्राप्त झाला आहे. या अधिकाराप्रमाणें वादी व प्रतिवादी यांचें म्हणणें ऐकून व कागदपत्र पाहून आम्ही सदर तंट्याचा निकाल खालीं कलम ५ यांत लिहिलेप्रमाणें केला आहे.

(२) वादी याचें म्हणणें असें आहे कीं, प्रतिवादी यानें तारीख.........ई॥ रोजीं.....रुपये रोख घेऊन तारणगहाणदस्त लिहून दिला आहे. त्यानंतर .........रुपये घेऊन तारीख......ई॥ रोजीं पुनः दुसरा तारणगहाणदस्त लिहून दिला व पुढें.........तारीख.........ई॥ रोजीं.........रुपये घेऊन तिसरा तारणगहाणदस्त लिहून दिला. या तीनही दस्तांनीं बोजा एकाच मिळकतीवर म्हणजे प्रतिवादी याचे मालकी वहिवाटींतील जमिनीवर ठेवणेंत आला. सदर जमिनीचें वर्णनः—ता॥.........पैकीं मौजे.........( गांव ) चें रानांतील जमीन रि. सर्वे नंबर क्षेत्र.........आकार रुपये......ची यास चकबंदी पूर्वेस ......... पश्चिमेस......... दक्षिणेस ...... उत्तरेस ...... येणेंप्रमाणें जमीन. या जमिनीवर तीनही दस्तऐवजावरून सर्व रकमेचा तारणबोजा ठेवणेंत आला आहे. या तिन्ही दस्ताबद्दल वादी यानें प्रतिवादीस एकूण.........रुपये दिले आहेत. प्रतिवादी यांजकडून वादी यांस व्याजाबाबत तारीख......ई॥ रोजीं .........रुपये व तारीख.........ई॥ रोजीं......रुपये असे फक्त......रुपये मात्र पोंहचले आहेत. बाकीचें व्याज.........रुपये व ऐन......रुपये प्रतिवादी यांजकडून येणें आहेत. ती रक्कम देणेबद्दल विचारलें असतां प्रतिवादी हा कमी ऐन पोंहचल्याचें व जास्त व्याज पोंहचल्याचें सांगून टाळाटाळी करीत आहे. सबब प्रतिवादी यांजकडून......रुपये वसूल करून देववावे व तारण दिलेली मिळकत कोर्टमार्फत विक्री करून वसूल घेणेबद्दल हुकूम व्हावा.

(३) प्रतिवादीचें म्हणणें असें आहे कीं, प्रतिवादीनें वादीचे नांवें वर नमूद केलेले तीनही दस्त लिहून दिले आहेत. सदर तीन दस्तांबाबत वादीकडून... ...रुपये पोंहचले नाहींत; फक्त......रुपये मात्र पोंहचले आहेत; प्रतिवादी यानें

व्याजाबद्दल वादीस······रुपये दिले आहेत; अशी तक्रार प्रतिवादी याची आहे. गरिबी व महागाई असल्यानें रक्मेस लहान लहान हप्ते व्हावेत अशी प्रतिवादी याची विनंती आहे.

(४) यासंबंधीं वादी व प्रतिवादी या दोघांचें तोंडीं म्हणणें ऐकून घेऊन व वादांतील तिन्ही दस्त पाहून आम्ही सदरबद्दल असा निर्णय देतों कीं,—

वादी यानें प्रतिवादी यांस या तिन्ही दस्ताबद्दल एकूण···रु. दिले असले पाहिजेत. सदरचे दस्त नोंदतेवेळीं सदरच्या रक्मा वादी यानें दिल्याबद्दल मे. सब-रजिस्ट्रार साहेब यांचे शेरेही सदर तिन्ही दस्तांवर आहेत. वादी यानें दस्तामध्यें व्याजाचा दर······रुपये प्रमाणें नमूद केला असला तरीही···रुपये प्रमाणें मागणी केली आहे असें असूनही प्रतिवादी हा जादा···रुपये व्याजाबाबत पोंचविल्याची नक्कल करतों······रुपये दिलेबद्दल प्रतिवादी पावती हजर करीत नाहीं व दुसरे कोणी साक्षीदार या मुद्यावर नाहींत. केवळ प्रतिवादी याच्या एकट्याच्या सांगणेवर विश्वास ठेवणें योग्य होणार नाहीं, म्हणून आम्ही या दोन्ही बाबतींत असें ठरवितों कीं, वादी यानें प्रतिवादी यांस ऐन ··· रुपये दिले आहेत व प्रतिवादी यानें वादी यांस व्याजाबद्दल···रुपये मात्र दिले आहेत. आज मितीस वादी यांस प्रतिवादी यांजकडून ऐन······रुपये व व्याज······रुपये एकूण······रुपये येणें आहेत. प्रतिवादी हा गरीब आहे. त्यास रक्कम एकदम देणें शक्य होत नाहीं. सबब आम्ही प्रतिवादी यानें लहान हप्ते देणें योग्य आहे असें ठरवितों व खालीलप्रमाणें निकाल देतों,—

(५) (१) प्रतिवादी यानें वादीस······रुपये वार्षिक······रुपयेचे हप्त्यांनीं द्यावेत. पहिला हप्ता सन······ई॥······महिन्यांत द्यावा व पुढील हप्ते······ सालचे······महिन्यांत देत जावें.

(२) रक्मेची पुरी फेड होईपर्यंत ऐन रक्कम············रुपये वर वादी यांस प्रतिवादीनें आजपासून पुढील व्याज दरसाल दरशेंकडा············रुपये प्रमाणें देणेचें.

(३) कोणतेही······हप्ते वक्तशीर देणेस प्रतिवादी चुकल्यास त्या वेळीं येणें असलेली सर्व रक्कम वादी यानें एकदम वसूल करून घ्यावी.

(४) सदर ··· ··· ···रुपये व पुढील व्याज यांचा बोजा गहाण मिळकतीवर ठेवला आहे. कदाचित् प्रतिवादी यानें रक्कम न दिल्यास सदर गहाण मिळकत कोर्टमार्फत विक्री करून वादी यानें आपली रक्कम वसूल करून घ्यावी.

(५) या आर्बिट्रेशनचा व लवाद कोर्टांत फाईल (दायर) करणेस लागणारा सर्व खर्च प्रतिवादी यानें करावा.

सदर आर्बिट्रेशनबद्दल फी आकारली नाहीं, म्हणून लिहून दिलें अवॉर्ड तारीख ······

साक्ष

१ ············ सह्या ·········

२ ············

# प्रकरण १३ वे

## वांटणीपत्र

### ९६ वांटणी प्रकार

वांटणी ह्याचा अर्थ सरसनिरस मानानें वेगवेगळे तुकडे करून विभागणी करून घेणें असा आहे. वांटणीचे प्रकार तीन आहेत,—

(१) कोर्टांत दावा दाखल करून झालेली वांटणी,

(२) पक्षकारांनीं कोर्टाच्या बाहेर केलेली वांटणी,

(३) मृत्युपत्रानें केलेली वांटणी.

या तीन प्रकारापैकीं दुसऱ्या प्रकारचीच माहिती या प्रकरणांत आपणांस घेणेची आहे. याच प्रकारांत वांटणीपत्राची आवश्यकता असते.

### ९७ वांटणीपत्र

वांटणी करतांना लेखी वांटणीपत्र असलेंच पाहिजे असा नियम नाहीं. तोंडी वांटणी कायद्याला मान्य आहे, याबद्दल वाद नाहीं, असें असलें तरी

पुराव्याचे दृष्टीनें व वांटणीच्या वेळीं काय काय ठरलें, तें निश्चितपणें समजण्यास सोपें पडावें या दृष्टीनें लेखी वांटणीपत्र असणें फायदेशीर असतें. वांटणीपत्रांत मुख्यत: खालील गोष्टी असणें सोईस्कर असतें,—

(१) वांटणी कोणाकोणामध्यें झाली त्या लोकांचीं नांवें व वर्णन.

(२) वांटणी कोणकोणत्या मिळतीमध्यें झाली त्या मिळकतीचें वर्णन.

(३) वांटणीमध्यें कोणकोणत्या गोष्टी कोणाकोणाच्या हिस्शास गेल्या त्याबद्दलचा स्पष्ट खुलासा.

(४) मिळकतीच्या मालकीहक्काबद्दल, उपयोगाबद्दल व मिळकतीसंबंधीं अनुषांगिक अधिकाराबद्दल जरूर तो खुलासा.

**टीप**—जेव्हां वांटणीपत्र एकच असतें तेव्हां त्याच्या नकला काढून व त्यावर संबंधीं पक्षकारांच्या सह्या घेऊन प्रत्येक संबंधी पक्षकाराला नकल देणें हितावह असतें.

## ९८ वांटणीपत्राचा स्टँप

वांटणीचे वेळीं जो हिस्सा वेगळा केला जातो त्या हिश्याचे किंवा हिश्यांचे किंमतीवर खालील कोष्टकाप्रमाणें स्टँप लागतो.

| | किंमत रुपये | स्टँप | | |
|---|---|---|---|---|
| | | रु. | आ. | पै |
| १ | किंमत १० रु. पेक्षां जास्त नसेल तर. | ० | २ | ० |
| २ | किंमत १० रु. पेक्षां जास्त, पण ५० रु. पेक्ष जास्त नसेल तर. | ० | ४ | ० |
| ३ | किंमत ५० रु. पेक्षां जास्त, पण १०० रु. पेक्षां जास्त नसेल तर. | ० | ८ | ० |
| ४ | किंमत १०० रु. पेक्षां जास्त, पण २०० रु. पेक्षां जास्त नसेल तर. | | | |
| | ( मुंबई, मध्यप्रांत, बंगाल, पंजाव, आसाम व संयुक्तप्रांत ). | १ | ० | ० |
| | ( मद्रास व ब्रह्मदेश. ) | १ | ४ | ० |

| किंमत रुपये | स्टँप | | |
|---|---|---|---|
| | रु. | आ. | पै. |
| ५ किंमत २०० रु. पेक्षां जास्त, पण ३०० रु. पेक्षां जास्त नसेल तर. | | | |
| ( हिंदुस्थान ) | १ | ८ | ० |
| ( मुंबई व ब्रह्मदेश ) | २ | ४ | ० |
| ( बंगाल, मध्यप्रांत, मद्रास, पंजाब व आसाम, ) | १ | १४ | ० |
| (संयुक्त प्रांत ) | १ | ८ | ० |
| ६ किंमत ३०० रु. पेक्षां जास्त, पण ४०० रु. पेक्षां जास्त नसेल तर. | | | |
| (हिंदुस्थान व संयुक्त प्रांत) | २ | ० | ० |
| (मुंबई व ब्रम्हदेश) | ३ | ० | ० |
| ( बंगाल, मध्यप्रांत, मद्रास, पंजाब व आसाम) | २ | ८ | ० |
| ७ किंमत ४०० रु. पेक्षां जास्त पण ५०० रु. पेक्षां जास्त नसेल तर. | | | |
| (हिंदुस्थान, बंगाल, मध्यप्रांत, मद्रास, पंजाब, आसाम व संयुक्त प्रांत) | २ | ८ | ० |
| (मुंबई व ब्रम्हदेश) | ३ | १२ | ० |
| ८ किंमत ५०० रु. पेक्षां जास्त पण ६०० रु. पेक्षां जास्त नसेल तर. | | | |
| (हिंदुस्थान) | ३ | ० | ० |
| (संयुक्तप्रांत) | ३ | ४ | ० |
| (मुंबई, मध्यप्रांत, बंगाल, मद्रास, पंजाब, आसाम व ब्रम्हदेश ) | ४ | ८ | ० |
| ९ किंमत ६०० रु. पेक्षां जास्त पण ७०० रु. पेक्षां जास्त नसेल तर | | | |
| (हिंदुस्थान) | ३ | ८ | ० |
| (संयुक्त प्रांत) | ४ | ० | ० |
| ( मुंबई, मध्यप्रांत, बंगाल, मद्रास, पंजाब, आसाम व ब्रह्मदेश. ) | ५ | ४ | ० |

| किंमत रुपये | स्टँप | | |
|---|---|---|---|
| | रु. | आ. | पै. |
| १० किंमत ७०० रु. पेक्षां जास्त पण ८०० रु. पेक्षां जास्त नसेल तेव्हां | | | |
| (हिंदुस्थान) | ४ | ० | ० |
| (संयुक्तप्रांत) | ४ | १२ | ० |
| (मुंबई, मध्यप्रांत, बंगाल, मद्रास, पंजाब, आसाम व ब्रम्हदेश) | ६ | ० | ० |
| ११ किंमत ८०० रु. पेक्षां जास्त पण ९०० रु. पेक्षां जास्त नसेल तेव्हां | | | |
| ( हिंदुस्थान ) | ४ | ८ | ० |
| ( संयुक्तप्रांत ) | ५ | ८ | ० |
| ( मुंबई, मध्यप्रांत, बंगाल, मद्रास, पंजाब, आसाम व ब्रह्मदेश ) | ६ | १२ | ० |
| १२ किंमत ९०० रु. पेक्षां जास्त पण १००० रु. पेक्षां जास्त नसेल तेव्हां | | | |
| ( हिंदुस्थान ) | ५ | ० | ० |
| ( संयुक्तप्रांत ) | ६ | ४ | ० |
| ( मुंबई, मध्यप्रांत, बंगाल, मद्रास, पंजाब, आसाम व ब्रह्मदेश ) | ७ | ८ | ० |
| १३ किंमत १००० रु. पेक्षां जास्त असेल तेव्हां ५०० रु. अगर तीचा कोणचाही भाग यांस | | | |
| ( हिंदुस्थान ) | २ | ८ | ० |
| ( संयुक्तप्रांत, मुंबई, मध्यप्रांत, बंगाल, मद्रास, पंजाब, आसाम व ब्रह्मदेश. ) | ३ | १२ | ० |

### उदाहरणार्थ--

एका हिस्सेदाराचा $\frac{2}{3}$ हिस्सा आहे; व बाकी $\frac{1}{3}$ मध्यें दुसरे आहेत. हे एकत्र राहूं इच्छितात व $\frac{2}{3}$ हिस्सा असणारा पार्टिशन घेतो. तेथे $\frac{1}{3}$ हिश्यावर स्टँप घ्यावा लागेल. कारण असें गृहित धरलें जातें कीं लहान हिस्सा मोठ्या हिश्यापासून वेगळा होतो, मोठा लहानांतून होत नाहीं.

टीपः—सरचार्जाबद्दल खरेदीच्या प्रकरणांत दिलेली माहिती पहा.

## ९९ नोंदणी

शंभर रुपये अगर त्यापेक्षां जास्त किंमतीच्या स्थावर मिळकतीचें वांटणीपत्र नोंदणें आवश्यक आहे.

## नमुने

## १०० घराबद्दलचें वांटणीपत्र

(१)······ येथील सिटी सर्वे नंबर··· ··· ··· या मिळकतीचें किंमत ······ रुपये याचें वांटणीपत्र

(२) आम्ही वांटणीपत्र करून ठेवणार ( नांव. गांव वगैरे )
जात ··· ··· धंदा ··· ··· वय वर्षे ··· ··· राहणार ··· ··· ···

(२) आम्ही वांटणीपत्र करून ठेवणार ( १ नांव, गांव वगैरे ) ·········
जात ··· ··· धंदा ··· ··· वय वर्षे ··· ··· राहणार ··· ··· ··· ···
( २ नांव, गांव वगैरे ) जात··· ···धंदा··· ···वय वर्षे··· ···राहणार ··· ···
लिहून ठेवतों वांटणीपत्र ऐसाजे—

(३) आम्हापैकीं नंबर··· ···( नांव )·· ···यांचे हिश्शेस दिलेल्ें मिळकतीचे वर्णन—

( किंमत रक्कम )··· ···येथील··· ···गल्लींतील सिटी सर्वे नंबर ··· चें अभिमुखी घर याचें क्षेत्रफळ ··· ···आहे. याची चकबंदी ··· ···याची किंमत रु.··· ···

(४) आम्हांपैकीं नंबर··· ···याचे हिश्शेस दिलेलें मिळकतीचे वर्णन—
··· ···( किंमत रुपये रक्कम )··· ···येथील··· ···गल्लींतील सिटी सर्वे नंबर··· ···चें अभिमुखी घर याचें क्षेत्रफळ··· ···आहे. याची चतुःसीमा:
··· ···याची किंमत रु.··· ··· ···

(५) येणेंप्रमाणें मिळकती आम्ही वांटून घेऊन आपापले ताब्यांत घेतल्या आहेत या उपर आपापले हिश्शेचें घराची म्युनिसिपल करपट्टी ज्याची त्यानें देत जाऊन आपापले मर्जीप्रमाणें मालकीनें उपभोग घ्यावा.

(६) या उपर एकमेकांकडे वांटणीसंबंधीं कोणत्याहि प्रकारचें कांहीं येणेंघेणें राहिलें नाहीं. वरीलप्रमाणें ज्याच्या हिश्शेस जी मिळकत आली आहे तीवर तो पूर्ण मालक आहे, सदरहू करार आम्हांस व आमचे वारसदार व मृत्युलेख चालविणार यांसी लागू आहेत. वरील सर्व घरांचीं खरेदीपत्रें आम्हांपैकीं ··· ···नंबरचें नांवें असून खातेंहि त्यांचें नांवें आहे. त्यांनीं आम्हांपैकीं नंबर ··· ··· यांच्या हिश्शेचें घराचें खातें त्याचें नांवें करून द्यावे म्हणून राजीखुषीनें लिहून ठेविलें वांटणीपत्र सही ता. ··· ··· माहे ··· ··· सन ··· ··· ई॥ दस्तुर ··· ···

| साक्षी | | | सही | | |
|---|---|---|---|---|---|
| १··· | ··· | ··· | १··· | ··· | ··· |
| २··· | ··· | ··· | २··· | ··· | ··· |

## १०१ तीन भावांनीं केलेलें वांटणीपत्र.

(१) आम्ही (नांव) ··· ··· ··· ··· ··· जात ··· ···
धंदा ··· ··· ··· वय वर्षे ··· ··· राहणार ··· ··· ···
यांनीं करून घेतलें वांटणीपत्र ऐसाजे. आम्ही तिघेहि बंधु असून एकत्र कुटुंबी राहणेचें पटेनासें झाल्यामुळें विभक्त झालों आहोंत.

(२) वांटणी करून घेतलेल्या मिळकतीचें वर्णन—(सबंध मिळकतीचें वर्णन) यापैकीं वांटणी करून घेतलेल्या मिळकतीचा तपशील ··· ··· ··· ···

(३) आम्हापैकीं नंबर १ ··· ··· ··· ··· ··· (नांव) याचे हिश्शास (मिळकतीचें वर्णन) याची किंमत रुपये ··· ··· ··· ···

(४) आम्हांपैकीं नंबर २ ··· ··· ··· (नांव) याचे हिश्शास (मिळकतीचें वर्णन) याची किंमत रुपये······

(५) आम्हांपैकीं नंबर ३ ··· ···(नांव) याचे हिश्शास आम्हांपैकीं नंबर १–२ यांचे हिश्शास दिलेला भाग वजा जातां बाकी राहिलेली सर्व मिळकत म्हणजे (मिळकतीचें वर्णन) याची किंमत रुपये······

(६) म्युनिसिपल करपट्टी वगैरे आपापल्या हिश्शापुरतें आपलें देणेंचें आहे.

(७) येणेंप्रमाणें वांटणी करून घेतली आहे. या वांटणीपत्रानें जी मिळकत ज्याच्या हिश्शास गेली आहे तिजवर त्याचीच पूर्ण मालकी असून दुसऱ्यांचा अगर त्याचे वारसदारांचा कांहीं हक्क संबंध राहिलेला नाहीं. सदर मिळकतीबावत इतरांचे तंटे नाहींत. पुढें येतील तर तिघांनीं समाईक खर्चानीं निस्तरावे म्हणून राजीखुषीनें करून घेतलें वांटणीपत्र सही. तारीख··· ···माहे··· ···सन··· ··· ई··· दस्तुर·········

| साक्ष | सह्या |
| --- | --- |
| १··············· | १············ |
| २··············· | २············ |

## १०२ विशिष्ट मजकूर असलेलें जमिनीबद्दलचें वांटणीपत्र

(१) पेठ·········रयतावा जमिनीचें वांटणीपत्र. वांटणी झालेल्या मिळकतीपैकीं एक हिस्सा वजा करून बाकी दोन हिश्शांची किंमत रुपये ··· ···

(२) आम्ही **अ** जात ··· ··· धंदा ··· ··· वयवर्षे ··· ··· राहणार ··· ··· व **ब** जात··· ··· धंदा ··· ··· वयवर्षे ··· ··· व **क** जात··· ······ धंदा ··· ··· वयवर्षे ······ राहाणार ··· ······ यांनीं करून घेतलें वांटणीपत्र ऐसाजे—

(३) इलाखा ··· ··· तालुका ··· ··· पैकीं पेठ ··· ··· गांवचे रानांत असलेली सरकारी रयतवारी सर्वे नंबर ··· ··· एकर ······ गुंठे··· ···आकार रुपयेचीं पुरा नंबरची जमीन मूळ मालक **ड** राहणार ··· ··· यांनीं आम्हांपैकीं नंबर ३ **क** यांचे नांवें तारीख··· ···ई॥ रोजी·········रुपयांस खरेदी दिली

असून सदर खरेदीपत्र ...... सब-रजिस्ट्रार कचेरींत बुक नंबर ...... चें ... व्हॉल्यूमांत ...... नंबरी नोंदलें आहे. आम्हांपैकीं नंबर २-३ यांच्याशिवाय असलेला अविभक्त बंधु ई यांनें सदर जमिनीतील आपला समाईक ⅓ हिस्सा आम्हांपैकीं नंबर १ याचें नांवें ता. ...... ई रोजीं खरेदी दिला असून सदर खरेदीपत्र ...... सब्-रजिस्ट्रार-कचेरींत बुक नंबर ......चे ......व्हॉल्यूमांत ......नंबरी नोंदलें आहे. याप्रमाणें सदर जमिनीस आम्ही तिघे मालक असून आजपर्यंत समाईकांत वहिवाट करीत होतो. परंतु यापुढें समाईकांत वहिवाट करण एकमेकांस पटत नसल्यामुळें सदर जमिनींत प्रत्यक्षपणें विभागणी करून घेतली आहे त्याबद्दल तपशील खालीलप्रमाणें,—

(४) सदर पेठ ......गांवचे रानांतील रि. सर्वे नंबर ......एकर गुंठे ...... आकार रुपये ......यापैकीं ⅓ भाग यांस चकबंदी पू. ......प. ......द. ... उ. ......या चकबंदींतील जमीन एकर गुंठे ......आकार रु. ...ची आम्हां पैकीं नंबर अ याच्या हिश्शास दिली आहे.

(५) सदर पेठ ......गांवचे रानांतील रि. सर्वे ......एकर गुंठे ...... आकार रुपये ...यापैकीं ⅓ भाग यास चकबंदी पू० ......प. ......द. ......उ. ......या चकबंदींतील जमीन एकर ...गुंठे ...आकार रुपये ...ची आम्हांपैकीं नंबर २ ब याच्या हिश्शास दिली आहे.

(६) सदर पेठ ......गांवचे रानांतील रि० सर्वे नंबर ...एकर ...गुंठे ... आकार रुपये ...यापैकीं ⅓ भाग यास चकबंदी पू० ......प. ......द. ......उ. ...या चकबंदींतील जमीन एकर ... गुंठे ... आकार रुपये ... ची आम्हां पैकीं नंबर ३ क याच्या हिश्शास दिली आहे.

(७) येणेंप्रमाणें वरील तपशिलाबरहुकूम वांटणी करून प्रत्येकांनीं आपापला हिस्सा आपल्या कबजांत घेतला आहे. या वांटणीपत्रानें जो हिस्सा ज्याच्या वांटणीस आला असेल त्याचा तदंगभूत वस्तुसहित तोच मालक झाला असून त्याजवर दुसऱ्या हिस्सेदारांचा कोणताहि हक्कसंबंध राहिलेला नाहीं. प्रत्येकांनीं आपापल्या हिश्शाच्या जमिनीचा सारा दरसाल सरकारास देत जाणेचा

आहे. हें वांटणीपत्र आम्हांस व आमचे वारसदारास व मृत्युपत्र चालविणारास पूर्णपणें बंधनकारक आहे. म्हणून करून घेतलें वांटणीपत्र सही तारीख ··· ··· माहे ··· ··· सन ··· ··· ई॥ दस्तुर ··· ··· ··· ···

**साक्ष.**

१··· ··· ··· **सह्या अगर आंगठे**

२··· ··· ··· **दस्तुरसह.**

## १०३ बोजा असलेलें फारकतपत्र

(१) पेठ··· ···घर परसूचें फारकत पत्र रुपये

(२) रा. रा. (अ) जात··· ···धंदा··· ···वय वर्षे··· ··· राहणार ··· ··· ··· यांसी,

(३) फारकतपत्र बेसमी रा. रा. (ब) जात ........ धंदा ......... वय वर्षे ... ... राहणार ... ... लिहून दिलें फारकतपत्र ऐसाजे,—

(४) आम्ही उभयता एकोदर बंधू असून आमचे वडील वारल्यापासून अजमासें ··· ··· ··· वर्षे एकत्र होतों. परंतु पुढें एकत्र राहणें एक मेकांस पटेनासें झाल्यामुळें अलीकडे अजमासें ··· ··· ··· वर्षांपासून आम्ही ··· ··· ··· ··· विभक्त होऊन स्वतंत्रपणें उद्योग करून राहत आहों. हल्लीं आमच्या सर्वांच्या समाईकांतील इस्टेट म्हणजे खालीं नमूद केलेलें घर परसू असून त्याजवर समाईक बोजाहि बराच आहे. सदर मिळकतीचें वर्णन खालीं लिहिलेप्रमाणें आहे,—

(५) ता ······ ··· पैकीं पेठ गल्लींतील ··· ··· ··· असलेलें सिटी सर्वे नंबर ······ चें क्षेत्रफळ ······ चौरसवारचें घर परसू यास चकबंदी पू. ···· प. ··· द. ···· उ. ······ या चकबंदीमधील घर परसू जागा इमला व तदंगभूत वस्तुसहित.

(६) येणेंप्रमाणें वर्णनाची मिळकत बोजा वगैरे संपवून वांटणी घेणेस सर्वांना गैरसोय होत असलेनें वांटणी न करतां सदर मिळकतीपैकीं आम्हां उभयतांच्या ·· ······ हिस्शाचा मोबदला तुमचेकडून आम्ही आज रोजीं रुपये ···· घेऊन

आमचा हक्क तुम्हांस सोडला आहे. करितां तुम्ही सदर मिळकतीवर वहिवाट पूर्ण मालकीनें करावी व बोजाची फेडहि तुम्हीच करून घ्यावी. यानंतर सदर मिळकतीवर आमचा अगर आमचे वारसदारांचा कांहीं हक्क संबंध राहिला नाहीं. सदर मिळकतीशिवाय वांटणी होणेजोगी कांहींच इस्टेट राहिलेली नाहीं. सदर रुपये ......आम्हांस तुमचेकडून रोख पोहोंचले आहेत. निराळ्या पावतीची जरूरी नाहीं. म्हणून लिहून दिलें फारकतपत्र सही तारीख...... माहे...... सन...... इ॥ दस्तुर......

साक्ष

१.........

२.........

सही अगर

आंगठा

## प्रकरण १४ वें

## रिलीजपत्र

### १०४ रिलीजपत्र म्हणजे काय?

मनुष्याला असणारा कोणचाही हक्क ज्यावेळीं तो सोडून देतो, व त्याबद्दल एखादा कागद करून ठेवितो त्या वेळीं त्या कागदास रिलीजपत्र म्हणतात. दुसऱ्या-माणसाविरूद्ध अथवा एखाद्या मिळकतीविरुद्ध असणारा हक्क सोडून देणें ही गोष्ट रिलीजपत्रांत आवश्यक असते.

### १०५ रिलीजपत्रांतील शब्द

रिलीजपत्रांत अमुकच शब्द पाहिजेत असा नियम नाहीं. कोणचेही शब्द असले तरी चालतील, मात्र त्यावरून अधिकार अथवा हक्क सोडला आहे ही गोष्ट स्पष्टपणें दिग्दर्शित झाली पाहिजे. त्याचप्रमाणें कोणचा अधिकार अथवा कोणचा हक्क सोडणेचा याबद्दलही स्पष्ट खुलासा रिलीजपत्रांत असला पाहिजे.

## १०६ रिलीजपत्राचा स्टॅंप

आधिकार अगर हक्क याची किंमत जर १००० रु. पर्यंत असेल तर साध्या दस्ताप्रमाणें स्टॅंप द्यावा लागतो. अधिकार अगर हक्क याची किंमत जर १००० रु. पेक्षां अधिक असेल तर मुंबई प्रांतांत १० रुपये व मध्यप्रांत, वऱ्हाड मध्यें ७॥ रुपये किमतीचा स्टॅंप लागेल. ( याशिवाय मुंबई प्रांतात $\frac{१}{२}$ सरचार्ज व मध्यप्रांत वऱ्हाड मध्यें $\frac{१}{३}$ सरचार्ज द्यावा लागतो. )

## १०७ नोंदणी

जो अधिकाराचा हक्क सोडणेचा त्याची किंमत शंभर रुपये अगर त्यापेक्षां जास्त असेल तर रिलीजपत्र नोंदलें पाहिजे—

## नमुनें

टीप—रिलीजपत्राचा नमुना अमुकच पाहिजे असा नियम नाहीं. साधारण माहितीकरितां दोन नमुने खालीं दिले आहेत.—

## १०८ कबजे-गहाण हक्काचें रिलीजपत्र

(१) ····· जमिनीवरील कबजे गहाण हक्काचें रिलीजपत्र ······

(२) रा. रा. ······· जात ···· धंदा ······ वय वर्षे ····· राहणार ····· तालुके ··· यांसी

(३) रिलीज पत्र बेसमी ···· जात ···· धंदा ···· वय वर्षे ···· राहणार ······ तालुके ····· लिहून दिले रिलीजपत्र ऐसाजे,—

(४) तालुके ······ पैकीं मौजे ···· येथील रि. स. नं. ······· पोट हिस्सा नंबर ···· एकर गुंठे ······ आकार रुपये ···· च्या जमिनी तदंगभुत वस्तुसहीत,

(५) येणेंप्रमाणें जमिनी ···· यांनीं माझें नावें वर्षाच्या मुदतीनें ····· रुपयांस कबजेगहाण लिहून दिल्या असून सदरचा दस्त ··· ··· सब्-रजिस्ट्रार कचेरींत बुक नंबर ··· ···चे······व्हाल्युमांत······नंबरीं नोंदला आहे. त्याचप्रमाणें मिळकती माझे कबजांत आहेत. सदर ऋणकोपैकीं······यांनी

वरील मिळकतींत वांटणी करून घेऊन आपल्या वांटणीच्या मिळकतींपैकीं तुम्हांस ता.··· ···इसवी रोजीं खरेदी दिलेल्या जमिनीचें वर्णन,—

(६) मिळकतीचें वर्णन.

(७) येणेंप्रमाणें वर्णनाची जमीन तुम्ही खरेदी घेतली असून माझ्या गहाण बोजाची फेड होणेकरितां ऋणकोनीं तुम्हांकडे ठेविलेल्या रकमेपैकीं······रुपये मी तुमचेकडून घेतले आहेत व तुम्ही खरेदी घेतलेल्या वरील मिळकतीपुरता माझा कबजा गहाण बोजाचा हक्क मी सोडला आहे. सबब यानंतर तुम्ही खरेदी घेतलेल्या वरील मिळकतीवर माझा कोणताहि बोजा राहिला नाहीं. सदरचा कबजा तुम्हांस सोडला आहे. तुमचेकडून रक्कम घेऊन गहाण हक्क सोडणेबद्दल वरील ऋणकोपैकीं तुम्हांस खरेदी दिलेलें··· ···यानी मला समक्ष सांगितल्यावरून मी तुम्हांस हें रिलिजपत्र करून दिलें आहे. सदरी·········रुपये तुमचेकडून रोख घेऊन हा दस्त लिहून दिला आहे करितां अलाहिदा भरणा पावतीची जरूर नाहीं. म्हणून राजीखुषीनें लिहून दिलें रिलिजपत्र सही तारीख······माहे······सन ई॥ दस्तुर·········राहणार.

| साक्ष | सही |
|---|---|
| १ ·· ·········· | १ ············ |
| २ ·············· | २ ············ |

## १०९ सरेंडर ऑफ लीज ( कबुलायती बाबत )

(१) ··· ··· इनाम जमिनीचे सरेंडर ऑफ लीज ... ... ... ...

(२) रा. रा. ··· ··· जात ··· ··· धंदा ··· ··· वय वर्षे ··· ··· राहणार ··· ··· ··· तालुके ··· ··· ··· यांसी

(३) जात ··· ··· धंदा ··· ··· वयवर्षे ··· ··· राहणार ··· ··· ··· लिहून दिलें सरेंडर ऑफ लीज ऐसाजे—

(४) तालुके ··· ··· मौजे ··· ··· गांवचे··· ··· रानांत असलेली जमीन रि. स. नं. पो. हि. व ए. गु आ. रु. ची पुरा पोटहिश्शाची जमीन हिची चकबंदी ···या चकबंदींतील जमीन आपण माझें नांवें तारीख ···ई॥ रोजीं निरंतर

कालानें देऊन याजबद्दल निरंतर कौलपत्र लिहून दिलेलें सब्-रजिस्ट्रार कचेरींत नंबर बुकाचे ••• व्हॉल्युमांत ••• नंबरी नोंदलें आहे सदर दस्ताप्रमाणें जमीन मात्र अद्याप माझे ताब्यांत मिळाली नाहीं. यापुढें सदर जमीन मला नको असल्यामुळें आपसांत तडजोडीनें सदर कौलाचा हक्क मी आपणांस परत सोडला आहे. करितां आपण वाटेल त्यास लागण करून द्यावी. पूर्वी सदर बाबत •••• रुपये आल्यास देणें ठरले असून त्यांपैकीं ••••• रुपये आपल्यास दिले होते व •••• रु.•••• यांस देणेंकरितां मजकडे ठेऊन घेतलें होतें ते रुपये मी अद्याप त्यास दिलें नाहींत. आपणांस दिलेलें •••••• रुपये आपण आज रोजीं मला परत दिलें ते पोहचलें. यानंतर आपल्याकडे माझे येणें कांहीं राहिलें नाहीं. यानंतर सदर जमिनीवर माझा कोणताहि हक्क राहिला नाहीं म्हणून लिहून दिलें सरेंडर ऑफ लीज सही •••• तारीख •••• माहे •••• सन •••• इ॥ दस्तुर ••••• राहणार •••

| साक्ष | सही |
|---|---|
| १•••••••• | १•••••••••• |
| २•••••••• | २•••••••••• |

# प्रकरण १५ वे

## प्रॉमिसरी नोट

### ११० प्रॉमिसरी नोटेची व्याख्या

प्रॉमिसरी नोट म्हणजे एक लिहिलेला कागद कीं, ज्यामध्यें फक्त एखाद्या विवक्षित मनुष्यास, अगर तो हुकूम करील त्याप्रमाणें, अगर हा कागद हातीं असणाऱ्या इसमास कांहीं ठराविक रक्कम, कोणतीहि सबब न सांगतां देण्याचें ऋणकोनें मान्य केलेलें असतें, व ज्यावर ऋणकोची सही अगर अंगठा असतो. ( निगोशिएबल एन्स्ट्रूमेंटस् ॲक्ट, कलम ४.)

## १११ प्रॉमिसरी नोटेच्या बाबतींत अत्यावश्यक असणाऱ्या गोष्टी

निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस् ॲक्टमध्यें प्रॉमिसरी नोटेची जी व्याख्या दिली आहे, त्यावरून प्रॉमिसरी नोट कायदेशीर होण्यास अत्यावश्यक असणाऱ्या गोष्टी अशा:—

(१) प्रॉमिसरी नोट लेखी पाहिजे—

(२) त्यामध्यें कोणचीहि सबब न सांगतां पैसे देण्याची कबुली पाहिजे.

(३) कबूल केलेली रक्कम निश्चित पाहिजे; व ही निश्चित रक्कम पैशाच्या स्वरुपांत पाहिजे.

(४) ज्यास पैसे परत द्यावयाचे तो निश्चित पाहिजे. नोट ज्याचे हातीं असेल त्यास पैसे देण्याचे कबूल केलें असेल तर या नियमाचें महत्व रहात नाहीं.

(५) नोटेवर लिहून देणाऱ्याची सही अगर अंगठा पाहिजे.

## ११२ प्रॉमिसरी नोटीस लागणारा स्टँप

स्टँपाच्या दृष्टीनें प्रॉमिसरी नोटीचे आपणांस तीन भाग करतां येतील—

(१) मागाल त्यावेळीं पैसे देऊं असा करार असलेली प्रॉमिसरी नोट.

(२) मागाल त्यावेळीं पैसे देऊं असा करार नाहीं, पण प्रॉमिसरी नोटीच्या तारखेपासून अगर मागितल्या पासून एक वर्ष अगर एक वर्षाच्या आंत पैसे देऊं, असा करार असलेली प्रॉमिसरी नोट.

(३) मागाल त्यावेळीं पैसे देऊं असा करार नाहीं, पण प्रॉमिसरी नोटेच्या तारखेपासून अगर मागितल्या पासून एक वर्षाच्या पुढें पैसे देण्याचें ज्यांत कबूल केलें आहे, अशी प्रॉमिसरी नोट.

व्यवहारांत ज्या प्रॉमिसरी नोटा होतात त्या साधारणतः पहिल्या प्रकारच्या म्हणजे मागाल त्यावेळीं पैसे देऊं असें ज्यांत कबूल केलें आहे अशा असतात. दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारच्या नोटा फारच क्वचित दृष्टीस पडतात.

## पहिल्या प्रकारच्या नोटीस लागणारा स्टँप खालीलप्रमाणें:—

(अ) जेव्हां प्रॉमिसरी नोट २५० रुपये अगर त्यापेक्षां कमी किंमतीची असेल तेव्हां ... ... ... ... ... ... ... ... १ आण्याचा स्टँप

(ब) जेव्हां प्रॉमिसरी नोट २५० रु. पेक्षां जास्त रकमेची पण १,००० अगर त्यापेक्षां कमी किंमतीची असेल तेव्हां ........... २ आण्याचा स्टँप.

(क) जेव्हां प्रॉमिसरी नोट १००० रु. पेक्षां जास्त रकमेची असेल, तेव्हां ( स्टँप ॲक्ट आर्टिकल ४९ ) ................ ४ आण्याचा स्टँप.

## दुसऱ्या प्रकारच्या प्रॉमिसरी नोटेच्या बाबतींत स्टपाचें कोष्टक पुढीलप्रमाणें:—

| नंबर | प्रॉमिसरी नोटेची रक्कम अमुक रु. पेक्षां जास्त | प्रॉमिसरी नोटेची किंमत अमुक रु. पेक्षां जास्त नाहीं. | स्टँपाची किंमत रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| १ | १ | २०० | ०—३—० |
| २ | २०० | ४०० | ०—६—० |
| ३ | ४०० | ६०० | ०—९—० |
| ४ | ६०० | ८०० | ०—१२—० |
| ५ | ८०० | १,००० | ०—१५—० |
| ६ | १,००० | १,२०० | १—२—० |
| ७ | १,२०० | १,६०० | १—८—० |

वगैरे [ पहा—स्टँप ॲक्ट आर्टिकल १३ व ४९ ]

**तिसऱ्या प्रकारच्या प्रॉमिसरी नोटेच्या बाबतींत स्टँपाचे कोष्टक खालीलप्रमाणें:—**

(१) ज्यावेळीं प्रॉ. नोटेची किंमत १० रु. पेक्षां जास्त नसते ... २ आणे.

(२) ज्यावेळीं प्रॉ. नोटेची किंमत १० रु. पेक्षां जास्त असते पण ५० रु. पेक्षां जास्त असत नाहीं. ... ... ... ४ आणे

(३) ५० रु. पेक्षां जास्त पण १०० रु. पेक्षां जास्त नाहीं. ... ८ आणे.

(४) १०० रु. पेक्षां जास्त पण २०० रु. पेक्षां जास्त नाहीं. · · · १ रुपया वगैरे [ पहा – स्टॅंप ॲक्ट, आर्टिकल १३, १५ व ४९ ]

## ११३ सर्व साधारण प्रॉमिसरी नोट

मराठीमध्यें सर्व साधारणपणें प्रॉमिसरी नोटेचा नमुना प्रचलित आहे तो असा :–

रा. रा. ( धनकोचें नांव गांव वगैरे ) · · · · · · यांसी,

प्रॉमिसरी नोट लिहून देणार ( ऋणकोचें नांव गांव वगैरे ) · · · · आज मु. · · · · · · · प्रॉमिसरी नोट लिहून देतो ऐसाजे.

मी तुम्हापासून आजरोजी · · · रुपये घेतले आहेत. यासी व्याज दरमहा दरशेंकडा · · · · प्रमाणें देणेंचा करार केला आहे. हे रुपये तुम्ही मागाल त्यावेळीं व मागाल त्या ठिकाणीं देईन. ह्यास कांहीं तक्रार सांगणार नाहीं.

सदर्हु प्रामिसरी नोटीस · · · · · · · तिकीट लावून त्यावर मीं आपली सही अगर आंगठा केला आहे म्हणून प्रॉमिसरी नोट लिहून दिली.

सही ( अगर आंगठा व दस्तूर )

## ११४ ठराविक दिवशीं अगर हप्त्यानें फेडणेची प्रॉमिसरी नोट

रा. रा. ( धनकोचें नांव गांव वगैरे ) · · · · · यांसी

प्रॉमिसरी नोट लिहून देणार ( ऋणकोचें नांव गांव वगैरे ) · · · · · · · प्रॉमिसरी नोट लिहून देतों ऐसाजे:—

मी तुम्हापासून आज रोजीं · · · · रुपये घेतले आहेत. यासी व्याज दरमहा दर शेंकडा · · · · · · · · प्रमाणें देणेंचा करार केला आहे. हे रुपये तुम्हास ता. · · · · · · रोजीं देईन. अथवा हे रुपये तुम्हास ता. · · · · · · पासून दरमहा · · · · · · रु. प्रमाणें देऊन बारा हप्त्यांत ( अगर जितके हप्ते ठरले असतील तितक्या हप्त्यांत ) देऊन सर्व रकमेची फेड करीन. यासी कांहीं तक्रार सांगणार नाहीं.

सदर्हू प्रॉमिसरी नोटीस · · · · · · यावर मी आपली सही अगर आंगठा केला आहे म्हणून प्रॉमिसरी नोट लिहून दिली. ता. · · · · · · · · · · · ·

सही ( अगर आंगठा व दस्तुर )

# प्रकरण १६ वे

## कबुलायत

### ११५ कबुलायत म्हणजे काय ?

एखाद्या मनुष्यानें आपली स्थावर मिळकत कांहीं मोबदला घेण्याच्या अटीवर दुसऱ्यास कांहीं काळपर्यंत अगर कायमची उपभोगण्यास दिली, तर त्या उपभोगण्याच्या अधिकारास **कबुलायत** असें म्हणतात.

जो मनुष्य आपली स्थावर मिळकत दुसऱ्यास देतो त्यास **मालक** असे म्हणतात; ज्यास मिळकत दिली जाते त्यास **कुळ** (आसामी) असें म्हणतात; व ज्या मोबदल्याकरितां मिळकत दिली जाते त्यास **भाडें** अगर **खंड** असें म्हणतात. हें भाडें अगर हा खंड पैशाच्या स्वरुपांत असेल, पिकाच्या स्वरुपांत असेल, चाकरीच्या स्वरुपांत असेल, अथवा कोणच्याही मौल्यवान वस्तूच्या स्वरुपांत असेल, ( ट्रॅन्सफर ॲक्ट ऑफ प्रॉपर्टी कलम १०५ )

आपण व्यवहारांत घरांच्या बाबतींत भाडेचिठ्ठी अगर भाडेपट्टा असें म्हणतो व जमिनीच्या बाबतींत खंडचिठ्ठी अगर खंडपट्टा असें म्हणतो. कबुलायत हा सामान्य शब्द आहे. घराच्या बाबतींत जमिनीच्या बाबतींत अगर कोणच्याही स्थावर मिळकतीच्या बाबतींत हा शब्द लागूं आहे. भाडेचिठ्ठी म्हणण्याच्या ऐवजीं कबुलायत देऊन आपण दुसऱ्याच्या घरांत भाड्यानें राहिलो आहों, असें आपणांस म्हणतां येईल; किंवा खंडचिठ्ठी म्हणण्याच्या ऐवजी कबुलायत देऊन आपण दुसऱ्याची जमीन लागवडीनें पत्करली आहे, असें आपणांस म्हणतां येईल.

### ११६ कोणत्या कबुलायती रजिस्टर अगर नोंद करण्यास पाहिजेत ?

सालोसालच्या अगर एक वर्षापेक्षां जास्त मुदतीच्या स्थावर मिळकतीच्या कबुलायती नोंद करण्यास पाहिजेत. ह्याशिवाय बाकीच्या स्थावर मिळकतीच्या कबुलायती नोंद करण्यात अगर कबजा देऊन तोंडीं करारानें कराव्यांत, ( ट्रॅन्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, कलम १०७ )

ह्या कलमाप्रमाणें कबुलायतीचे आपणाला दोन भाग पाडतां येतील:—

(१) सालोसालच्या कबुलायती अथवा एक वर्षापेक्षां जास्त मुदतीच्या कबुलायती.

(२) बाकीच्या कबुलायती म्हणजे महिन्या महिन्याच्या कबुलायती अथवा एक वर्षांच्या कबुलायती अथवा एक वर्षापेक्षां कमी मुदतीच्या कबुलायती. पहिल्या प्रकारच्या कबुलायती नोंद करणें अत्यावश्यक आहे. दुसऱ्या प्रकारच्या कबुलायती नोंद कराव्यांत अगर करूं नयेत. नोंद न करतां तोंडी करारानेंहि दुसऱ्या प्रकारच्या कबुलायती करतां येतील, मात्र मालकानें कुळाला कबजा दिला पाहिजे.

पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे कीं, एक वर्षाची कबुलायत केल्यास ती नोंदावी लागते. ह्या समजुतीमुळेंच पुष्कळ लोक नोंदणीचा त्रास चुकविण्याकरितां अकरा महिन्यांची कबुलायत करतात. पण ही समजूत चुकीची आहे, एक वर्षापेक्षां जास्त ( बारा महिने एक दिवस अगर तेरा महिने ) मुदतीची कबुलायत असेल अथवा सालोसाल मुदतीची कबुलायत असेल तरच ती नोंदण्यास पाहिजे असा कायदा आहे.

## ११७ कोणत्या कबुलायतीस स्टँपाची जरूरी नाहीं ?

नोंदणीच्या बाबतींत ज्याप्रमाणें कांहीं कबुलायतींना कायद्यानें सवलत दिली आहे, ( ३७ नियम पहा, ) त्याचप्रमाणें स्टँपाच्या बाबतींत देखील कांहीं विशिष्ट कबुलायतींपुरती कायद्यानें सवलत दिली आहे ती सवलत अशी:--

जर शेतीचेबाबत कबुलायत झाली असेल व कबुलायतीची मुदत एक वर्षापेक्षां जास्त नसेल अथवा वार्षिक सरासरी खंड शंभर रुपयांपेक्षां जास्त नसेल तर अशा कबुलायतीस स्टँप लागत नाहीं, ( स्टँप अॅक्ट, आर्टीकल ३५ )

## नमुने

## ११८ सर्वसाधारण शेतीची कबुलायत

रा. रा.................( मालकाचे नांव ) ह्यात....................
( कुळाचे नांव ) कबुलायत लिहून देतो ऐसाजे—

मी तुमची जमीन........................( रि. स. नं. चतुः सिमा ) तारीख.........पासून तारीख.............पर्यंत ( अगर अमुक साला पुरती अगर अमुक महिन्यापुरती ) लागणीनें पत्करली आहे. त्याबद्दल खंडमक्ता म्हणून

मी तुम्हास..............( रुपये अगर पिकाचा कांहीं भाग ) देण्याचें कबूल केलें आहे. तारीख..............रोजीं ( अगर सरकारी हप्त्याप्रमाणें ) मी तुम्हांस हा खंडमक्ता देईन व पावती घेईन. पावतीखेरीज तोंडीं पैसे अगर माल दिल्याची तक्रार करणार नाहीं. कबुलायतीची मुदत संपतांच जमिनीचा कबजा मी तुम्हांस परत देईन, याबद्दल कोणतीही तक्रार करणार नाहीं. मुदतीपुढें खंडमक्ता देणेचा राहिल्यास त्यावर.........प्रमाणें व्याज देईन.........म्हणून लिहून दिली कबुलायत. तारीख

साक्ष — कुळाची सही अगर अंगठा

१............

२............

## ११९ घराची सर्वसाधारण कबुलायत

घराच्या बाबतींत भाडेचिठ्ठी अगर कबुलायत देतात त्याचा सामान्य नमुना असा—

रा. रा. ............ ( मालकाचें नांव ) यांसीं,

.........(भाडेकऱ्याचें नांव) कबुलायत अगर भाडे चिठ्ठी लिहून देतो ऐसाजे—

मी तुमचें घर.......... ( घराचें वर्णन ) तारीख............पासून तारीख..........पर्यंत ( अगर अमुक सालबद्दल अगर अमुक महिन्याबद्दल ) भाड्यानें घेतलें आहे. ह्यांस भाडें.........देण्याचें कबूल केलें आहे. हें भाडें मी दर महिन्याचे अमुक तारखेस ( अगर दरसाल अमुक तारखेस अगर जसें ठरेल त्याप्रमाणें ) नियमित देत जाईन. भाडें वक्तशीर न दिल्यास त्यावर......प्रमाणें व्याज देत जाईन. भाडें दिल्याबद्दल पावती घेत जाईन. पावती शिवाय तोंडी भाडें दिल्याची तक्रार करणार नाहीं. मुदत संपताच घराचा कबजा मी तुम्हांस बिन-हरकत देईन......म्हणून लिहून दिली कबुलायत अगर भाडेंचिठ्ठी. तारीख......

साक्ष — भाडेकऱ्याची सही अगर अंगठा

१............

२............

# प्रकरण १७ वें

## साधा दस्त

### १२० साधा दस्त व त्याचे प्रकार

ज्या दस्तास तारण नसतें अशा दस्तास " **साधा दस्त** " म्हणतात.

बगारामानें लोणकरशेटला आपलें घर अगर जमीन तारण देऊन पांचशें रुपयांचा दस्त लिहून दिला तर असा दस्त " **गहाण दस्त** " होय; पण बगारामानें कोणतीही मिळकत तारण न देतां पांचशें रुपयांचा दस्त लोणकर-शेटला दिला तर त्याला " **साधा दस्त** " म्हणतात.

स्टँप ॲक्टमध्यें साध्या दस्ताचे प्रकार खालीलप्रमाणें दिले आहेत.

(१) **अटीयुक्त दस्त,**

(२) **सर्वसाधारण पैक्याच्या दस्त,**

(३) **शेतकी दस्त,** ( स्टँप ॲक्ट कलम २–५ )

## अटीयुक्त दस्त

अटीयुक्त दस्त म्हणजे ज्यांत ऋणको सावकारास पैसे देण्याचें कबूल करतो, पण त्यांत अशी अट घालतो कीं, अमुक एखादें कृत्य झालें अगर न झालें तर पैसे देण्याची जबाबदारी रद्द समजण्यांत येईल.

## सर्वसाधारण पैक्याचा दस्त

सावकार व कुळ ह्यांच्या दृष्टीनें हाच दस्त विशेष महत्त्वाचा आहे. ह्यामध्यें—

(अ) ऋणकोनें धनकोला पैसे देण्याचें कबूल केलेलें असते.

(ब) धनको हुकूम करील त्याप्रमाणें अगर हा कागद हातीं असणारें इसमास पैसे देण्याचें ऋणकोनें कबूल केलेलें नसते.

(क) ऋणकोची सही अगर आंगठा झाल्यावर साक्षिदारानें साक्ष घातलेली असते.

**टीप**—दस्तावर साक्षीदाराची सही असणें अत्यंत जरूरीचें आहे. प्रॉमिसरी नोटेवर साक्षीची आवश्यकता भासत नाहीं, इतकेंच नव्हे तर जास्त बळकटी

दा. ६३८७ ...१६१

येण्याकरितां प्रॉमिसरी नोटेवर साक्ष घातली गेली तर प्रॉमिसरी नोटेचें स्वरूप बदलतें व तो कागद दस्त होतो.

## शेतकी दस्त

ह्यांत—(अ) वरच्या दस्ताप्रमाणेंच सही, अगर निशाणी अंगठा व साक्ष असते; पण—

(ब) ह्यामध्यें पैसे देण्याचें कबूल केलेलें नसून धान्य अगर शेतीचा माल देण्याचें कबूल केलेलें असतें.

## १२१ रजिस्ट्रेशन

साध्यादस्तास रजिस्ट्रेशन अगर नोंदणीची जरूर नाहीं. एखाद्यास साधा दस्त नोंदवावा असें वाटेल तर त्याच्या इच्छेप्रमाणें तो नोंदवण्यास हरकत नाहीं, परंतु तो नोंदविलाच पाहिजे असें कायदा म्हणत नाहीं.

## १२२ सर्वसाधारण रकमेचा दस्त

सर्वसाधारण रकमेचा दस्ताचा सामान्य नमुना असा—

रा. रा. ( धनकोचें नांव, गांव वगैरे ) ........... यांसी दस्त लिहून देणार ( ऋणकोचें नांव, गांव वगैरे ) ........... दस्त लिहून देतो ऐसाजे—

मी तुम्हापासून आज रोजीं ... ... रुपये ... ... ... ... (अमुक कारणाकरितां) घेतलें आहेत. ह्यांसी व्याज दरमहा दर शेंकडा ........ प्रमाणें देण्याचें कबूल केलें आहे. व्याजासह सर्व रुपये मी तुम्हांस आजपासून ... ... ( मुदत ... ) देईन. मुदतीपुढें पैसे देण्याचें राहिल्यास व्याजासह सर्व रुपये वसूल करण्याचा तुम्हांस अधिकार आहे. म्हणून लिहून दिला दस्त.

तारीख

ऋणकोची सही अगर नि. अंगठा

दस्तुरसह

साक्ष

(१)....................

(२)....................

## १२३ अटीयुक्त दस्त

रा. रा. ( धनकोचें नांव, गांव वगैरे )··············यांसी,

मी ( ज्यानें दस्त लिहून दिला असेल त्याचें नांव गांव वगैरे )······ ·· ह्या दस्तानें असें कबूल करतो कीं—

तुम्हांस मी पांचशे ( ५०० ) रुपये देण्यास बांधला गेलो आहे, व हा करार मी, माझी मिळकत व माझे वारस ह्यांच्यावर बंधनकारक आहे.

मात्र तुमची मिळकत माझ्या ताब्यांत आहे. ती माझे ताब्यांत असेंपर्यंत त्याबद्दल दरसाल मी प्रामाणिकपणानें हिशेब दिला तर वर दिलेली माझी जबाबदारी नष्ट होईल व तसें करण्यास मी चुकेन तर वर दिल्याप्रमाणें पांचशें रुपये देण्यास मी बांधला राहीन. तारीख

**साक्ष**

१············ ज्यानें दस्त लिहून दिला असेल त्याची

२············ सही अगर नि. अंगठा दस्तुर सह

## १२४ शेतकी दस्त

रा. रा. ( धनकोचें नांव, गांव वगैरे ) ··· ···ह्यांसी दस्त लिहून देणार ( ऋणकोचें नांव, गांव वगैरे ) ······ दस्त लिहून देतों ऐसाजे.—

मी तुम्हांपासून आज रोजीं ( अगर पूर्वी अमुक रोजीं ) ······ रुपये घेतले आहेत. त्याबद्दल मी तुम्हास ······ ( अमुक दिवशीं ) ··· ··· ··· ( अमुक धान्य ) ········ ( अमुक मण वगैरे ) देईन.

याप्रमाणें करण्यास मी चुकेन तर त्या दिवशीं त्या धान्याची जी किंमत असेल ती व नुकसान म्हणून ····· ( अमुक रुपये ) मी तुम्हास देईन. मुदतीपुढें ······ अमुक ( दरानें व्याज ) मी तुम्हास देईन, म्हणून लिहून दिला दस्त. तारीख

**साक्ष**

१ ············ ऋणकोची सही

२ ············ अगर नि. अंगठा दस्तुर सह.

# प्रकरण १८ वें

## १२५ गहाण म्हणजे काय ?

गहाण म्हणजे अेकाद्या विशिष्ट स्थावर मिळकतीतील हक्काची खालील कारणांकरितां तबदिली करणे होयः—

### कारणें.

(१) कर्ज म्हणून दिलेल्या अथवा दिले जाणाऱ्या पैशाला तारण असावे म्हणून, अथवा

(२) असलेल्या अगर पुढें होणाऱ्या कर्जाला तारण असावे म्हणून, अथवा

(३) ज्या करारामुळें पैशाची जबाबदारी. उत्पन्न होईल असा अेकादा करार करण्याकरितां तारण असावे म्हणून (टी. पी. ॲक्ट कलम ५८ )

हक्काची तबदिली करणाऱ्यांस " **गहाण देणारा** " म्हणतात.

ज्याला हक्क तबदील केला असेल त्यांस " **गहाण घेणारा** " म्हणतात.

ज्या रकमेकरितां मिळकत तारण दिली असते; ती रक्कम व त्याचें व्याज ह्यांस " **गहाणाची रक्कम** " असें म्हणतात.

आणि ज्या दस्तअैवजाने गहाणहक्क दिलेला असतो, त्यास " **गहाणखत** " म्हणतात ( टी. पी. ॲक्ट कलम ५८ )

वर जी गहाणाची व्याख्या दिली आहे, त्यांत तीन गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत.

(१) गहाण म्हणजे **हक्काची तबादिली** करणें होय. " **हक्काची तबदिली** " हे शब्द मुद्दाम वापरले आहेत ह्यांवरून असें दिसेल कीं, गहाण देणारा आपल्या मिळकतीवरील **सर्व हक्क** गहाण घेणाऱ्यांस देत नाहीं. खरेदी

मध्यें सर्व हक्क दिलेले असतात; पण गहाणामध्यें सर्व हक्क दिले जात नाहींत. अेकाद्यानें आपली मिळकत गहाण दिल्यानंतर त्या मिळकतीवरील त्याची मालकी नष्ट होत नाहीं.

**उदा०**—धोंडीरामनें आपलें घर पांचशें रुपयांस ( माधवशेटला ) दिले. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, धोंडीरामची आपल्या घरावरील मालकी नष्ट झाली. ह्याचा अर्थ इतकाच कीं पांचशे रुपयांचा बोजा ( व्याजासह ) त्या घरावर आहे. हे पांचशें रुपये ( व्याजासह ) धोंडीरामनें दिल्याबरोबर त्यांचे घर गहाणांतून मुक्त होईल.

(२) गहाणामध्यें एकादी विशिष्ट मिळकत असावी लागते. ह्याचा अर्थ असा कीं, गहाण खतामध्यें स्थावर मिळकतीचे पुरेसे वर्णन पाहिजे.

**उदा०**—मोहनसिंगनें ताराचंदला गहाण पत्र लिहून देतांना असें म्हटलें कीं, "मी तुम्हाला माझे घर गहाण दिले आहे" मोहनसिंगाची जर तीन घरें असतील तर "**माझें घर**" हें वर्णन पुरेसें नाहीं.

"**टिळक रोडवर असलेलें माझें घर**" असें म्हटलें असेल व टिळक रोडवर मोहनसिंगाचें एकच घर असेल तर तें वर्णन पुरेसें आहे.

(३) गहाणाचा उद्देश दिलेल्या कर्जाला कांहीं तरी तारण असावे हा आहे. हें कर्ज गहाण दस्ताच्या वेळीं रोख रुपयांत दिले असेल अथवा पूर्वीच्या अगर नंतर होणाऱ्या कर्जाकरितां गहाण दस्त झाला असेल अथवा ज्या करारामुळें पैशाची जबाबदारी उत्पन्न होईल असा एकादा करार करण्याकरितां तारण असावे म्हणून गहाण दस्त झाला असेल.

**उदाहरणें**—[अ] सुब्बरावनें धनशेटीला आपलें घर गहाण लिहून दिलें व धनशेटीकडून दस्ताचे वेळीं रोख पांचशें रुपये घेतले. पांचशें रुपयाचा कर्जाचा बोजा सुब्बरावच्या घरावर असल्यामुळें ह्या पांचशें रुपयांस सुब्बरावचें घर तारण आहे, असें आपणास म्हणतां येईल, ह्याचाच अर्थ धनशेटीच्या नांव जो गहाण दस्त झाला त्याचा उद्देश पांचशें रुपयाला कांहींतरी तारण असावे हा होय.

[ब] रामप्रतापनें प्रॉमीसरी नोटीवरून आण्णाप्पाला चारशें रुपये दिले होते. पुढें पैशांस कांहीतरी तारण असावे म्हणून रामप्रतापनें आण्णाप्पाकडून चारशें रुपये व त्याचें व्याज ह्याबद्दल त्याचें शेत गहाण घेतले. हें गहाण पूर्वीच्या कर्जा-बद्दल आहे असें दिसून येईल.

[क] मोहनसिंगवर दावा चालू आहे. त्या दाव्यांस त्यांस होणाऱ्या खर्चा-बद्दल त्यानें आपलें घर तारानाथला गहाण दिले. हें गहाण पूर्वीच्या कर्जाबद्दल नव्हें. अथवा गहाणाच्या वेळीं रोख रुपये दिले असेंही नव्हे, तर हें गहाण पुढें होणाऱ्या कर्जाबद्दल आहे.

[ड] बाबूनें हरीकडून पांचशें पायली तांदूळ घेतले व ते तांदूळ अेक वर्षांत दिडपट देण्याचे कबूल केले. ह्या करारांस तारण म्हणून बाबूनें आपलें तांदूळाचें शेत हरीला गहाण दिले. ह्या ठिकाणीं पैशाची जबाबदारी उत्पन्न होणाऱ्या कराराला तारण म्हणून गहाणदस्त झाला आहे, असें दिसून येईल.

---

(ज्या ज्या ठिकाणीं टी. पी. ॲक्ट असा शब्द आला असेल त्या त्या ठिकाणीं ट्रॅन्स्फर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट अर्थात मिळकत तबदील करण्याबाबत कायदा असें समजावें.)

## १२६ गहाणदस्ताचा सर्वसाधारण नमुना

गहाण दस्ताचा सर्वसाधारण नमुना असा: —

रा. रा. ... ... ... ... (गहाण घेणाराचें नांव) ह्यासीं:—

मी / आम्हीं ... ... ... ... (गहाणखत देणाऱ्यांचें नांव) तुम्हांस गहाणखत लिहून देतों ऐसाजे:—

मी / आम्हीं तुम्हांकडून आज रोजीं घरखर्चाकरितां (दुसरें कारण असल्यास तें लिहावें) अमुक रुपये दरसाल दर शेंकडा अमुक व्याज देण्याचे करारानें घेतले आहेत, ह्यांसी मुदत आजपासून......वर्षाची केली आहे.

ह्यांसी तारण गहाण म्हणून खालील मिळकत दिली आहे:—

मिळकतीचे वर्णन........................ठरलेल्या मुदतीस मी / आम्हीं तुमचे पैसे देईन / देऊं. मुदतीबाहेर पैसे राहिल्यास तें रुपये व त्याचे व्याज अशी

सर्व रक्कम तुम्हीं वरील मिळकत कोर्टामार्फत विकून वसूल करावी. कमी पडल्यास मी / आम्हीं. माझे / आमचे जातीवर देईन / देवूं. तोंडी वसुल दिल्याची तक्रार करणार नाहीं. म्हणून लिहून दिले गहाण खत. ता.........

ऋणकोची सही
अगर अंगठा

साक्षी

१..................

२..................

**टीपः**—वरील नमुना तारण गहाणदस्ताचा आहे. दस्त कबजे गहाण असल्यांस गहाण मिळकत धनकोचे कबजांत दिलेली असते. त्याप्रमाणें गहाण दस्तांत उल्लेख करणेचा असतो. व्याजाबद्दल जें कांहीं ठरले असेल ते गहाण दस्तांत लिहिणेचे असते.

## १२७ गहाणाचे भाग

**गहाणाचे एकंदर सहा भाग आहेतः—(१) तारण गहाण (२) शर्तीविक्रीचे गहाण (३) कबजे गहाण (४) इंग्लीश गहाण, (५) मालकीचे कागद ठेवून दिलेले गहाण (६) विधिविरुद्ध गहाण**

## (१) तारण गहाण

(Simple Mortgage)

जेव्हां गहाण देणारा गहाण मिळकत गहाण देणाऱ्याच्या ताब्यांत न देतां, गहाणाची रक्कम स्वतः जातीनें देण्याचे मान्य करतो व ठरलेल्या कराराप्रमाणें रक्कम न दिल्यांस गहाण मिळकत विक्रीस काढवून आपले पैसे वसूल करण्याचा अधिकार गहाण घेणाऱ्यास आहे, असे उघडपणे वा सूचितपणें कबूल करितो, तेव्हां अशा गहाणांस 'तारण गहाण' म्हणतात. (टी. पी. ॲक्ट, कलम ५८)

## तारण गहाण दस्तांत खालील गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत.

(१) गहाण देणारा गहाणाची रक्कम जातीने देण्याच कबूल करतो.

(२) गहाण मिळकत गहाण घेणाऱ्याच्या ताब्यांत दिलेली नसते.

(३) अमुक दिवसांत पैसे दिले नाहींत तर गहाण देणाऱ्याचा गहाण सोडवण्याचा हक्क नष्ट होत नाहीं. पैसे दिले नाहींत तर गहाण घेणाऱ्यांस गहाण मिळकत विक्री करवून आपले पैसे वसूल करून घेतां येतात.

(४) गहाण घेणाऱ्यानें कोर्टमार्फत मिळकतीची विक्री केली पाहिजे, व त्या पूर्वी गहाण दस्तावरुन हुकूमनामा मिळविला पाहिजे.

(५) गहाणाची रक्कम किती कां असेना ( शंभर रुपयाच्या आंत असली तरी ) गहाण दस्त नोंदविला पाहिजे.

## २ शर्तीविक्रीचे गहाण

### ( Mortgage by Conditional Sale )

जेव्हां गहाण देणारा प्रकटपणें गहाण मिळकत अशा अटीवर विकतो कीं, अमुक दिवसांत पैसे दिले नाहींत तर झालेली खरेदी कायम समजणेंत यावी, अथवा पैसे दिल्यास झालेली खरेदी रद्द समजणेंत यावी, अगर पैसे दिल्यावर खरेदीदारानें मिळकत विकणाऱ्यांस परत खरेदी करुन द्यावी. तेंव्हां अशा गहाणांस शर्ती विक्रीचे गहाण म्हणतात. मात्र खरेदीचा व्यवहार व वर दिलेली अट एकांच दस्तात असल्याशिवाय शर्तीविक्रीचे गहाण होत नाहीं. ( टी. पी. ॲक्ट कलम ५८ ).

## शर्तीविक्रीच्या गहाणांत लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी

(१) गहाण देणारा प्रकटपणें गहाण मिळकत विकतो.

(२) ही विक्री वर दिलेल्या अटीवर असते.

(३) गहाण देणाऱ्यानें पैसे दिले नाहींत तर, गहाण घेणाऱ्याला ती मिळकत कोर्ट मार्फत विकून आपले पैसे वसूल करून घेतां येत नाहींत. पैसे दिले नाहींत तर गहाण घेणाऱ्याला उपाय हाच कीं, त्यानें दावा करून गहाण देणाऱ्याचा गहाण सोडवण्याचा हक्क नष्ट झाला, असें ठरवून घेणेचें.

(४) गहाणाची रक्कम १०० रुपये अगर त्यापेक्षां जास्त असेल तर गहाण दस्त नोंदविला पाहिजे. गहाणाची रक्कम १०० रुपयांच्या आंत असेल तर मिळकत ताब्यांत दिली पाहिजे अगर गहाणदस्त नोंदविला पाहिजे.

(५) एकाच दस्तांत खरेदीचा व्यवहार व अटीचा उल्लेख पाहिजे. खरेदीचा व्यवहार एका दस्तांत व अटीबद्दलचा व्यवहार दुसऱ्या दस्तांत असेल तर तें शर्तीविक्रीचें गहाण होत नाहीं.

## ३ कबजे गहाण

### ( Usufructuary mortgage )

जेव्हां गहाण देणारा गहाण मिळकत गहाण घेणाऱ्याचे ताब्यांत देतो, अथवा प्रकटपणें वा सूचितपणें मिळकत ताब्यांत देण्याचे कबूल करतो, व गहाणाची रक्कम फिटेपर्यंत धनकोनें ( गहाण घेणाऱ्यानें ) मिळकत ताब्यांत ठेवावी, आणि व्याजाबद्दल, गहाण रकमेबद्दल, अगर मुद्दल व व्याज ह्याबद्दल मिळकतीचा उपभोग घ्यावा, असें मान्य करतो, तेव्हां अशा गहाणांस ' कबजे गहाण ' म्हणतात. ( टी. पी. ॲक्ट कलम ५८ ).

## कबजे गहाणांत लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी

(१) गहाण मिळकत गहाण घेणाऱ्याचे ताब्यांत दिली जाते.

(२) गहाण घेणाऱ्यानें रक्कम फिटेपर्यंत मिळकत ताब्यांत ठेवणेची असते, व मिळकतीचा उपभोग घेणेचा असतो.

(३) जेव्हां गहाणाची रक्कम गहाण देणारा देतो. अथवा मिळक-तीच्या उत्पन्नांतून जेव्हां गहाणाची रक्कम फिटते, तेव्हां गहाणाची फेड होते, व मिळकत गहाण घेणाऱ्याच्या परत ताब्यांत येते.

(४) गहाण घेणाऱ्याला कोर्टमार्फत मिळकत विक्री करून आपली रक्कम वसूल करून घेतां येत नाहीं; अथवा गहाण देणाऱ्याचा गहाण सोडविण्याचा हक्क नष्ट झाला अशा-बद्दलही दावा करतां येत नाहीं.

(५) गहाणची रक्कम १०० रुपये अगर त्यापेक्षां जास्त असेल, तर गहाणदस्त नोंदविला पाहिजे. गहाणाची रक्कम १०० रुपयापेक्षां कमी असेल तर गहाणदस्त नोंदवावा. अगर मिळकत गहाण घेणाऱ्याचे ताब्यांत द्यावी.

## ४ इंग्लिश गहाण

### ( English mortgage )

जेव्हां गहाण देणारा एका विशिष्ट तारखेस गहाण रक्कम देण्याचे कबूल करतो, व गहाण मिळकत गहाण घेणाऱ्याला पूर्णपणें अशा अटीवर तबदील करतो कीं, गहाण रक्कम दिल्यानंतर गहाण घेणाऱ्यानें मिळकत परत तबदील करुन द्यावी, तेंव्हां अशा गहाणांस ' इंग्लिश गहाण ' म्हणतात, (टी. पी. ॲक्ट. क ५८)

### इंग्लिश गहाणांत लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी:—

(१) ह्या गहणांत धनकोच्या ( गहाण घेणाऱ्याच्या ) ताब्यांत मिळकत दिली जाते.

(२) ऋणको ( गहाण देणरा ) गहाणाची रक्कम स्वतः देण्याचें कबूल करतो.

(३) मिळकत पूर्णपणें तबदील केली जाते, मात्र गहाणाची रक्कम दिल्यावर परत तबदील करून देण्याचा करार असतो.

(४) धनकोला मिळकत कोर्टामार्फत विकून आपले पैसे वसूल करतां येतात. ऋणकोला गहाण सोडविण्याचा हक्क नाहीं अशाबद्दल धनकोला दावा करतां येत नाहीं.

(५) कोर्टाच्या बाहेरही मिळकत विक्री करण्याचा अधिकार धनकोला कांहीं बाबतींत असतो.

## ५ मालकीचे कागद ठेवून दिलेले गहाण

**( Mortgage by deposit of Title Deeds )**

जेव्हां कलकत्ता, मद्रास, मुंबई, कराची, रंगून, मोल्मीन, वसई, कल्याण, अक्याब ह्या शहरातील एकादा मनुष्य धनकोला अथवा त्याच्या मुखत्यारांस तारण म्हणून त्यावर मिळकतीबाबत मालकीचे कागद देतो, तेव्हां अशा गहाणांस 'मालकीचे कागद ठेवून दिलेले गहाण' म्हणतात. ( टी. पी. ॲक्ट कमल ५८ ).

## ह्या गहाणाबाबत लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी:—

(१) हे गहाण कलकत्ता, मद्रास, मुंबई, कराची, रंगून, मोल्मीन, वसई, अक्याब, ह्या शहरापुरतेच लागूं आहे.

(२) कबजा न देतां मालकीचे कागदपत्र देवून हें गहाण केले जाते.

(३) पूर्वीचे कर्ज अथवा गहाणाच्या वेळीं दिलेली रक्कम अगर पुढें होणारे कर्ज ह्यांच्या तारणाकरितां हे गहाण केले जाते.

(४) हे गहाण नोंदणेची आवश्यकता नाहीं.

(५) कोर्ट मार्फत विक्री करुन धनकोला आपले पैसे वसूल करुन घेता येतात.

## ६ विधिविरुद्ध गहाण

**( Anomaolus Mortgage )**

जे गहाण तारण गहाण नाहीं, शर्तीविक्रीचे गहाण नाहीं, कबजेगहाण नाहीं, इंग्लिश गहाण नाहीं, अथवा मालकीचे कागदपत्र ठेवून केलेले गहाण नाहीं, त्या गहाणांस विधिविरुद्ध गहाण म्हणतात ( टी. पी. ॲक्ट, कमल ५८ ).

### ह्या गहाणाबाबत लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टीः—

(१) गहाणाचे जे पहिले पांच प्रकार सांगितलेले आहेत. त्या शिवाय असणाऱ्या कोणच्याही गहाणास 'विधिविरुद्ध गहाण, असें म्हणतात.'

(२) गहाणाचे जे पहिले पांच प्रकार दिले आहेत. त्यापैकीं कोणाच्याही दोन प्रकारच्या मिळून झालेल्या गहाणांस 'विधिविरुद्ध गहाण' असें म्हणतात.

उदाहरणार्थः—तारण-गहाण व कबजे-गहाण मिळून झालेल्या संयुक्त गहाणांस अथवा कबजे-गहाण व शर्तीविक्रीचे गहाण यांच्या संयुक्त गहाणास "विधिविरुद्ध गहाण" असें म्हणतात.

(३) विधिविरुद्ध गहाणांत धनकोच्या ताब्यांत कबजा दिला असेल अगर नसेल.

(४) ज्याप्रमाणें करार ठरलेला असेल त्याप्रमाणें पैसे वसूल करून घेण्याचा अधिकार धनकोला आहे.

(५) गहाणाची रक्कम शंभर रुपये अगर त्यापेक्षां जास्त असेल तर गहाणदस्त नोंदविला पाहिजे. गहाणाची रक्कम शंभर रुपयापेक्षां कमी असेल तर गहाणदस्त नोंदवून अगर कबजा देवून गहाण पुरें करतां येते.

## १२८ गहाणखत पुरें कसें करणेंचे ?

जेव्हां मुद्दल रक्कम रुपये शंभर अगर त्यापेक्षां जास्त असेल, तेव्हां मालकीचे कागदपत्र ठेवून केलेल्या गहाणाशिवाय कोणचेही गहाण पुरे करण्यांस गहाण दस्तावर ऋणकोची सही अगर आंगठा पाहिजे, व निदान दोन साक्षिदारांच्या साक्षी पाहिजेत आणि गहाणदस्त नोंदविला पाहिजे.

मुद्दल रक्कम शंभर रुपयांच्या आंत असेल तर वरीलप्रमाणें गहाण पुरें करतां येईल, तारण गहाण पुरे करतां येईल, अथवा तारण गहाण सोडून बाकीची गहाण मिळकत ताब्यांत घेवून पुरे करतां येईल.

( टि. पी. ॲक्ट ५९ ) ह्या नियमावरून असें दिसेल कीं,—

(१) तारण गहाणांतील मुद्दल शंभर रुपये अगर त्यापेक्षां जास्त असेल अगर शंभर रुपयापेक्षां कमी असेल तरी तारण गहाणदस्त नोंदविलाच पाहिजे. ह्याचा अर्थ असा कीं, तारण गहाण दस्तातील रक्कम किती कां असेना तारण गहाण दस्त नोंदविणें अवश्य आहे.

(२) इतर गहाणाच्या बाबतींत मुद्दल रक्कम शंभर रुपये अगर त्यापेक्षां जास्त असेल तर गहाणदस्त नोंदविला पाहिजे, व मुद्दल रक्कम शंभर रुपयांची असेल तर गहाणदस्त नोंदवावा अथवा मिळकत कबजांत देवून गहाणखत पुरें करावे.

(३) गहाणदस्त नोंदविणें जरुर असतांना गहाणदस्त नोंदविणें नसेल तर त्या दस्तातील रकमेचा बोजा गहाण मिळकतीवर पडणार नाहीं.

अशा गहाण दस्तातील कर्ज साधे कर्ज समजून त्याप्रमाणें हुकुमनामा करतां येईल, ( कोमाजी वि. सुब्बरायप्पा, १५ मद्रास पान २५३; राम वि० राम अय्रे, ६६ इंडियन केसेस, पान ६८०; सदू वि० साविदा, १७ मद्रास लॉ जर्नल पान १६७ ).

**उदाहरणें**:—(अ) रंगरावनें माधवशेटला नव्याण्णव रुपयाचा कबजे गहाणदस्त दिला. हा दस्त नोंदविला पाहिजे.

(ब) भोलानाथनें मेघनाथला सत्तर रुपयाचा कबजे—गहाण दस्त दिला. हा दस्त नोंदवावा अगर मिळकत ताब्यांत देवून गहाण पुरें करावे.

(क) सदाशिवनें शिवरामकडून दोनशें रुपये कर्ज काढून आपले घर त्यांस गहाण दिले, गहाण दस्त नोंदविणे जरूर असताहीं गहाण दस्त नोंदला नाहीं. हा गहाण दस्त साधा दस्त आहे, असें समजून शिवरामला दावा करतां येईल. त्या दस्ताचा बोजा सदाशिवच्या घरावर पडणार नाहीं.

# प्रकरण १९ वें स्त्रीधन

## १२९ स्त्रीधनाबाबत स्मृतिकारांच्या म्हणण्याचा इत्यर्थ काय ?

स्मृतिकारांचे विवेचन पहातां असें दिसतें कीं, त्यांनीं स्त्रीधन हा शब्द मर्यादित अर्थानें वापरला आहे. स्त्रीची कोणचीही मिळकत ह्याअर्थी त्यांनीं तो शब्द वापरलेला दिसत नाहीं, कारण तसें असते तर स्त्रीधन म्हणजे काय ह्याचें वर्णन करतांना त्यांनीं केवळ कांहीं विशिष्ट मिळकतीचाच अंतर्भाव स्त्रीधनांत केला नसता. याज्ञवल्क्यानें 'आद्य' (इत्यादि) हा शब्द वापरला आहे, त्यामुळें आणखीही कांहीं मिळकतींचा अंतर्भाव स्त्रीधनांत करणे शक्य आहे, पण अर्थ करण्याचें सर्वसाधारण नियम ठरलेले आहेत त्यावरून आपणांस असें मानावें लागेल कीं, 'आद्य' शब्दामुळें ज्या गोष्टीचा अंतर्भाव करावयाचा त्या गोष्टी पूर्वी सांगितलेल्या गोष्टींच्या सद्दश असल्या पाहिजेत.

### स्मृतिकारांच्या मतें स्त्रीधन म्हणजे —

(अ) नातलगांपासून स्त्रीला मिळालेल्या देणग्या.

(ब) वस्त्रभूषणें

(क) परक्या माणसांनीं विवाहाच्या वेळीं अग्निजवळ अथवा वरातीच्या वेळीं दिलेल्या देणग्या.

**स्मृतिकारांच्या मतें—**

(अ) परक्या माणसांनीं वर सांगितलेल्या दोन वेळेपेक्षां इतर वेळां दिलेल्या देणग्या स्त्रीधन होत नाहींत.

(ब) स्वतःच्या श्रमानें व कौशल्यानें स्त्रीनें मिळविलेली मिळकत स्त्रीधन होत नाहीं.

(क) स्त्रीधनाचा अर्थ वर सांगितल्याप्रमाणें मर्यादित आहे, या व्यतिरिक्त जी स्त्रीची मिळकत असेल ती स्त्रीधन होत नाहीं.

हल्लींच्या समान हक्काच्या हिशेबांत पहावयाचें झाल्यास स्त्रियांच्या हक्कावरील हीं बंधनें आपणाला चमत्कारीक वाटतील, पण परवां परवां पर्यंत इंग्लिश कायद्या-मध्यें सुद्धां मिळकतीच्या बाबतींत स्त्रियांवर ह्यापेक्षां कडक बंधनें होतीं, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे इतक्या प्राचीन काळीं स्मृतिकारांनीं घातलेलीं बंधनें त्या-वेळच्या कालमानाप्रमाणें चमत्कारिक वा कडक नव्हती असेंच आपणांस म्हणावे लागेल.

## १३० न्यायश्रेष्टींनीं स्त्रीधनाचा अर्थ व्यापक केला काय ?

स्मृतिकारांनीं स्त्रीधनाचा अर्थ व्यापक न करतां मर्यादित केला; पण टीका-कारांनीं—विशेषतः विज्ञानेश्वरानें, स्त्रीधनाचा व्यापक अर्थ करण्याचा प्रयत्न केला. (१) हिंदु कायद्याप्रमाणें स्त्रीधनाचा विचार करतांना टीकाकार काय म्हणतात तेंच मत कोर्टानें स्वीकारलें पाहिजे. (२) कोर्टानें स्वतःच्या चष्म्यांतून न पाहतां टीकाकारांच्या चष्म्यांतून स्मृति ग्रंथाकडे पाहिलें पाहिजे, (३) स्मृतिग्रंथ हें धर्म-ग्रंथ असले तर टीकाग्रंथ हे आचारग्रंथ आहेत, व हिंदु कायद्यामध्यें धर्मापेक्षां आचार चलवत्तर असल्यामुळें कोर्टामध्यें स्मृतिग्रंथापेक्षां टीकाग्रंथाला जास्त किंमत आहे, हीं तत्त्वें सर्व मान्य आहेत. ह्या सर्व मान्य तत्त्वाप्रमाणें पाहतां मिताक्षरामध्यें स्त्रीधनाचा केलेला व्यापक अर्थ प्रिव्हि कौन्सिलनें मान्य करावयास पाहिजे होता. जर कदाचित् स्त्रीधनाचा व्यापक अर्थ प्रिव्हि कौन्सिलनें मान्य केला असतां तर अनायासें स्त्रियांना किती तरी अधिकार मिळाले असते. पण दुःखाची गोष्ट अशी कीं, प्रिव्हीकौन्सिलनें व्यापक अर्थ मान्य न केल्यामुळें मिताक्षरामध्यें स्त्रीधनाचा कितीही व्यापक अर्थ असला तरी कोर्टामध्यें आपणांस प्रिव्हिकौन्सिलच्या मताबाहेर जातां येणार नाहीं. मिताक्षरामध्यें असें म्हटलें आहे कीं, वारसानें आलेली मिळकत अगर वाटणीनें आलेली मिळकत स्त्रीधन होय; ह्या बाबतींत प्रिव्हि कौन्सिलचें मत काय आहे, तें आपण पाहूं.

## १३१ प्रिव्हि कौन्सिलचा ठरावाचा इत्यर्थ

नातलगांनीं दिलेल्या देणग्या व परक्या गृहस्थानीं विवाहाच्या वेळीं अग्नि-जवळ वरातीच्यावेळीं दिलेल्या देणग्या म्हणजे स्त्रीधन अशाप्रकारें स्मृतिकारांनीं

स्त्रीधनाची व्याख्या मर्यादित केली. ही मर्यादित व्याख्या व्यापक करण्याचा एक प्रयत्न म्हणून असें ठरविण्यांत आले कीं कुमारपणीं व विधवेपर्णी स्त्रीला मिळालेल्या देणग्या–मग त्या परक्या गृहस्थानी दिलेल्या असल्या तरी—स्त्रीधन होत. ही गोष्ट सर्व शाखा उपशाखांना मान्य आहे. मिताक्षरानें मात्र एक लांब उडी घेऊन असें प्रतिपादन केलें कीं, स्त्रिला मिळालेली कोणचीही मिळकत स्त्रीधन होय. प्रिव्हि कौन्सिलनें मात्र मिताक्षराचा जवळ जवळ सगळा जोर नाहींसा करून असें ठरविलें कीं, स्त्रीला वाटणीनें अगर वारसानें आलेली मिळकत स्त्रीधन होत नाहीं. प्रिव्हि कौन्सिलचा ह्या ठरावामुळें असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, मिताक्षरामध्यें 'आद्य' शब्दाचा फायदा घेऊन स्त्रीधनाची व्याप्ति वाढविण्याचा जितका प्रयत्न झाला तितकी जवळ जवळ फुकट गेला.

## १३२ कुमारपणीं स्त्रियांचे अधिकार

कुमारपणी स्त्रीधनावर स्त्रियांचा पूर्ण अधिकार आहे. आपल्या मर्जीनुरूप स्त्रीधनाचा वाटेल त्याप्रमाणें उपभोग घेण्याचा अथवा आपल्या इच्छेनुसार वाटेल त्याप्रमाणें गहाण-दान खरेदी करण्याचा कुमारिकेला पूर्ण अधिकार आहे. कुमारपणीं स्त्रीधनावरील स्त्रियांच्या अधिकाराबाबत कोणाचेही बंधन घालण्यांत आलेलें नाहीं.

अशी परिस्थिती असतांना देखील कायद्यानें एक बंधन निर्माण होते. तें हें कीं, अज्ञान मनुष्यांस आपल्या मिळकतीची विल्हेवाट करण्याचा अधिकार नसल्यामुळें एखादि कुमारिका अज्ञान असेल तर आपले स्त्रीधन तबदील करण्याचा अधिकार तिला मिळणार नाहीं. सज्ञान कुमारिकेला मात्र आपल्या स्त्रीधनाची वाटेल त्याप्रमाणें विल्हेवाट करण्याचा संपूर्ण अधिकार आहे.

मधुकरूपा पिलाई वि० शेलथमल ( ३९ मद्रास पान २९८ ) या कज्यांत एका स्त्रीला तिचें लग्न होण्यापूर्वी तिच्या बापानें कांहीं मिळकत दिली होती. पुढें तिनें ती मिळकत विकून टाकली. तिच्या नवऱ्यानें असा दावा आणला कीं, आपल्या बायकोनें केलेली विक्री निरुपयोगी आहे असें ठरवून मिळावे. बापानें आपल्या मुलीला तिच्या लग्नापूर्वी दिलेली मिळकत सौदायिक स्त्रीधन होते व त्यावर मुलीचा पूर्ण अधिकार असल्यामुळें झालेली विक्री कायदेशीर आहे, असें कोर्टानें ठरवून वादीचा दावा रद्द केला.

## १३३ नवरा हयात असतांना स्त्रियांचे अधिकार

नवरा हयात असतांना स्त्रीधनावर स्त्रियांचा काय अधिकार आहे हें स्त्रीधनाच्या स्वरुपावर अवलंबून असते. या करितां स्त्रीधनाचे दोन भाग केलेले आहेत.

( १ ) सौदायिक स्त्रीधन, व ( २ ) असौदायिक स्त्रीधन

सौदायिक स्त्रीधन ह्याचा अर्थ स्त्रीला प्रेमाखातर दिलेली देणगी. कायद्याच्या भाषेंत बोलावयाचे झाल्यास सौदायिक स्त्रीधन म्हणजे नातलगापासून स्त्रीला मिळालेली देणगी. असौदायिक स्त्रीधन म्हणजे जे सौदायिक स्त्रीधन नव्हें तें. उदा०— परक्या गृहस्थापासून स्त्रीला मिळालेली देणगी, स्त्रीनें कलाकौशल्यानें मिळविलेली मिळकत इत्यादि.

सौदायिक स्त्रीधनावर स्त्रियांचा पूर्ण अधिकार आहे. नवऱ्याच्या संमतीशिवाय असें स्त्रीधन विक्री करण्याचा वा दान करण्याचा वा वाटेल त्याप्रमाणें उपभोग घेण्याचा स्त्रियांना पूर्ण अधिकार आहे. सौदायिक स्त्रीधनावर नवऱ्याचा काडीमात्र अधिकार नाहीं; मात्र आपत्कालांत ( उदा०:— दुष्काळांत, आजारीपणांत अगर शिक्षेच्यावेळीं ) असें स्त्रीधन स्वतःच्या उपयोगाकरितां घेण्याचा नवऱ्याला अधिकार आहे. हा अधिकार केवळ नवऱ्याकरतांच मर्यादित आहे. नवऱ्यानें जर आपत्कालीं अशा स्त्रीधनाचा उपयोग केला नाहीं तर त्याच्या सावकारांना त्याच्या देण्याकरितां तें स्त्रीधन घेतां येणार नाहीं.

असौदायिक स्त्रीधनावर स्त्रीचा अधिकार नसून नवऱ्याचा अधिकार असतो. नवऱ्याच्या संमतिशिवाय अशा स्त्रीधनाची वाटेल त्या प्रमाणें विल्हेवाट करण्याचा अधिकार स्त्रीला नाहीं. आपत्काल नसतांना सुद्धां आपल्या इच्छेनुसार असें स्त्रीधन उपभोगण्याचा नवऱ्याला संपूर्ण अधिकार आहे.

**भाऊ वि० रघुनाथ ( ३० मुंबई पान २२९ )**

ह्या कज्यांत असें म्हटलें आहे कीं,—

" सौदायिक स्त्रीधन म्हणजे तें कीं जें विवाहित स्त्रीला अथवा कुमारिकेला आपल्या नवऱ्याच्या घरांत अथवा आपल्या बापाच्या घरांत, आपल्या भावापासून

अथवा आपल्या आईबापापासून मिळालेलें असतें. सौदायिक स्त्रीधनाशिवाय इतर स्त्रीधनावर नवरा हयात असतांना त्याचा ताबा असतो. नवऱ्याच्या संमति शिवाय असें स्त्रीधन मृत्युपत्रानें दुसऱ्याला देण्याचा अधिकार स्त्रीला नाहीं. "

**बादशहा वि० सतनारायण** ( ५२ अलहाबाद पान ४३७ ) या कज्यांत विनायक नांवाच्या एका माणसानें आपली बायको रामकाली व तिचा स्नेही सत्नारायण यांच्यावर चोरीची फिर्याद केली. आपण कांहीं मिळकत सत्नारायणला दिली हें रामकालीनें कबूल केलें व सत्नारायणनें सुद्धां असें कबूल केलें कीं, आपण कांहीं मिळकत रामकालीपासून घेतली व तिच्या करित दुसऱ्याकडे गहाण ठेवली. खालच्या कोर्टांत दोघाही आरोपींनीं आपला गुन्हा कबूल केल्यामुळें कोर्टानें दोघाही आरोपीना शिक्षा दिली. हायकोर्टानें असें ठरविलें कीं, हिंदु स्त्रीला तिच्या नवऱ्यानें, आईनें अथवा इतर नातलगांनीं दिलेली मिळकत सौदायिक स्त्रीधन होत असल्यामुळें व अशा मिळकतीवर त्या स्त्रीचा संपूर्ण अधिकार असल्यामुळें कोणच्याही हिंदु नवऱ्याला अशा मिळकतींबाबत आपल्या बायकोवर चोरीची फिर्याद करतां येणार नाहीं. जरी रामकाली व सत्नारायण ह्यांनीं गुन्हा कबूल केला असला तरी चोरीची मिळकत ही रामकालीची सौदायिक स्त्रीधन आहे व ह्या मिळकतीवर विनायकाचा कांहीं अधिकार नाहीं. ही गोष्ट अथवा हें कायद्याचें ज्ञान रामकाली व सत्नारायण यांना माहित नव्हतें. अशा परिस्थितींत गुन्हा जरी कबूल केला तरी त्यावरून शिक्षा देतां येणार नाहीं. ही विचारसरणी पुढें मांडून अलहाबाद हायकोर्टानें रामकाली व सत्नारायण या दोघांनाहि निर्दोषी ठरविलें.

**नमलवार चेट्टी वि० नायर अंमल** ( ५० मद्रास पान ९४१ )

या कज्यांत असें प्रतिपादिलें आहे कीं:—

" याज्ञवल्क्यानें असें म्हटलें आहे कीं, दुष्काळांत, धर्मकार्याकरितां, आजारीपणांत अथवा शिक्षेच्यावेळीं नवऱ्यानें घेतलेले ( गृहीतम् ) स्त्रीधन आपल्या बायकोला परत देण्याचें कारण नाहीं. ह्या वाक्यांत " घेतलेले " ह्याचा अर्थ " घेतलेले व उपयोगांत आणलेलें " असा आहे. जर वर सांगितलेल्या परिस्थितींत नवऱ्यानें

आपल्या बायकोचें स्त्रीधन घेतलें पण त्याचा प्रत्यक्ष उपयोग केला नाहीं तर अशा स्त्रीधनावर बायकोचीच मालकी राहते."

## १३४ विधवेपणीं स्त्रियांचे अधिकार

स्त्रीधनावर विधवेचा संपूर्ण अधिकार आहे. स्त्रीधन सौदायिक असो वा असौदायिक असो, तें नवरा हयात असतांना मिळालेलें असो वा नवरा मयत झाल्यावर मिळालेलें असो—कोणच्याही प्रकारचे स्त्रीधन आपल्या इच्छेनुसार उपभोगण्याचा अथवा आपल्या मर्जीनुरुप गहाण, दान, विक्री करण्याचा विधवेला संपूर्ण अधिकार आहे.

**व्यॅंकटरामा वि० व्यॅंकट सुरीया** ( १ मद्रास पान २८९ ) या कज्यांत एका हिंदु स्त्रीला तिच्या नवऱ्यानें कांहीं जंगम मिळकत दिली होती. नवऱ्याच्या पश्चात तिनें ती मिळकत व आपलें स्वतःचे कांहीं स्त्रीधन ह्यांच्या योगानें स्थावर मिळकत विकत घेतली. प्रश्न असा उत्पन्न झाला कीं, ही स्थावर मिळकत स्त्रीधन या सदरांत येते कां व अशा मिळकतीची मृत्युपत्रानें विल्हेवाट करण्याचा अधिकार त्या स्त्रीला आहे कां? मद्रास हायकोर्टानें या प्रश्नाचे अस्ति पक्ष उत्तर दिलें. स्मृतिकारांनीं असें म्हटलें आहे कीं नवऱ्यानें जी स्थावर मिळकत दिली असेल ती विल्हेवाट करण्याचा विधवेला अधिकार नाहीं, पण हें तत्त्व कोर्टानें मान्य केलें नाहीं. नवऱ्यानें स्थावर मिळकतीची संपूर्ण मालकी आपल्या पत्नीस दिली असेल तर नवरा हयात असतांना अगर नवऱ्याचें पश्चात् अशा मिळकतीची विल्हेवाट करण्याचा अधिकार तिला आहे ( शालिगराम वि. वारंजितलाल प्रिव्हि कौन्सिल ३४ कलकत्ता वुईकली नोटस पान १०७३ )

## १३५ मिताक्षरीप्रमाणें स्त्रीधनाचा वारसा

वारसाक्रम ठरवितांना मिताक्षरीमंध्यें स्त्रीधनाचे दोन भाग केले आहेत.

(१) **शुल्क**—ज्या रकमेकरितां अगर मिळकतीकरितां वधूचें दान केलें जातें, ती रक्कम अगर ती मिळकत.

**(२) इतर प्रकारचे स्त्रीधन.**

**(१) शुल्काचा वारसाक्रम असा :—**

(१) सख्खा भाऊ, (२) आई, (३) बाप, (४) बापाचे वारस.

**(२) इतर प्रकारच्या स्त्रीधनाचा वारसाक्रम असाः—**

(१) अविवाहित मुलगी. (२) विवाहित मुलगी ( जी अप्रतिष्ठित आहे वा गरीब आहे ती ), (३) विवाहित मुलगी– जा गरीब नाहीं ती, (४) मुलीची मुलगी, (५) मुलीचा मुलगा, (६) मुलगा. (७) मुलाचा मुलगा.

**स्त्रीचा विवाह शिष्टत-हेने** (ब्राम्हादि चार प्रकार) **झाला असल्यास–**

(८) नवरा, (९) नवऱ्याचे वारस.

**स्त्रीचा विवाह अशिष्टत-हेनें** (आसुरादि चार प्रकार) **झाला असल्यासः–**

(८) आई, (९) बाप, (१०) बापाचे वारस.

**टीप नं. १:**— नवऱ्याचे वारस, असें जें वर म्हटलें आहे, त्यांचा क्रम असा:—

(१) नवऱ्याच्या दुसऱ्या बायकोचा मुलगा, ( ज्या स्त्रीच्या स्त्रीधनाचा वारसा पाहणेचा आहे तिचा सावत्र मुलगा ) (२) नवऱ्याच्या दुसऱ्या बायकोचा नातू ( मुलाचा मुलगा ); (३) नवऱ्याच्या दुसऱ्या बायकोचा पणतु; (४) नवऱ्याच्या दुसऱ्या बायका. (५) नवऱ्याच्या दुसऱ्या बायकोची मुलगी; (६) नवऱ्याच्या दुसऱ्या बायकोच्या मुलीचा मुलगा, (७) नवऱ्याची आई; (८) नवऱ्याचा बाप; (९) नवऱ्याचा भाऊ वगैरे.

**टीप नं.** २:–बापाचे वारस असें जें वर म्हटले आहे, त्यांचा वारसाक्रम असा:–

(१) बापा नंतर त्या स्त्रीचा भाऊ, (२) तिच्या भावाचा मुलगा; (३) तिची सावत्र आई; (४) तिची बहीण; (५) तिच्या बहिणीची मुलगा; (६) तिची आजी वगैरे.

## १३६ मुंबई शाखा

मुंबई, गुजराथ व उत्तर कोंकण ह्यांत मिताक्षरी ग्रंथापेक्षां निळकंठानें लिहिलेल्या व्यवहार-मयूखाला विशेष किंमत आहे; मुंबई इलाख्यांतील इतर प्रांतात

मिताक्षराचें विशेष प्राबल्य आहे. मिताक्षरीप्रमाणें स्त्रीधनाचा वारसा व मयूखाप्रमाणें स्त्रीधनाचा वारसा ह्यांत अंतर आहे. ह्याचा परिणाम असा .कीं, वर दिलेल्या तीन प्रांतात मयूखाप्रमाणें स्त्रीधनाचा वारसाक्रम ठरविण्यांत येतो, व मुंबई इलाख्यांतील इतर प्रांतात मिताक्षरीप्रमाणें स्त्रीधनाचा वारसाक्रम ठरविण्यांत येतो.

## १३७ मयूखाप्रमाणें स्त्रीधनाचा वारसाक्रम

वारसाक्रमाच्या बाबतीत मयूखानें स्त्रीधनाचे दोन भाग केले आहेत.—

(१) पारिभाषिक स्त्रीधन व (२) अपारिभाषिक स्त्रीधन.

पारिभाषिक स्त्रीधन म्हणजे नातलगांनीं दिलेल्या देणग्या व परक्या गृहस्थांनीं विवाह–अग्निजवळ व वरातीच्या वेळीं दिलेल्या देणग्या. अपारिभाषिक स्त्रीधन म्हणजे जें पारिभाषिक स्त्रीधन नाहीं असें स्त्रीधन—

उदाहरणार्थः—वारसाहक्कानें आलेली मिळकत ( स्त्रीधन ह्या सदरांत येणारी ) स्त्रीनें स्वतः मिळविलेली मिळकत, पोटगीकरितां दिलेली मिळकत, परक्या गृहस्थांनीं विवाह-अग्नीच्या वेळीं अगर वरातीच्या वेळीं, ह्याच्याशिवाय इतर वेळीं दिलेली मिळकत वगैरे.

स्त्रीधनाचा वारसा ठरवितांना मयूखानें पारिभाषिक स्त्रीधनाचे चार भाग केले आहेत—

(१) **शुल्कः**—-शुल्क म्हणजे घरगुती भांडींकुंडीं, वाहन, दुभती जनावरें दागिने, ह्यांच्या किंमतीबद्दल मिळालेली मिळकत, ( कात्यायन )

(२) **यौतक**—यौतक म्हणजे विवाहाच्या वेळीं नवरा–बायको एका आसनावर असतांना मिळालेल्या देणग्या.

(३) **भर्तृदत्त व अन्वधिक**--भर्तृदत्त म्हणजे नवऱ्यानें दिलेली मिळकत. अन्वाधेयक म्हणजे लग्नानंतर नवऱ्याच्या अगर पित्याच्या नातलगांनीं दिलेल्या देणग्या.

(४) **इतर प्रकारचे पारिभाषिक**--ह्यामध्यें वर दिलेल्या तीन प्रकारांशिवाय इतर पारिभाषिक स्त्रीधनाचा समावेश होतो.

## १३८ वारसाक्रमाचे पांच प्रकार

मयूखानें स्त्रीधनाचे पारिभाषिक स्त्रीधन व अपारिभाषीक स्त्रीधन असे दोन भाग पाडले व पारिभाषिक स्त्रीधनाचे चार भाग पाडले. या प्रत्येक भागा-करितां वेगळा वारसाक्रम सांगितला असल्यामुळें मयूखाप्रमाणें स्त्रीधनाच्या वारसा-क्रमाचे पांच प्रकार होतात.

(१) **शुल्क:**—शुल्काच्या बाबतीत वारसाक्रम खालील प्रमाणें आहे:—

(१) सख्खा भाऊ. (२) आई. सख्खा भाऊ अगर आई नसेल तर; (३) बाप; (४) बापाचे वारस.

(२) **यौतक:**—मनूनें असें म्हटलें आहे कीं, आईची जी मिळकत यौतक ह्या सदरांत येत असेल ती अविवाहित मुलींनी घेणेची आहे, (पहा–उतारा नं. २)

यौतकाच्या बाबतीत मयूखानें हाच नियम मान्य केला आहे; पण अविवाहित मुली नसतील तर वारसा कुणाकडे जातो ह्याबद्दल मात्र मुग्धता स्वीकारली आहे. तज्ञांच्या मतें यौतकाचा वारसाक्रम खालील प्रमाणें आहे.

(१) अविवाहित मुलगी; (२) विवाहित मुलगी–जिची आर्थिक परिस्थिती बरी आहे, (४) मुलीची मुलगी; (५) मुलीचा मुलगा; (६) मुलगा; (७) मुलाचा मुलगा. ह्यांच्या अभावी—

स्त्रीचा विवाह ‘शिष्टसंमत विवाह’ असेल तर —

(८) नवरा, (९) नवऱ्याचे वारस

स्त्रीचा विवाह “ शिष्टसंमत विवाह ” नसेल तर—

(८) आई, (९) बाप; (१०) बापाचे वारस.

**टीप**—हिंदू कायद्याप्रमाणें विवाह आठ प्रकारचे आहेत—(१) ब्राम्ह (२) दैव, (३) आर्ष, (४) प्राजापत्य, (५) आसुर, (६) गांधर्व (७) राक्षस व (८) पैशाच. पहिले चार प्रकारचे विवाह ‘ शिष्टसंमत ’ विवाह आहेत, बाकीचे चार प्रकारचे विवाह ‘ शिष्टसंमत ’ नाहींत.

**(३) भर्तृदत्त व अन्वाधेयक**--मनूनें असें म्हटलें आहे:--

" आई मयत झाल्यावर आईची मिळकत सख्खे भाऊ व सख्या बहिणी ह्यांनीं सारखी वांटून घ्यावी. "

विज्ञानेश्वराच्या मतें भाऊ व बहिणी यांनीं मिळकत सारखी वांटून घ्यावी असा त्याचा अर्थ नव्हे; तर पहिल्यांदा बहिणींनीं मिळकत घ्यावी, मग भावांनीं घ्यावी. मात्र बहिणी अगर भाऊ ह्यांच्यामध्यें मिळकत वाटतांना ती सारख्या प्रमाणांत वाटावी. विज्ञानेश्वराचा हा अर्थ निळकंठास मान्य नाहीं.

**निळकंठाची मतें**-त्याच्या मतें अविवाहीत मुली व मुलगे ह्यांनीं मिळकत सारखी वांटून घ्यावी व अविवाहीत मुली नसतील तर विवाहित मुली व मुलगे ह्यांनीं मिळकत सारखीं वांटून घ्यावी.

भर्तृदत्त व अन्वाधेयक ह्या बाबतींत मयूखाप्रमाणें वारसाक्रम असा आहे: —

(१) अविवाहीत मुली व मुलगे--सारख्या प्रमाणांत, (२) विवाहित मुली व मुलगे सारख्या प्रमाणांत, (३) मुलीच्या मुली व मुलगे, (४) मुलाचे मुलगे.

त्यांच्या अभावी—

स्त्रीचा विवाह ' शिष्टसंमत ' असेल तर—

(५) नवरा, (६) नवऱ्याचे वारस.

स्त्रीचा विवाह ' शिष्टसंमत ' नसेल तर—

(५) आई, (६) बाप, (७) बापाचे वारस.

**(४) इतर प्रकारचे पारिभाषिक:—**

ह्या बाबतींत मयूखाप्रमाणें स्त्रीधनाचा वारसाक्रम असा—

(१) अविवाहित मुली, (२) विवाहित मुली—ज्यांची आर्थिक परिस्थिति बरी नाहीं, (३) विवाहित मुली ज्यांची आर्थिक परिस्थिती बरी आहे, (४) मुलीच्या मुली व मुलीचे मुलगे, (५) मुलगे, (६) मुलाचे मुलगे

त्यांच्या अभावी--

स्त्रीचा विवाह " शिष्टसंमत " असेल तर--

(७) नवरा, (८) नवऱ्याचे वारस,

स्त्रीचा विवाह " शिष्टसंमत " नसेल तर--

(७) आई (८) बाप (९) बापाचे वारस,

**(५) अपारिभाषिक**--अपारिभाषिक स्त्रीधन म्हणजे जें पारिभाषिक स्त्रीधन नाहीं तें, ह्याचे बाबतींत मयूखाप्रमाणें वारसाक्रम असा--

(१) मुलगे, (२) मुलाचे मुलगे, (३) मुलाचे नातु ( मुलाच्या मुलाचे मुलगे ) (४) मुली, (५) मुलींचे मुलगे (६) मुलीच्या मुली,

त्यांच्या अभावी--

स्त्रीचा विवाह " शिष्टसंमत " असेल तर—

(७) नवरा, (८) नवऱ्याचे वारस.

स्त्रीचा विवाह " शिष्टसंमत " नसेल तर–

(७) आई, (८) बाप, (९) बापाचे वारस.

# प्रकरण २० वें

## १३९ देशमूख कायदा

### कलमें

**ज्या अर्थी मिळकती संबंधी हिंदु स्त्रियांना जास्त हक्क देण्याकरितां हिंदु कायद्यामध्यें दुरुस्ती करणें उचित आहे त्या अर्थी—**

असा कायदा करण्यांत येतो कीं,—

**कलम १ नांव व विस्तार**—(१) ह्या कायद्याला "मिळकती संबंधी हिंदु स्त्रियांच्या हक्काबावत कायदा १९३७" असें संबोधण्यांत यावें.

(२) हा कायदा सर्व ब्रिटिश हिंदुस्थानास लागूं आहे.

**कलम २ व्याप्ति**--मृत्युपत्र न करतां एखादा हिंदु मयत झाला तर हिंदु कायद्याचा नियम अगर प्रघात विरुद्ध असला तरी, ह्या कायद्याच्या कलम तीन मध्यें सांगितलेले नियम लागूं होतील--

**कलम ३ मिळकतीचा वारसा :—**(१) जेव्हां हिंदु कायद्याच्या दायभाग शाखेचे नियम लागूं असणारा एखादा हिंदु, मृत्युपत्र न करतां मयत होतो, व पाठीमागें त्याची कोणतीहि मिळकत शिल्लक राहते; आणि जेव्हां हिंदु कायद्याच्या इतर शाखेचे नियम अथवा रुढीच्या कायद्याचे नियम लागूं असणारा एखादा हिंदु मृत्युपत्र न करतां मयत होतो, व पाठीमागें त्याची स्वतंत्र मिळकत शिल्लक राहते; तेव्हां त्याच्या विधवा बायकोस, अथवा एकापेक्षां अधिक बायका असतील तर सर्व विधवा बायकांना मिळून—खालील पोट कलम (३) मधील नियमास अनुसरून, ज्या मिळकतीबाबत त्यानें मृत्युपत्र केलें नसेल त्या मिळकतीपुरतां मुलाइतकाच हिस्सा मिळेल.

मात्र, आधीं मेलेल्या मुलाच्या बायकोस, आधीं मेलेल्या मुलाचा मुलगा हयात नसल्यास, मुलाप्रमाणेंच वारसा मिळेल, व आधीं मेलेल्या मुलाचा मुलगा अथवा मुलाचा मुलगा हयात असल्यास, आधीं मेलेल्या मुलाच्या बायकोस मुलाच्या मुलाप्रमाणें वारसा मिळेल. हाच नियम पूर्वमृत (आधीं मेलेल्या) मुलाच्या पूर्वमृत मुलाच्या बायकोस लागूं आहे.

(२) जेव्हां दायभाग शाखेशिवाय हिंदु कायद्याच्या इतर शाखेचे नियम लागूं असणारा, अथवा रुढीच्या कायद्याचे नियम लागूं असणारा, एखादा हिंदू मयत होतो, व मरणाच्या वेळीं एकत्र हिंदु कुटुंबाच्या मिळकतीमध्यें त्याचे हितसंबंध असतात, तेव्हां अशा मिळकतीमध्यें त्याचे जे हितसंबंध असतील ते, त्याच्या बायकोस,—पोटकलम (३) मधील नियमास अनुसरून मिळतात.

(३) ह्या कलमाप्रमाणें हिंदु विधवेला मिळणारे अधिकार मर्यादित स्वरुपाचे असतात—हिंदुस्त्रीला स्त्रीधन नसणाऱ्या मिळकतीमध्यें हयातीपर्यंत मर्यादित मालकी असते. त्याच स्वरुपाचे हें अधिकार असतात, मात्र हिंदु विधवेला पुरुषाप्रमाणेंच वाटणी मागण्याचा अधिकार मिळेल.

(४) रुढीच्या कायद्याप्रमाणें अगर इतर कोणच्याही नियमाप्रमाणें ज्या मिळकतीचा वारसा एकाच मनुष्याकडे जातो अशा मिळकतीस, अथवा इंडियन सक्सेशन ॲक्ट लागूं असणाऱ्या मिळकतीस कलम ३ लागूं नाहीं.

**कलम ४ अपवाद**—हा कायदा सुरूं होणेपूर्वी कोणताही हिंदु मृत्युपत्र न करतां मयत झाला असल्यास त्याच्या मिळकतीस हा कायदा लागूं होणार नाहीं.

**कलम ५ "मृत्युपत्र न करतां मयत होणें" ह्याचा अर्थ**—ज्या ज्या मिळकतीच्या बाबतींत चालूं शकेल अशा तऱ्हेचें मृत्युपत्र मयत माणसानें केलें नसेल त्या सर्व मिळकतीबाबत मृत्युपत्र न करतां तो मेला असें, ह्या कायद्यापुरतें मानण्यांत येईल.

## १४० ह्या कायद्याचा मतितार्थ

स्वतंत्र मिळकतीच्या बाबतींत मुलाबरोबर विधवा बायकोला हिस्सा देण्यांत आला आहे, (ब) स्वतंत्र मिळकतीमध्यें, पूर्वमृत मुलाच्या बायकोस, पूर्वमृत मुलाचा मुलगा जिवंत नसल्यास मुलाप्रमाणें वारसा देण्यांत आला आहे; (क) स्वतंत्र मिळकतीमध्यें पूर्वमृत मुलाच्या बायकोस, पूर्वमृत मुलाचा मुलगा अगर नातु (मुलाचा मुलगा) जिवंत असल्यास, मुलाच्या मुलाप्रमाणें वारसा देण्य त आला आहे. (ड) हेच नियम पूर्वमृत मुलाच्या बायकोस लागूं आहेत; (ई) मिताक्षरी एकत्र कुटुंबामध्यें विधवा बायकोस नवऱ्याचें स्थान दिलें आहे; (फ) हा कायदा पूर्वकाल सापेक्ष नाहीं. हा कायदा सुरु होणेपूर्वी एखादा हिंदु मृत्युपत्र न करतां मयत झाल्यास त्याच्या मिळकतीस हा कायदा लागूं नाहीं. (ज) विधवा बायको, पूर्वमृत मुलाची बायको, आणि पूर्वमृत मुलाच्या व मृत मुलाची बायको, ह्यांना मिळणारी मालकी ही मर्यादित मालकी आहे; (ह) हिंदु विधवेला पुरुषाप्रमाणेंच वाटणी मागणेचा अधिकार देण्यांत आला आहे.

## १४१ मर्यादित मालकी

विधवा बायको, पूर्वमृत मुलाची बायको व पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलाची ायको ह्याना मिळणारी मालकी मर्यादित स्वरूपाची असते, असें ह्या कायद्यांत सांगण्यांत आलें आहे व हा कायदा कोणताही प्रघात अगर हिंदु कायद्याचा कोणच्याही नियमा विरुद्ध असतांनाहि लागूं करणेचा असल्यामुळें कांहीं कांहीं स्त्रियांचे अधिकार

ह्या कायद्यानें कमी करण्यांत आले आहेत. प्रघातामुळें नवऱ्याची इस्टेट पूर्णमालकी हक्कानें मिळवणारी जैन विधवा ह्या कायद्यामुळें नवऱ्याच्या इस्टेटीची पूर्ण मालक होणार नाहीं.

तिला सुद्धां मर्यादित मालकी मिळेल. मिथिलेमध्यें नवऱ्याच्या जंगम मिळकती पुरती संपूर्ण मालकी विधवेस मिळते; पण ह्या कायद्यामुळें ती मालकी मर्यादित स्वरूपाची राहील. ह्या कायद्यामध्यें आरंभीं असें म्हटले आहे—"**ज्या अर्थी मिळकतीबाबत हिंदु स्त्रियांना जास्त हक्क देण्याकरितां हिंदु कायद्यामध्यें दुरुस्ती करणे उचित आहे, त्या अर्थी असा कायदा करण्यांत यतो कीं**, वर सांगितलेलीं उदाहरणें पाहिली म्हणजे असें म्हणावें लागेल कीं, ह्या स्त्रियांच्या बाबतींत नवीन कायद्यानें हक्कामध्यें छाट केलेली आहे. कायदा करताना कदाचित् ह्या गोष्टी लक्षात आल्या नसतील.

## १४२ एकत्र कुटुंबी स्वरूप

ह्या कायद्यानें विधवेला नवऱ्याची जागा देण्यांत आली व तिला वांटणी मागण्याचा अधिकार दिला, कांहीं लोक असा प्रश्न विचारतात कीं; "विधवा व दीर ह्यांच्या मध्यें एकत्र कुटुंबी स्वरूप राहूं शकेल काय ? कां नवऱ्याच्या पश्चात् त्याची विधवा वायको ही वेगळी झाली असें मानावें लागेल ?" ह्या शंकेचे उत्तर असें कीं, नवऱ्याच्या पश्चात् त्याची विधवा बायका वेगळी झाली असें मानण्याचें कारण नाहीं, नवऱ्याच्या पश्चात् त्याची बायको व तिचे दीर हे एकत्र कुटुंबाचे भागदार म्हणून राहतील व कर्ता मनुष्य, एकत्र कुटुंबाची व्यवस्था वगैरे गोष्टी सर्व सामान्य हिंदु कायद्याप्रमाणेंच चालतील.

## १४३ विधवेला मिळणारा हिस्सा केव्हां ठरवणेचा ? नवरा मयत झाल्यावेळीं का वाटणीच्या वेळीं ?

ह्या कायद्यानें विधवेला नवऱ्याच्या बरोबरीनें हिस्सा मिळतो असें ठरविलें. पण हा हिस्सा केव्हां ठरवणेचा ? नवरा मयत झाल्यावेळीं का वाटणीच्या वेळीं ह्या प्रश्नाचें उत्तर ह्या कायद्यांत दिलें नाहीं. पुष्कळ लोक असें म्हणतात कीं, ह्या

कायद्याची भाषा कायद्याच्या भाषेला न शोभणारी आहे, म्हणून असले प्रश्न निर्माण होतात. असली अगर ह्याच्यापेक्षांही कठोर टीका केली तरी ह्या प्रश्नाचें उत्तर सांपडणार नाहीं. असें म्हणण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं कीं, ह्या कायद्यामुळें हिंदु विधवेला मिळणारे अधिकार तिच्या नवऱ्यापेक्षां जास्त असणार नाहींत. ह्यामुळें नवऱ्याचा हिस्सा ज्याप्रमाणें वाटणीचें वेळीं ठरतो, त्याचप्रमाणें विधवेचा हिस्सा देखील वांटणीचे वेळीं ठरेल. कांहीं लोकांचें असें मत आहे कीं, विधवेला मिळणारा हिस्सा वांटणीचे वेळीं न ठरतां नवरा मयत झाल्यावेळीं ठरतो.

आपण एक उदाहरण घेऊं—अला ब म्हणून एक मुलगा आहे. ब मुलगा मेला त्या वेळीं घरांत अ व ब ची बायको क एवढेंच लोक शिल्लक राहिले. ह्या वेळीं हिस्सा ठरवणेचा झाला तर अला एक द्वितियांश व कला एक द्वितियांश असें हिस्से मिळतील. पुढें अला ड, इ व फ असें तीन मुलगे झाले, आणि नंतर कनें वाटणी मागितली. कचा हिस्सा तिचा नवरा ब मेला त्या वेळचा, असें मानले तर कला एक द्वितियांश हिस्सा मिळेल व अ आणि त्याचे तीन मुलगे ड, इ, फ ह्यांना सर्वांना मिळून एक द्वितियांश हिस्सा मिळेल. (प्रत्येकीं एक अष्टमांश) ही चमत्कारिक परिस्थिती लक्षांत घेतली व विधवेला मिळणारे अधिकार तिच्या नवऱ्यापेक्षां जास्त नाहींत हें कायद्याचे तत्त्व पाहिलें म्हणजे असेंच मानावें लागेल कीं, विधवेला मिळणारा हिस्सा वाटणीचे वेळीं निश्चित ठरणेचा असतो.

## १४४ व्यभिचारी विधवा

मिताक्षरी व दायभाग ह्या दोन्ही शाखेप्रमाणें नवरा मयत होण्याचे वेळीं त्याची बायको व्यभिचारी असेल तर तिला नवऱ्याचा वारसा मिळत नाहीं. सन १९३७ च्या १८ नंबरच्या कायद्यामध्यें असें म्हटलें आहे कीं, हिंदु कायद्याचा नियम अगर प्रघात विरुद्ध असला तरी ह्या कायद्याचें कलम ३ लागूं आहे. ह्याचा अर्थ असा कीं, नवरा मयत होणेचेवेळीं त्याची बायको व्यभिचारी असेल तरी तिला नवऱ्याचा वारसा मिळेल. आजपर्यंत व्यभिचारामुळें वारसा-क्रमांत जो बाध येत असे तो ह्या कायद्यामुळें निघून गेला आहे.

## १४५ शेवटीं

ह्या कायद्यामध्यें बरेंच दोष आहेत. ह्याची भाषा असावी तशी कांटेकोर नाहीं. ह्यामुळें नाना प्रकारचे क्लिष्ट प्रश्न उत्पन्न झाले आहेत व पुढ होतील. हा कायदा करतांना जितका बारीक सारीक विचार करणेस पाहिजे होता तितका केला नाहीं हें सर्व नाकबुल करून चालणार नाहीं. पण त्याचबरोबर हेंही कबूल करावे लागेल कीं, हिंदु कायद्याप्रमाणें मिळकतीच्या अधिकाराबावत स्त्रियांची स्थिति समाधानकारक नाहीं, ती सुधारण्या करितां एक अल्पास पण अत्यंत स्तुत्य असा प्रयत्न ह्या कायद्यांत करण्यांत आलेला आहे.

(१) टाप —

स्टप ॲक्टमध्यें निरनिराळ्या प्रांतात नवीन कायद्याप्रमाणें बद्‌ल केलें आहेत. हे बद्‌ल जरूर पहाणें. मुबई प्रांतांत ज बद्‌ल केले आहेत त्यामुळें स्टॅंप पूर्वापेक्षां दीडपटीनें वाढल आहे.

(२) टाप—

शारदा कायद्यांत पूर्वी वधूची वयोमर्यादा चौदा होती. आतां ती पंधरा करण्यांत आली आहे.

REFBK-0007389

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. 0326
ग्रंथ : शाखा

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १७ | ११ | घ्यावयास | घ्यावास |
| २० | ४ | सर्व | सर्व पुरुष त्या समाजांतील |
| २१ | १६ | श्रृति | श्रुति |
| २१ | २३ | धर्म | धर्मं |
| २२ | १५ | धर्मोऽच्यते | धर्मं उच्यते |
| ,, | २१ | संयोग | संयोगः |
| ,, | २२ | विज्ञेयोः | विज्ञेयो |
| २३ | २ | सदर्ती | रुदर्ती |
| २६ | ३ | वारस | वारसा |
| २९ | १८ | गोवाजी | गोमाजी |
| ३० | ११ | ख्रीश्चन | ख्रिश्चन |
| ४२ | १९ | मि. रा. रा. | श्री. रा. रा. |
| ४३ | १२ | मि. सौ. | श्री. सौ. |
| ४४ | २५ | सूंपूर्ण | संपूर्ण |
| ९३ | शेवटची | एन्स्टुमेंटस् | इन्स्टुमेंटस् |
| ९७ | १२ | ट्रॅन्स्फर ॲक्ट ऑफ् प्रॉपर्टी | ट्रॅन्स्फर ऑफ् प्रॉपर्टी ॲक्ट |
| १०० | ११ | पैक्याच्या | पैक्याचा |
| १०४ | ४ | दिले | गहाण लिहून दिले |
| ,, | २४ | नाव | नांवचा |
| ११४ | २४ | प्रिव्हि कौन्सिलचा | प्रिव्हि कौन्सिलच्या |
| ११५ | १० | तितकी | तितका |
| ११८ | २१ | मिताक्षरी * | मिताक्षरा |
| ११९ | २१ | बहिणीची | बहिणीचा |
| १२० | २ | वारसा व ह्यांत | वारसा ह्यांत |
| १२५ | २३ | कोणच्याही | कोणचाही |
| १२६ | १५ | बायका | बायको |
| ,, | २४ | वारणीच्या | वाटणीच्या |
| १२७ | ८ | व | ब |
| १२८ | ७ | सुधारणा करितां | सुधारण्याकरितां |

* कांहीं कांहीं ठिकाणीं मिताक्षरी असें छापलें गेलें आहे त्याऐवजीं मिताक्षरा असें वाचावें.